# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड | गुरुवार । दि. १६ जुलै २०२६ । अंक ४० । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


## लाल किल्ला पर्यटकांसाठी बंद

**नवी दिल्ली :** स्वातंत्र्य दिनाच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर १५ जुलै ते १५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत ऐतिहासिक लाल किल्ला सर्वसामान्य पर्यटकांसाठी बंद ठेवण्यात आला आहे. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (एएसआय) विभागाने याबाबत आदेश जारी केला आहे. या काळात ऑनलाइन किंवा ऑफलाइन तिकीट आरक्षित केलेल्या पर्यटकांनाही प्रवेश मिळणार नाही. दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी पंतप्रधानांच्या ध्वजारोहण आणि भाषणाच्या तयारीसाठी सुरक्षा व्यवस्था, रंगीत तालीम आणि अन्य कामांमुळे लाल किल्ला परिसर बंद ठेवला जातो.

## भीषण अपघातात चौघांचा मृत्यू

**रत्नागिरी :** जिल्ह्यातील लांजा येथील शांतीनगर परिसरात मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर उभ्या असलेल्या डंपरला क्रेटा कारची पाठीमागून जोरदार धडक बसून भीषण अपघात झाला. या अपघातात एकाच कुटुंबातील चार जणांचा जागीच मृत्यू झाला, तर दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. गोव्याहून मुंबईकडे येणारी क्रेटा कार (एमएच ०१ सीपी ८०२१) उभ्या डंपरवर (एमएच ०५ ईएल ३८७७) आदळल्याने हा अपघात घडला. धडकेची तीव्रता इतकी भीषण होती की कारचा अक्षरशः चुराडा झाला. जखमींना तातडीने लांजा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# चौदा तासांनंतर कशेडी घाट पूर्वपदावर

**। पोलादपूर । शैलेश पालकर ।**

तालुक्यातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर कशेडी घाटात धामणदिवी व चोळई गावाजवळील हॉटेल अन्नपूर्णासमोरील डोंगरावरून मंगळवारी रात्री पावणेदहा वाजण्याच्या सुमारास प्रचंड मोठी दरड कोसळली. रात्री मुंबई लेनवरील वाहतूक बंद करण्यात येऊन बुधवारी दुपारी तब्बल १४ तासांनंतर लार्सन अँड टुब्रो ठेकेदार कंपनीने दरड हटविण्यास सुरुवात केली. मात्र, दुपारी दीड वाजता सुरू झालेल्या पावसामुळे कामात काहीकाळ पावसाचा अडथळा निर्माण झाला.

मंगळवारी रात्री पडलेल्या या महाकाय दरडीने मुंबईकडे जाणारी लेन पूर्णपणे व्यापून गेली. रात्री दरडप्रवण क्षेत्रात अधूनमधून दरडी कोसळत असल्याने कशेडी टॅप वाहतूक पोलीस आणि पोलादपूर पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांनी या ठिकाणी बंदोबस्त ठेवला. गोव्याकडे जाणाऱ्या रस्त्यावरील वाहतूक दुहेरी करून मुंबईकडे जाणारी वाहने गोवा लेनवर वळविण्यात आली.



- **मंगळवारी रात्री कोसळली दरड**
- **मुंबई लेन वाहतुकीसाठी पूर्णतः बंद**

याकामी पोलादपूर तहसीलदार कपिल घोरपडे व महाड प्रांताधिकारी डॉ. पोपट ओमासे यांनी घटनास्थळी पाहणी करून कशेडी घाटातील वाहतूक पोलीस आणि पोलादपूर पोलिसांना वाहतूक नियंत्रणाच्या उपाययोजना करण्याची सूचना केली. यावेळी महाड औद्योगिक वसाहतीतील सहायक पोलीस निरीक्षक आनंद रावडे हेदेखील दरडप्रवण क्षेत्रात हजर झाले आणि त्यांनी बॅरिकेट्स लावून गोव्याकडे जाणाऱ्या वाहनांना सरळमार्गी वाहतूक सुरू करून मुंबईकडे जाणारी वाहने या लेनवरून मार्गस्थ केली. याठिकाणी अपघात झाल्यास क्रेन तसेच अन्य बाबींची तत्परता ठेवण्यात आली. मात्र, रात्री दरड कोसळलेल्या ठिकाणी पुन्हा पुन्हा दरडी कोसळत असल्याने पोलीस आणि वाहतूक पोलीस मृत्यूची टांगती तलवार डोक्यावर ठेवत वाहतूक नियंत्रण केले.

बुधवारी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास दरड हटविण्याच्या कामासाठी महामार्गावरील ठेकेदार कंपनी लार्सन अँड टुब्रोकडून सुरुवात झाल्यावर एखाद्या तासांनंतर पावसाने जोरदार हजेरी लावली. यामुळे दरडीतील लाल मातीचा ढिगारा निसरड्या चिखलात रुपांतरीत झाला. त्यामुळे काहीकाळ पावसाचा अडथळा दरड हटविण्याकामी झाला.

दोन तासांनी मुंबईकडे जाणारी लेन एकेरी वाहतुकीसाठी खुली करण्यात येऊन दरडीतील लाल मातीचा ढिगारा हटविण्याचे काम संथगतीने सुरू राहिले. कशेडी घाटातील डोंगर लार्सन अँड टुब्रो ठेकेदार कंपनीने उभे कापल्याने वारंवार डोंगरातून लालमातीचे ढिगारे कोसळण्याच्या घटना घडत असल्याचे दिसून आले.

## वेधक

### कार-मोटारसायकलची धडक; दोघे जखमी

**पोलादपूर :** मुंबई-गोवा महामार्गावर पोलादपूर प्रभातनगर येथे महामार्गावर मोटारसायकल आणि कार यांची टक्कर होऊन कार चालक व मोटारसायकलस्वार यांना गंभीर स्वरूपाची दुखापत झाली. बुधवारी सकाळी १० वाजण्याच्या हा अपघात झाला. पोलादपूर येथे आठ दिवसांपूर्वी स्कायवॉकसाठी गर्डर बसविताना पोलादपूर शहरातील प्रभात शनगर पश्चिम येथे सर्व्हिस रोडवरील वाहनांना मुंबईकडे जाण्यासाठी डिव्हायडर कापून रस्ता देण्यात आला. मात्र, •> पान ५ वर

### वर्षासहलीसाठी आलेल्या पर्यटकाचा बुडून मृत्यू

**नेरळ :** नेरळ जवळील शेलू येथे वर्षासहलीसाठी आलेल्या कुटुंबातील एका व्यक्तीचा उल्हास नदीच्या पाण्यात उतरल्यानंतर पाण्याचा अंदाज न आल्याने मृत्यू झाला. शेलू येथे एका फार्म हाऊसवर हे कुटुंब पर्यटनासाठी आले होते. अभिजित जाधव (४०) यांचा पाय घसरुन नदीच्या खोल पाण्यात पडल्याने बुडून मृत्यू झाला. ठाणे जिल्ह्यातील वांगणीजवळील डोणे गावातील अभिजित जाधव हे आपली मुलगी आणि आणखी पाच नातेवाईकांसमवेत शेलू •> पान ५ वर

### विस्तार अधिकारी एसीबीच्या जाळ्यात

**बुलढाणा :** जिल्ह्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) मोठी कारवाई करत जळगाव जामोद पंचायत समितीतील विस्तार गट विकास अधिकारी संदीप मोरे याला २५ हजारांची लाच स्वीकारताना रंगेहाथ अटक केली. शेतकऱ्याचे शासकीय काम करून देण्यासाठी मोरे यांनी लाचेची मागणी केल्याची तक्रार एसीबीकडे करण्यात आली होती. तक्रारीची पडताळणी करून अमरावती एसीबीच्या पथकाने सापळा रचत त्याला रंगेहाथ पकडले. या कारवाईमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

## जि.प. कृषी विभागाचे वरातीमागून घोडे

# शेतकऱ्यांची थट्टा!

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाचे 'वरातीमागून घोडे' असेच चित्र समोर आले आहे. अतिवृष्टीमुळे हजारो शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले असताना, तातडीने मदतीची गरज होती. मात्र, पेरणीच्या दोन महिन्यांनंतर ७५ टक्के अनुदानावरील भात बियाणे योजनेसाठी ५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आल्याने "शेतकऱ्यांची थट्टा सुरू आहे का?" असा संतप्त सवाल जिल्हाभरातून उपस्थित केला जात आहे.

रायगड जिल्ह्यात २१ जूनपासून पावसाला सुरुवात झाली. त्यानंतर शेतकऱ्यांनी पेरणी आणि रोपवाटिकेची कामे वेगाने पूर्ण केली. जिल्ह्यात सुमारे ६ हजार ४०० हेक्टरवर रोपवाटिका तयार करण्यात आली होती. मात्र, जुलैच्या पहिल्या आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे सुमारे १,९०० हेक्टर क्षेत्रावरील रोपे पाण्याखाली गेली. त्यामुळे अलिबाग, पेण, पाली, रोहा आदी तालुक्यांतील अनेक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. काही ठिकाणी रोपे वाहून गेली, तर काही ठिकाणी उगवलीच नाहीत. काही ठिकाणी रोपे पाण्याखाली राहिल्यामुळे कुजली. त्यामुळे हजारो शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ आली.

गेल्या आठ दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतली असली, तरी नवीन रोपे उपलब्ध नसल्याने लावणी रखडली आहे. अशा वेळी तातडीने बियाणे मिळणे अपेक्षित असताना, कृषी विभागाने आता योजनेची घोषणा केल्याने तिच्या वेळेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### आता ५० लाखांच्या भात बियाणे योजनेची घोषणा




### मदत संकटात हवी..!

शेतकऱ्यांचे नुकसान झाल्यानंतर तातडीने बियाणे उपलब्ध करून देणे अपेक्षित होते. मात्र, लावणीचा हंगाम संपत असताना योजना जाहीर केल्याने कृषी विभागाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वेळ निघून गेल्यानंतर दिली जाणारी मदत शेतकऱ्यांच्या जखमेवर फुंकर नव्हे, तर थट्टाच असल्याची भावना जिल्हाभरातून व्यक्त होत आहे.

> मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील भातशेतीचे नुकसान झाले आहे. अलिबाग, पेणमधील शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. शेतकऱ्यांनी उभारी देण्यासाठी जिल्हा परिषद कृषी विभागामार्फत अनुदानतत्वावर बियाणे वाटप सुरू केले आहे. आतापर्यंत दीडशेहून अधिक बॅगा शेतकऱ्यांना देण्यात आल्या आहेत. कमी कालावधीमध्ये येणारे बियाणांची व्हरायटी उपलब्ध करण्यात आल्या आहेत.
>
> – पवनकुमार नजन, कृषी विकास अधिकारी, रायगड जिल्हा परिषद

जिल्हा परिषदेच्या सेस निधीतून ७५ टक्के अनुदानावर भात बियाणे योजनेसाठी ५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेतून जिल्ह्यातील सुमारे १२ ते १५ हजार शेतकऱ्यांना व्हरायटी ११५३ या कमी कालावधीत येणाऱ्या भात बियाण्याचा लाभ दिला जाणार आहे. ११० ते ११५ दिवसांत तयार होणाऱ्या •> पान ५ वर

# चिमुकलीची अत्याचारानंतर निर्घृण हत्या

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील पाच वर्षीय चिमुकलीच्या हत्येप्रकरणात अत्यंत धक्कादायक माहिती समोर आली आहे. शवविच्छेदन अहवालानुसार चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिची दगडाने ठेचून हत्या करण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी आरोपी किरण भिकू वाघमारे (२५, रा. पाटणोली, काजोळी आदिवासीवाडी) याच्याविरुद्ध पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पेण पोलीस ठाण्यात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता त्यानेगुन्ह्याचीकबुलीदिल्याचीमाहिती पोलिसांनी दिली. त्यानंतर आरोपीला न्यायालयात हजर करण्यात आले.

- **शवविच्छेदन अहवालातून धक्कादायक खुलासा**
- **आरोपीवर पोक्सोसह गंभीर कलमांखाली गुन्हा**
- **पाच दिवसांची पोलीस कोठडी**

न्यायालयाने त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून, या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुंद आणि पेण पोलीस ठाण्याचे पथक करत आहे. या अमानुष घटनेमुळे संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली असून, आरोपीला कठोरातील कठोर शिक्षा देण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, या अमानुष घटनेमुळे पेण तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे.

## डॉ. प्रसाद दाभोळकर रायगडचे मानद वन्यजीव रक्षक

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

वन्यजीव संरक्षण, पर्यावरण संवर्धन आणि जनजागृती क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत महाराष्ट्र वन व महसूल विभागाने डॉ. प्रसाद दाभोळकर यांची रायगड जिल्ह्याचे मानद वन्यजीव रक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. विशेष म्हणजे, अलिबाग तालुक्यातील व्यक्तीला प्रथमच हा बहुमान मिळाला आहे.



डॉ. दाभोळकर हे वाइल्ड लाईफ वॉरियर्स संस्थेचे संस्थापक अध्यक्ष असून, गेल्या सहा वर्षांत त्यांच्या नेतृत्वाखाली सहा हजारांहून अधिक जखमी व संकटग्रस्त वन्यजीवांचे यशस्वी बचावकार्य करण्यात आले आहे. वन्यजीव बचावासोबतच ते शाळा-महाविद्यालयांमध्ये पर्यावरण जनजागृती, वन विभागाच्या कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण, तसेच सर्पदंश प्रतिबंध आणि योग्य •> पान ५ वर

## २१ जुलैनंतर पावसाचा जोर वाढणार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यात पुढील चार ते पाच दिवस मुसळधार पावसाची शक्यता नसून, तुरळक ते मध्यम स्वरूपाच्या सरी कोसळतील, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. २१ ते २२ जुलैनंतर पावसाचा जोर वाढण्याची शक्यता वर्तविण्यात आली असली, तरी अतिमुसळधार पावसाचा इशारा सध्या देण्यात आलेला नाही. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे राज्यात सर्वदूर पाऊस •> पान ५ वर

# आठवडाभरानंतर खानाव पुलाची दुरुस्ती कूर्मगतीने!

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग-रोहा मार्गावरील खानाव-वेळवली खानाव दरम्यानच्या पुलाला भगदाड पडून आठ दिवस उलटले, तरी दुरुस्तीचे काम संथ गतीने सुरू असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. वाहतूक अद्याप बंद असल्याने प्रवाशांना वळसा घालून प्रवास करावा लागत असून, वाढीव भाड्याचा आर्थिक फटकाही सहन करावा लागत आहे.

६ जुलै रोजी झालेल्या मुसळधार पावसात खानावजवळील पुलाच्या मधोमध मोठे भगदाड पडले. या दुर्घटनेत एका वृद्धाचा पाण्यात वाहून जाऊन दुर्दैवी मृत्यू झाला. त्यानंतर प्रशासनाने अलिबाग-रोहा मार्गावरील वाहतूक तातडीने बंद केली. दुचाकी आणि चारचाकी वाहनांसाठी वेळवली-खानाव-उसर हा पर्यायी मार्ग सुरू करण्यात आला, तर एसटी बस आणि अन्य अवजड वाहनांना सहाण बायपास, पाल्हे पूल, नागाव, चौल, वावे मार्गे वळविण्यात आले.

- **सार्वजनिक बांधकाम विभागाची उदासीनता**
- **प्रवासी, विद्यार्थी आणि नागरिकांना मोठा फटका**

### युद्धपातळीवर काम पूर्ण करा!

एका निष्पाप नागरिकाचा जीव गेल्यानंतरही दुरुस्तीच्या कामाचा वेग वाढत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. पावसाने उघडीप दिल्यानंतरही काम रेंगाळत ठेवणे म्हणजे नागरिकांच्या संयमाची परीक्षा पाहण्यासारखे आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने दिरंगाई थांबवून युद्धपातळीवर काम पूर्ण करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

या पर्यायी मार्गामुळे प्रवासाचे अंतर वाढले असून, एसटीसह खासगी वाहनांचे भाडेही वाढल्याने प्रवाशांच्या खिशाला अतिरिक्त भार सहन करावा लागत आहे. शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि नोकरदार यांची मोठी गैरसोय होत आहे.

घटना घडून आठ दिवस उलटूनही दुरुस्तीच्या नावाखाली केवळ भगदाड अधिक मोठे करण्यात आल्याचे चित्र आहे. गेल्या काही दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतली •> पान ५ वर

## कामोठेतील पाणीटंचाईवर शेकापचा अल्टिमेटम

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

कामोठे सेक्टर-२१ परिसरात गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेल्या तीव्र पाणीटंचाईमुळे नागरिकांचे हाल होत असून, या प्रश्नावर शेतकरी कामगार पक्षाने सिडको प्रशासनाला चार दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे. या कालावधीत नियमित आणि पुरेशा दाबाने पाणीपुरवठा सुरू न झाल्यास सिडकोच्या पाणीपुरवठा विभागाच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शेकापचे पनवेल महानगरपालिका जिल्हा कार्याध्यक्ष महादेव कुंडलिक वाघमारे यांनी दिला आहे. •> पान ५ वर

# ऐन पावसाळ्यात पाण्यासाठी वणवण

## जांभुळपाडा ते कावाडे एमआयडीसीच्या पाण्याच्या प्रतीक्षेत

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

एकीकडे मुसळधार पावसाने धरणे तुडुंब भरली आहेत, तर दुसरीकडे अलिबाग तालुक्यातील जांभुळपाडा ते कावाडे परिसरातील नागरिकांना पाण्यासाठी अक्षरशः वणवण करावी लागत आहे. एमआयडीसीचा पाणीपुरवठा गेल्या पंधरा दिवसांपासून विस्कळीत झाल्याने सुमारे १२ हजार नागरिक ऐन पावसाळ्यात पाणीटंचाईचा सामना करत असून, एमआयडीसीच्या कारभाराविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

अलिबाग तालुक्यात समाधानकारक पाऊस झाल्याने लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद तसेच एमआयडीसीच्या अखत्यारितील धरणांमध्ये मुबलक जलसाठा उपलब्ध झाला आहे. मात्र, जांभुळपाडा, जलपाडा, पेढांबे, रांजणखार, शिरवली, हाशीवरे आणि कावाडे या गावांमध्ये एमआयडीसीकडून होणारा पाणीपुरवठा गेल्या १५ दिवसांपासून ठप्प असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत.

### नियोजनावर प्रश्नचिन्ह!

धरणे भरलेली असतानाही नळ कोरडे राहणे ही यंत्रणेच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी बाब आहे. पंधरा दिवस पाणीपुरवठा ठप्प राहणे कोणत्याही परिस्थितीत स्वीकारार्ह नसून, एमआयडीसीने तातडीने उपाययोजना करून नागरिकांना नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

रेवस झोन-२ मधील पाणीटाकीत पुरेशा प्रमाणात पाणी भरले जात नसल्याने या गावांपर्यंत पाणीच पोहोचत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. परिणामी नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी धावपळ करावी लागत असून महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांचे विशेष हाल होत आहेत. •> पान ५ वर

## अबू धाबीसाठी पहिले आंतरराष्ट्रीय उड्डाण | वॉटर कॅनन सॅल्यूटने नव्या पर्वाची दमदार सुरुवात

# नवी मुंबई विमानतळाची ऐतिहासिक झेप!

**दिपक घरत**

**। पनवेल ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या इतिहासात बुधवारी (दि. १५) सुवर्णाक्षरांनी नोंद होईल असा ऐतिहासिक क्षण साकारला. अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेड (एएएचएल) संचलित या विमानतळावरून पहिले नियोजित आंतरराष्ट्रीय प्रवासी उड्डाण पहाटे ३ वाजता अबू धाबीकडे झेपावले. एअर इंडिया एक्स्प्रेसच्या विमानाला पारंपरिक वॉटर कॅनन सॅल्यूट देत या ऐतिहासिक प्रवासाचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. या उड्डाणामुळे नवी मुंबई विमानतळाने जागतिक हवाई नकाशावर दमदार पाऊल टाकले आहे. २५ डिसेंबर २०२५ रोजी देशांतर्गत विमानसेवा सुरू झाल्यानंतर अवघ्या २०० दिवसांतच नवी मुंबई विमानतळाने आंतरराष्ट्रीय सेवेला प्रारंभ केला आहे. हा टप्पा विमानतळाच्या विकासातील महत्त्वाचा मैलाचा दगड मानला जात असून, मुंबई महानगर प्रदेशाच्या हवाई वाहतूक क्षमतेतही मोठी भर पडली आहे.

एअर इंडिया एक्स्प्रेसने नवी मुंबईअबू धाबी मार्गावर आठवड्यातून तीन दिवस थेट विमानसेवा सुरू केली आहे. •> पान ५ वर

### आर्थिक विकासाला मिळणार गती


अबू धाबी हा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील पहिला आंतरराष्ट्रीय मार्ग ठरला आहे. आगामी काळात मध्य पूर्व, आशिया तसेच इतर देशांतील अनेक शहरांसाठी थेट विमानसेवा सुरू होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे हवाई वाहतूक, उद्योग, व्यापार, पर्यटन, निर्यात आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होऊन रायगडसह संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशाच्या आर्थिक विकासाला मोठी गती मिळणार आहे.

### पहाटे ३ वाजता एअर इंडिया एक्स्प्रेसचे विमान झेपावले





॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥



कळविण्यास अत्यंत दुःख होते की, आमचे वडील

कै. श्री. सुभाष हरिभाऊ शेडगे

(निवृत्त सहकार अधिकारी, श्रेणी १)

यांना शुक्रवार दि. १०/०७/२०२६ रोजी देवाज्ञा झाली.

दशक्रिया विधी

रविवार, दि. १९/०७/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा.

ठिकाण : रामनाथ स्मशानभूमी धर्मशाळा, वरसोली

१३ वे/उत्तरकार्य

बुधवार, दि. २२/०७/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा.

ठिकाण : 'शेडगे सदन' घर नंबर १८३/ब, तुषार हॉटेल लेन, श्री हनुमान मंदिराचे मागे, मु. नागडोंगरी, पो. चेंढरे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड ४०२,२०१

शोकाकूल

समस्त शेडगे परिवार

# जुलै हिटमुळे शेतकरी चिंतेत

**| म्हसळा | प्रतिनिधी |**

जुलै महिन्याच्या सुरुवातीला सलग सात दिवस झालेल्या मुसळधार पावसामुळे म्हसळा तालुक्यात सर्वत्र जलमय परिस्थिती निर्माण झाली होती. नद्या–नाले दुथडी भरून वाहत होते, तर शेतकऱ्यांनीही पावसाच्या जोरावर भात लागवडीच्या कामांना वेग दिला होता. त्यामुळे बळीराजामध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले होते.

मात्र, गेल्या काही दिवसांपासून पावसाने अचानक दडी मारल्याने तालुक्यातील वातावरणात मोठा बदल झाला आहे. आकाशात ढगांची वर्दळ कमी झाली असून, पावसाचा एक थेंबही पडत नसल्याने उन्हाचा चटका वाढला आहे. हवेत कमालीचा उकाडा जाणवत असून, जुलै महिन्यातच ऑक्टोबर हिटसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. दुपारच्या वेळेत उन्हाची तीव्रता वाढल्याने रस्त्यांवरील वर्दळ कमी झाली असून, नागरिक शक्यतो घराबाहेर पडणे टाळत आहेत. उकाडा आणि दमट हवामानामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच कष्टकरी वर्गाला विशेष त्रास सहन करावा लागत आहे.

# मुर्बीतील तुटलेल्या झाडांची छाटणी

**| पनवेल | प्रतिनिधी |**

खारघर सेक्टर-१९ मधील मुर्बी गावाच्या कमानीजवळ तुटलेल्या झाडामुळे गावात ये-जा करणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. झाडाच्या फांद्या रस्त्यावर लोंबकळत असल्याने वाहनचालक, पादचारी तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता.

विशेषतः पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर अपघाताची भीती व्यक्त केली जात होती. या समस्येची दखल घेत ग्रामस्थांनी पनवेल महापालिका तसेच अग्निशमन दल अधिकाऱ्यांशी संपर्क साधून तातडीने कारवाईची मागणी केली होती. त्यानंतर महापालिका आणि अग्निशमन दल पथकाने घटनास्थळी भेट देत तुटलेल्या झाडाची सुरक्षित पद्धतीने छाटणी केली.

तसेच, रस्त्यावर पडलेल्या फांद्या हटवून वाहतुकीस अडथळा ठरणारा भाग पूर्णपणे मोकळा केला. या तातडीच्या कारवाईमुळे मुर्बी गावात येणाऱ्या–जाणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, परिसरातील वाहतूकही सुरळीत झाली आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येत की आमचे अशिल १) मुदस्सर नाझीर खातीब आणि २) अल्फा अरबाज शेख, रा. ठाणे यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत विद्यमान मालकाकडून कायम खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे - आशाणे, तालुका - कर्जत, जिल्हा - रायगड**

| जमिन मालकाचे नावं | स.न/हि न | क्षेत्र. हे.आर.प्रति | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| दिपक ईश्वरलाल हिरा | ५२ | एकुण क्षेत्र ००-३४-१० | १ रू १२ |

सदरहू वर नमूद केलेली शेती मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांचे मालकीची स्वकष्टाची व ताबे कब्जा वहीवाटीची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ उताऱ्यावरून तसेच दिसते. सदर शेती मिळकत त्यांचकडून आमचे अशिलांनी तदंगभूत सर्व हक्कांगासह कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर शेती मिळकतीत कोणाचा काही गहाण, दान, साठेकरार, बक्षिस, फरोक्तखत, लिज वगैरे प्रकारचा हक्क वा कुळ हक्क, अन्न वस्त्र बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाचे आत खालील पत्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल. व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

ता १५/०७/२०२६

सही

**ॲड. सतीश अर्जुन शेळके**
(बी.ए.एल.एल.बी) मुंबई हायकोर्ट
ऑफीस पत्ता- नारायण देशमुख
हाऊस दगडे आळी कर्जत पूर्व
कर्जत - रायगड मो.नं. ९८८११३२२४८


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


# आंबोट शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप

**नेरळ :** विनायक वसंत पाबळे फाऊंडेशनच्या वतीने राजिप प्राथमिक शाळा, आंबोट येथे गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला फाऊंडेशनचे अध्यक्ष विनायक पाबळे, मनोज सूर्यवंशी, मिनेश मसने यांचे महत्वाचे योगदान होते. याप्रसंगी मिरा मसणे, मदन मसणे, प्रचित मसणे, सुवर्णा मसणे, विनायक उपाध्ये, विनायक पाबळे फाऊंडेशनचे कार्यकर्ते उपस्थित होते. या कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे सानिका इडे, शिशू वर्गाच्या शिक्षिका प्रणाली मसणे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, जागृती विकास पाटील व प्रमोदिनी धर्मेंद्र माली यांच्या मालकीची मौजे कुरनाड, ता.पेण,जि.रायगड, येथील जमिन असून मी स्वतः हर्षला संतोष पाटील रा.श्वेता अर्पाटमेंट प्लॅट नंबर ५६ रुम नंबर २०३ सारसोळे बस डोपो जवळ सेक्टर ६ सारसोळे गाव नवी मुंबई नेरुळ ठाणे महाराष्ट्र ४००७०६ येथील रहिवासी असून मी खालील वर्णनाची जमिन विकत घेण्याचे ठरविले आहे, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे.

| गाव | मालक | भूमापन क्र. व उपविभाग | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| कुरनाड | जागृती विकास पाटील व प्रमोदिनी धर्मेंद्र माली | ७४ | ०.२९.४० | ४.८२ |

तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकत मी स्वता: कायमस्वरूपी विकत घेत आहे. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसाच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वतः जमिन मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करेन व मागाहुन येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दिनांक १६/७/२०२६

**हर्षला संतोष पाटील**
रा.श्वेता अर्पाटमेंट
प्लॅट नं ५६, रुम नंबर २०३
सारसोळे बस डेपो जवळ,
सेक्टर ६ सारसोळे गाव, नवी मुंबई,
नेरुळ ठाणे, महाराष्ट्र ४००७०६
मोबाईल नं. ९३२४८१३५७७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, आम्ही, आमचे आशिलांनी सांगितल्यावरुन **श्री. चकोर लालचंद दोषी,** रा. नीला हाऊस, दुसरा मजला, एम. एल. डहाणूकर मार्ग, मुंबई ४०००२६ **(मालक)** यांच्या खाली परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे हक्क, स्वामित्व आणि हितसंबंध तपासत आहोत.

जमीन मालकांनी आमच्या अशिलाना प्रतिपादन केले आहे की, तत्पूर्वीचे जमिन मालकांनी त्यांना अन्नपूर्णा महादेव मोरे व इतर सहा विक्रेते आणि सुधीर बळीराम म्हात्रे व इतर चार खरेदीदार यांच्यात ता. ११ जुन १९९७ रोजी अनुक्रमांक एएलबी / ११२१/१९९७ वर नोंदणीकृत झालेल्या खरेदीखताची झेरॉक्स प्रत सुपूर्त केली होती त्यांनी मुळप्रत कधीही जमिन मालकांना दिली नव्हती.

तरी सदर मिळकत किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिच्या कोणत्याही हिस्सा/हिश्श्यांच्या संदर्भात आणि/किंवा मुळ खरेदीखत ता. ११ जुन १९९७ च्या संदर्भात कोणत्याही व्यक्तींचा अथवा इसम/इसमांचा कोणत्याही प्रकारचा क्लेम, विक्री, अदलाबदल, लिज, गहाण (इक्विटेबल किंवा कोणत्याही प्रकारचे), बक्षिस, लिन, चार्ज, न्यास, वारसा, हिंदु एकत्र कुटुंब, मेंटेनन्स, मृत्युपत्र, ताबा कब्जा, वहीवाट, पोटकुळ, असाईनमेंट, कुळ, लायसन्स, प्लेज, गॅरंटी, कौटुंबिक व्यवस्थापन, विकसन हक्क, विकसन व्यवस्थापन, सहयोग करार, सहउद्योग, कुलमुखत्यारपत्र, भागिदारी, कर्ज, आगावू देणे, लिज पेंडन्स, मनाई किंवा इतर ॲटॅचमेंट अथवा कोणत्याही कोर्टाचा हुकूमनामा, आदेश, ॲवॉर्ड न्यायाधिकरणाचा, महसुली वा सविधी मान्य (स्टॅटयूटरी) अधिकारी किंवा लवादाचा, अथवा न्याय निर्णय, जप्ती, प्रधान्यक्रमाने हक्क, खरेदी करण्याचा पर्याय अथवा इतर कोणताही कोणत्याही प्रकारचा क्लेम असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१४ (चौदा)** दिवसांच्या आत संबंधीत कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती खाली सही करणार यांच्या अधोरिखीत पत्त्यावर दाखल कराव्यात तसेच त्याची प्रत खाली नमुद इमेलवर पाठवावी. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर नोटीसीत नमुद मिळकती संबंधी दावा/दावे, क्लेम, हरकती, जे कोणते असतील, ते अशा व्यक्तीने/व्यक्तींनी सोडले व/किंवा त्यागले आहेत असे समजणेत येईल.

**संदर्भित परिशिष्ट**
**(सदर मिळकत)**

मौजे थळ, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड व नोंदणी जिल्हा रायगड, उप नोंदणी जिल्हा अलिबाग, महाराष्ट्र येथील शेत जमिन मिळकत **सर्व्हे नं १५० हिस्सा नं २** क्षेत्रफळ १हे. ९५आर २०पॉ. तसेच त्यावर उभी असलेली बांधकामे मालमत्ता क्रं. १६६० क्षेत्रफळ ५.९५ चौ मी आणि मालमत्ता क्रं. ७८ क्षेत्रफळ ३२.५३ चौ मी यांचा समावेश आहे त्यास चतुःसिमा खालीलप्रमाणे आहेत

पूर्वेस – सर्व्हे नं १५१
पश्चिमेस – रस्ता
उत्तरेस – सर्व्हे नं १४९ आणि सर्व्हे नं १५०/१
दक्षिणेस – सर्व्हे नं १५५ आणि सर्व्हे नं १५१ पैकी

**सही/–**

तारीखः १६ जुलै २०२६

**मे. लॉ पॉईंट**
**ॲडव्होकेटस् ॲन्ड सॉलिसिटर्स**
३०१, वैभव चेंबर्स, तिसरा मजला, जगत विदया मार्ग, बीकेसी मेट्रो स्टेशन जवळ (ए३ एक्झिट), बांद्रा कुर्ला कॉम्पलेक्स, बांद्रा (पु), मुंबई ४०००५१,
**Email: response@lawpointindia.com**

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

**ई-निविदा आमंत्रण सूचना**

उप मुख्य अभियंता (कार्य), कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी यांचे द्वारे पात्र कंत्राटदारांकडून आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा माध्यमाने खालील कामासाठी खुली निविदा एक पाकीट बोली प्रणालीअंतर्गत निविदा मागविण्यात येत आहेत. **कामाचे नाव**: कोंकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील संगमेश्वर स्थानकावरील प्लॅटफॉर्म-2 च्या प्लॅटफॉर्म पृष्ठभागाची दुरुस्ती. **निविदा सूचना क्रमांक : केआर-आरएन-डीवायसीईडब्ल्यू-एसजीआर19-2026, दिनांक: 16.07.2026. एकूण अंदाजित किंमत**: रु.23,41,414.79 (जीएसटी वगळून). **बोली सुरू होण्याची तारीख**: 23.07.2026. **समाप्ती तारीख/वेळ**: 06.08.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत, ऑनलाइन प्रस्ताव / बोली सादर करण्यासाठी. **काम पूर्ण करण्याचा कालावधी**: 3 महिने. मॅन्युअल प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील/सहभागासाठी कृपया **https://www.ireps.gov.in** संकेतस्थळाला भेट द्या तसेच शुद्धिपत्र / परिशिष्ट केवळ याच संकेतस्थळावर अपलोड करण्यात येतील.

## जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, आमचे अशिल यांनी खालील नमूद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या विक्री संबंधित बोलणी विद्यमान मालक सुरेखा दत्तात्रेय महादे वगैरे ४ यांचेसोबत झालेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार |
|---|---|---|---|
| वडवली ता. अलिबाग जि. रायगड | ९४ | जिरायत ०-३३-९० पो.ख. ०-०३-९० एकुण क्षेत्र ०-३७-५० | ७.३० |

वर वर्णन केलेली मिळकत या जाहिर नोटीशीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व विनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : १५/०७/२०२६

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. आंबेघर (पळी), पो. पोयनाड,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं. ९२७३२७३८४३/
९६३७२७००१९

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**( तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)**

ज.म.र अर्ज ५७/२०२६

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. अब्दुल कय्युम अताउर रेहमान पेनकर,
रा. मु. खार आंबोली, पो. शिघ्रे, — अर्जदार
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड

विरुद्ध

निबंधक, जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत राजपुरी, — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. १०-१०-१९८५ रोजी मौजे राजपुरी, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत राजपुरी, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. १०-१०-१९८५ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक ३०/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

कळावे.

आज ता.१४/७/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)**

ज.म.र. अर्ज ४५०/२०२६

**जाहीर नोटीस**

प्रति,
श्रीम. पिंकी प्रसाद जंगम
रा. मु. पो. साळाव, ता. मुरुड-जंजिरा, — अर्जदार
जि. रायगड

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्राम पंचायत साळाव, — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार श्रीम. पिंकी प्रसाद जंगम यांचा मुलगा कु. प्रकाश प्रसाद जंगम जन्म दि. १/१/२०१९ रोजी मोजे साळाव ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्राम पंचायत साळाव यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार श्रीम. पिंकी प्रसाद जंगम यांचा मुलगा कु. प्रकाश प्रसाद जंगम यांचा जन्म दि. १/१/२०१९ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वत: किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक ३० जुलै २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीन आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १५/७/२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
तहसिलदार मुरुड-जंजिरा

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे कामार्ले, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकती व त्या मिळकतींचे मालक/कब्जेदार यांचेकडून आमचे अशिल कायमस्वरूपी खरेदी करण्याच्या विचारात आहे. तशा प्रकारची बोलणी विद्यमान मालकांबरोबर चालू आहेत. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पैसे.) |
|---|---|---|---|
| कामार्ले ता. अलिबाग | १३४/१ | ०-३२-६० पो.ख. ०-०२-४० एकुण ०-३५-०० | ६.०७ |
| कामार्ले ता. अलिबाग | १४३/३ | ०-२१-०० पो.ख. ०-०३-०० एकुण ०-२४-०० | ०.३६ |

वर नमुद केलेल्या सदर मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क हितसंबंध, बोजा, गहाण, दान, बक्षिस, लिज, वहिवाट, वारसा, इजमेंट, अदलाबदल, भाडेकरार, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती अगर कुठल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध अगर अधिकार असल्यास अशा व्यक्तिने आपला हक्क लेखी पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर सर्व संबंधीत कागदोपत्री पुरावा घेऊन खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदरची मिळकत ही पूर्णपणे निर्वेध, निर्जोखमी आहे, असे समजून अथवा कोणाचाही हक्क अगर हितसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही कसलीही तक्रार आल्यास आमच्या अशिलांवर ती बंधनकारक राहणार नाही.

कळावे.

अलिबाग,
तारीख : १५/०७/२०२६

सही/-
**ॲड. सचिन दिनकर पाटील**
बी. ए. एल. एल. बी मुंबई
२१ पारिजात सोसायटी चेंढरे,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९२२६८७२६९०

## जाहिर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आमच्या पक्षकारांच्या निर्देशांनुसार, आम्ही **क्वेस्ट अकॅडमी लिमिटेड** (यापुढे "**मालक**" म्हणून संबोधले जाईल) यांच्या खालील अनुसूचीमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीच्या त्या सर्व भाग आणि विभाग असलेल्या (यापुढे एकत्रितपणे "**जमिनी**" म्हणून संबोधले जाईल) मालकी हक्काची तपासणी आणि पडताळणी करत आहोत जे त्याचे मालक आहे, त्यांनी त्या जमिनी ताब्यात घेतल्या आहेत, त्यांचा ताबा आहे आणि त्या सर्व बोजांपासून मुक्त असून अन्यथा त्या जमिनींसाठी पूर्णपणे आणि पुरेसे हक्कदार आहेत. या जमिनींसोबत खालील हक्कांचाही समावेश आहे : (१) "राईट ऑफ वे क्र. १" म्हणून वर्णन केलेल्या जमिनीच्या पट्ट्यावरील एक कायमस्वरूपी, शाश्वत, हस्तांतरणीय परंतु गैर-अनन्य मार्गाधिकार, आणि (२) "राईट ऑफ वे क्र. २" म्हणून वर्णन केलेल्या ०-१५-५ हेक्टर क्षेत्रफळाच्या जमिनीवरील एक कायमस्वरूपी, शाश्वत, हस्तांतरणीय आणि अनन्य मार्गाधिकार. हे दोन्ही हक्क जमिनीच्या संदर्भात, दिनांक ११ जून, २०२६ रोजीच्या, अनुक्रमांक एएलबी/४७८८/२०२६ असलेल्या, कायमस्वरूपी आणि अपरिवर्तनीय मार्गाधिकाराच्या करारामध्ये अधिक तपशीलवारपणे तयार आणि वर्णन केलेले आहेत जे रायगड नोंदणी जिल्हा आणि अलिबाग उप-जिल्हा, जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती अलिबाग आणि ग्रामपंचायत सथिरजे यांच्या हद्दीत (यापुढे एकत्रितपणे "मार्गाचा हक्क" म्हणून संबोधले जाईल) स्थित, सथिरजे गाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील गट क्र. २७६, हिस्सा क्र. १ असलेल्या आणि आम्ही मालकाच्या सध्याच्या भागधारकांकडे असलेल्या, जारी केलेल्या, सबस्क्राईब आणि भरणा केलेल्या भाग भांडवलाचा भाग असलेल्या इक्विटी शेअर्सच्या मालकी हक्काची तपासणी आणि पडताळणी देखील करत आहोत, जे सर्व बोजांपासून मुक्त असल्याचे सांगितले गेले आहे.

उक्त जमिनी किंवा तिच्या कोणत्याही भागांच्या संदर्भात आणि/किंवा मालकाच्या सध्याच्या भागधारकांकडे असलेल्या, जारी केलेल्या, वर्गणी दिलेल्या आणि भरणा केलेल्या भाग भांडवलाचा भाग असलेल्या इक्विटी शेअर्सच्या संदर्भात, किंवा उक्त जमिनींसंबंधीच्या कोणत्याही मालकी हक्काच्या कागदपत्रांच्या संदर्भात, ज्यात कोणतेही गहाळ / हरवलेले मालकी हक्काचे दस्तऐवज समाविष्ट आहे, कोणत्याही स्वरूपाचा हक्क, मालकी, हित, हितसंबंध, हिस्सा, दावा किंवा मागणी असलेल्या सर्व व्यक्ती / संस्था, ज्यात इतरांबरोबरच कोणतीही बँक आणि / किंवा वित्तीय संस्था आणि/किंवा प्राधिकरण यांचा समावेश आहे (ज्यात १८ डिसेंबर, १९९५ रोजीचा अनुक्रमांक एएलबी / ७३५/१९९६, असलेला करारनामा समाविष्ट आहे, परंतु तो केवळ इतकाच मर्यादित नाही, जो (१) श्री अन्वर हाजी अली मोहम्मद आणि इतर, ज्यात "विक्रेते" म्हणून उल्लेख आहे; कुमार सरफराज शब्बीर अगबोटवाला आणि कुमारी नझीहा शब्बीर अगबोटवाला, दोघेही अल्पवयीन, त्यांच्या आई आणि नैसर्गिक पालक श्रीमती नजमुसाहेर शब्बीर अगबोटवाला यांच्यामार्फत, ज्यात "पुष्टी करणारे पक्ष" म्हणून उल्लेख आहे; गोल्डक्रेस्ट शेल्टर (इंडिया) लिमिटेड (आता क्वेस्ट अकॅडमी लिमिटेड म्हणून ओळखले जाते) आणि पिलसन रिअल इस्टेट प्रायव्हेट लिमिटेड, त्यातील "खरेदीदार" म्हणून त्यांच्यामध्ये आणि द्वारे कार्यान्वित करण्यात आला होता., ज्या संदर्भात सदर मालकाने ११ जुलै, २०२६ रोजी लॉस्ट रिपोर्ट क्र. ९३२०५ - २०२६ असलेला पोलीस अहवाल दाखल केला आहे) विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, अभिहस्तांकन, गहाण (न्याय्य किंवा अन्य), तारण, भार, देणगी, बक्षीस, विश्वस्त संस्था, करार, वारसा, दावा, ताबा, भाडेपट्टा, पोट- भाडेपट्टा, परवाना, भाडेकरूपण, धारणाधिकार, कर्ज, देखभाल, सुखाधिकार / वाटेचा हक्क, मृत्युपत्र, वसीयत, बोजा, कौटुंबिक व्यवस्था / तडजोड, विभाजन, मुदतपूर्व हक्क आणि / किंवा अग्रक्रय आणि / किंवा कोणत्याही कराराअंतर्गत आणि/किंवा दस्तऐवजाअंतर्गत आणि/किंवा इतर प्रकारे ताबा काढून घेणे आणि/किंवा कोणत्याही न्यायालय, न्यायाधिकरण, महसूल आणि/किंवा वैधानिक प्राधिकरण आणि/किंवा लवादाच्या कोणत्याही प्रलंबित खटल्याअंतर्गत, मनाई हुकूम, हुकूमनामा किंवा आदेश, करार/समझोते, एफएसआय वापर किंवा अन्य प्रकारे तथापि, याद्वारे विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी कागदोपत्री पुराव्याच्या नोटरीद्वारे प्रमाणित सत्य प्रतींसह, याची लेखी स्वरूपात माहिती या प्रकाशनाच्या तारखेपासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत अधोस्वाक्षरी करणाऱ्याच्या कार्यालयात सादर करावी, अन्यथा असा कोणताही हक्क, मालकी, लाभ, हितसंबंध, हिस्सा, दावा आणि / किंवा मागणी, जर असेल तर, सोडून दिलेली आणि/किंवा त्यागलेली आहे असे मानले जाईल आणि असा कोणताही दावा अस्तित्वात नाही असे समजले जाईल.

**अनुसूची**
(सदर जमिनींचे वर्णन)

**प्रथम :**
गट क्र. ११४ मधील १-७३-८० हेक्टर मोठ्या जमिनीपैकी सुमारे ४३४ चौ. मीटर क्षेत्रफळाचा तो सर्व भूखंड, मुशेत गाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील, जिच्या सीमा खालीलप्रमाणे आहेतः
उत्तरेला : गट क्र. ११४ (भाग) — दक्षिणेला : गट क्र. आर. सी. एफ. रेल्वे लाईन
पूर्वेला : नदी (ज्याच्या पलीकडे गट क्र. १७३ आहे) — पश्चिमेला : गट क्र. ११२

**दुसरे:**
मुशेत गाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील गट क्र. १११/बी मधील ००-५७-७० हेक्टर क्षेत्रफळाचा तो सर्व भूखंडाचे सर्व ते भाग आणि विभाग, ज्याच्या सीमा खालीलप्रमाणे आहेतः
उत्तरेला : गट क्र. ११६ — दक्षिणेला गट क्र. १११/१/४/१ (पूर्वेकडील भाग)
पूर्वेलाः १११/१/४/१ (पूर्वेकडील भाग)
पश्चिमेला : नदी (ज्याच्या पलीकडे गट क्र. १११/१/४/१ च्या मधल्या भागाची जमीन आहे)

**तिसरे :**
मुशेत गाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील गट क्र. ११२/१ असलेला ०-४६-०० एच. आर. जमिनीचा तो सर्व भाग आणि विभाग, ज्याच्या सीमा खालीलप्रमाणे आहेतः
उत्तरेला : गट क्र. ११४ (भाग) — दक्षिणेला : आर. सी. एफ. रेल्वे लाईन
पूर्वेला : गट क्र. ११४ आणि (ज्याच्या पलीकडे गट क्र. १७३ आहे)
पश्चिमेला : गट क्र. १११/२ आणि गट क्र. १११/१/४/१ च्या नैऋत्य बाजूची जमीन.

**चौथे :**
मुशेत गाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील गट क्रमांक १७३ असलेली, ३-९३-४० हेक्टर क्षेत्रफळाची सर्व जमीनीचे सर्व ते भाग आणि विभाग, जिच्या सीमा खालीलप्रमाणे आहेतः
उत्तरेला : मुशेत गावचा गट क्र. ११५ आणि सतीरजे गावचे गट क्र. २८५ व २८६
दक्षिणेला : आर. सी. एफ. रेल्वे लाईन
पूर्वेला : गट क्र १११/१/४/१ (भाग) (ज्याच्या पलीकडे नदी आहे आणि त्यानंतर गट क्रमांक १११/१/४/१ च्या मधला भाग येतो)
पश्चिमेलाः नदी (ज्याच्या पलीकडे गट क्रमांक ११४ आहे)

**पाचवे :**
जिल्हा रायगड येथील गट क्र. १११/ए/४/१ असलेली, ६-३४-९७ एच. आर. क्षेत्रफळाची सर्व जमीन. आणि खालीलप्रमाणे सीमांकितः

**पूर्वेकडील जमीन -**
उत्तरेला : गट क्र. ११६ — दक्षिणेला : आर. सी. एफ. रेल्वे लाईन
पूर्वेला : नदी (ज्याच्या पलीकडे गट क्र. ११७, १२१ अ, १२३, १७२ आहेत)
पश्चिमेलाः नदी (ज्याच्या पलीकडे गट क्र. १११/अ/४/१ (मध्यवर्ती जमीन) आहे)

**मध्यवर्ती जमीन -**
उत्तरेला : सतीर्जे गावातील गट क्र. २७६ मधील येण्या-जाण्याचा हक्क
दक्षिणेला : आर. सी. एफ. रेल्वे लाईन
पूर्वेला : नदी (ज्याच्या पलीकडे गट क्र. १११/अ/४/१ ची पूर्वेकडील जमीन आहे)
पश्चिमेला : गट क्र. १७३

**नैऋत्येकडील जमीन -**
उत्तरेला : गट क्र. ११३ आणि गट क्र. १११ / २
दक्षिणेला : आर.सी.एफ. रेल्वे लाईन आणि गावातील रस्ता
पूर्वेला : ११२ (भाग) — पश्चिमेला : बामनसुरे गावातील गट क्र. १४९

**दिनांक १६ जुलै, २०२६**

**सही/-**
**कु. अझीझा खत्री**
**एएके लीगल**
**ॲडव्होकेट व सॉलिसिटर्स**
सर विठ्ठलदास चेंबर्स, ५०७-५०९, पाचवा मजला,
१६, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई- ४००००१.
ईमेलः aziza@aaklegal.in

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)**

ज.म.र. अर्ज ४४८/२०२६

**जाहीर नोटीस**

प्रति,
श्रीम. अंजली दशरथ जंगम
रा. मु. पो. साळाव, ता. मुरुड-जंजिरा, — अर्जदार
जि. रायगड

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्राम पंचायत साळाव, — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार श्रीम. अंजली दशरथ जंगम यांचा मुलगा कु. नितेश दशरथ जंगम जन्म दि. १०/६/२०१९ रोजी मोजे साळाव ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्राम पंचायत साळाव यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार श्रीम. अंजली दशरथ जंगम यांचा मुलगा कु. नितेश दशरथ जंगम यांचा जन्म दि. १०/०६/२०१९ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वत: किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक ३० जुलै २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १५/७/२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
तहसिलदार मुरुड-जंजिरा

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बिनशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मनोज नारायण खाडे, स्वप्ना मनोहर खाडे दोघे रा. सी ५०२, वनश्री को. ऑप. हौ. सोसायटी, प्रणय नगर मागे, वजिरा नाका, बोरिवली - पश्चिम, मुंबई ४०० ०९९ यांच्या नांवे असलेली वरकस मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा करार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | हि.नं. | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|---|
| रेवदंडा ता. अलिबाग | १२/४/अ | - | ०-०४-०६ | - |

या बिनशेती बिनआकारी मिळकतीपैकी ०-०१-०२ आर. चौ. मी. मिळकत व त्यामधील ग्रुप ग्रामपंचायत रेवदंडा घर क्र. २९०अ, ३४४ चौ. फूट या घर मिळकतीसह

सबब सदरहू बिनशेती घर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. या उपरही सदरहू वरकस मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहितआहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १५/०७/२०२६

सही/-
**ॲड. धिरज जयवंत म्हात्रे**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, आमचे अशिलानी मौजे आंबेपुर, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक १) नंदा बळीराम कदम २) सुचिता रमाकांत घाग ३) स्मिता चंद्रकांत पवार ४) सिध्दी गणेश बने ५) चेतना चंद्रकांत मोकाशी ६) महेश सदानंद जाधव ७) संजना सहदेव राणे ८) मेघना आशिष सावंत यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकानी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| आंबेपूर ता. अलिबाग जि. रायगड | ११३ | क्षेत्र ०-७५-०० पो.ख. ०-१०-०० एकूण ०-८५-०० | १५.१९ |

वर वर्णन केलेल्या मिळकती पैकी क्षेत्र ०-२१-०० हे. आर हि मिळकत या जाहीर नोटीशीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व विनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : १५/०७/२०२६

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. आंबेघर (पळी), पो. पोयनाड,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं. ९२७३२७३८४३/
९६३७२७००१९

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी पुढे नमुद केलेली मिळकत तिचे विद्यमान मालक सोनल सुनिल ताटेकर यांचेकडुन कायम खरेदी करण्याचे ठरवले असुन त्याबाबत विद्यमान मालक व आमचे आशिलामध्ये बोलणी चालु आहेत. मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे-

| गावाचे नाव | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| मौजे सावरोली, ता. मुरूड, जि. रायगड | ६१/३ | ०.६०.४ ०.०२.३ ०.६२.७ | ९.३८ |

सदरहु मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा अथवा व्यक्तींचा, कोणत्याही संस्थेचा, बँकेचा गहाण, दान, लिज, लिन, बक्षिस, खरेदी, साठेकरार, कोणताही करार, कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, पोटगी, मृत्युपत्र, अखत्यारपत्र, ताबा बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबंध, दिवाणीदावा, महसुल-वाद असल्यास त्याच्या लेखी हरकतीसह व कागदोपत्री प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत प्रत्यक्ष येवुन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वर नमुद मिळकती पूर्णतः निर्वेध व बीनजोखमी आहे असा भरवसा जमिन मालकांनी आमचे आशिलांना दिलेला आहे. सबब विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत न आल्यास सदरहु मिळकतींबाबत आमचे आशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १५.०७.२०२६

**श्री. अमित महेश्वर देशमुख**
ॲडव्होकेट आणि नोटरी,
सृष्टी बिल्डींग, वेधशाळेसमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

# ‘नमस्ते डे’ निमित्त स्वच्छतादूतांचा गौरव

## अलिबाग नगरपरिषदेचा अनोखा उपक्रम



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

‘‘आपले शहर स्वच्छ, सुंदर आणि निरोगी ठेवण्यासाठी स्वच्छता कर्मचारी अहोरात्र परिश्रम घेत असतात. त्यांच्या कार्याचा सन्मान करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. आधुनिक यंत्रसामग्रीच्या वापरातून त्यांना सुरक्षित आणि सन्मान्य कार्यपरिसर उपलब्ध करून देणे, हीच नमस्ते डेची खरी भावना आहे,’’ असे प्रतिपादन उपनगराध्यक्ष ॲड. मानसी म्हात्रे यांनी केले.

भारत सरकारच्या नॅशनल ॲक्शन फॉर मेकनाइज्ड सॅनिटेशन इकोसिस्टिम (नमस्ते) या उपक्रमांतर्गत दि.१४ जुलै रोजी देशभर नमस्ते डे साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधत अलिबाग नगर परिषदेतर्फे डॉ. नानासाहेब धर्माधिकारी सभागृहात विशेष सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपनगराध्यक्ष ॲड. मानसी म्हात्रे यांनी स्वच्छता कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करत नागरिकांना स्वच्छता, सुरक्षितता आणि मानवी सन्मानाचा संदेश दिला. तसेच, नमस्ते डेचा उद्देश स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सन्मान करणे, त्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेला प्राधान्य देणे, धोकादायक हाताने स्वच्छता पूर्णपणे बंद करून यांत्रिक स्वच्छता व्यवस्थेला प्रोत्साहन देणे हा आहे. या माध्यमातून स्वच्छता कर्मचाऱ्यांना सुरक्षित साधने, आधुनिक यंत्रसामग्री, प्रशिक्षण आणि सन्मानजनक कार्यपरिसर उपलब्ध करून देण्याचा संदेश देण्यात येतो. या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या निस्वार्थ सेवेला सलाम करत शहराच्या स्वच्छतेमागे त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे असल्याचे नमूद केले. स्वच्छता ही केवळ नगर परिषदेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाने ती स्वतःची सामाजिक जबाबदारी समजून शहर स्वच्छ ठेवण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. यावेळी नगराध्यक्षा अक्षया नाईक व उपनगराध्यक्ष ॲड. मानसी म्हात्रे यांच्या हस्ते अलिबाग नगर परिषदेतील स्वच्छता कर्मचारी तसेच शहरातील स्वच्छता अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी मोलाचे योगदान देणाऱ्या विविध व्यक्ती, संस्था आणि सहकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

> स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सन्मान म्हणजे त्यांच्या श्रमांचा आणि समाजासाठीच्या योगदानाचा गौरव होय. त्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अलिबाग नगर परिषद कटिबद्ध आहे.
> –अक्षया नाईक, नगराध्यक्षा, अलिबाग नगरपरिषद

या कार्यक्रमाला नगराध्यक्षा अक्षया नाईक, उपनगराध्यक्ष ॲड. मानसी म्हात्रे, नगरसेविका संध्या पालवणकर, ॲड. नीलम हजारे, नगरसेवक ॲड. ऋषिकेश माळी, जमालुद्दीन सय्यद, संदीप पालकर, इन्फिनिटी पब्लिक रिलेशन पनवेलचे अयुफ अकुला, के.एल.ई. महाविद्यालय पनवेलचे प्रतिनिधी, अलिबाग नगर परिषद उर्दू शाळेचे प्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी श्रीमती प्रियांका वाघ, नगर अभियंता संतोष मुंढे, स्वच्छता अभियंता प्रियांका मोरे, स्वच्छता निरीक्षक धनंजय आंब्रे, शहर समन्वयक आर्या जाधव, प्रकाश तांबे तसेच अलिबाग नगर परिषदेचे सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नागोठण्यातील पूरग्रस्तांना मदत




**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे नागोठणे व परिसरातील अनेक भागांमध्ये पूरजन्य परिस्थिती निर्माण झाली असताना रिलायन्स फाऊंडेशनने जिल्हा प्रशासनाच्या समन्वयाने व्यापक मदत मोहीम राबविली. रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड नागोठणेचे अध्यक्ष शशांक गोयल तसेच जनसंपर्क व शासकीय समन्वय विभागाचे प्रमुख अनिल डांगी यांच्या मार्गदर्शनाखाली मदतकार्य तात्काळ सुरू करण्यात आले. यावेळी मुंबई-गोवा महामार्ग, नागोठणे-रोहा मार्ग, नागोठणे-पेझारी मार्ग तसेच नागोठणे आणि परिसरातील अंतर्गत रस्त्यांवरील प्रभावित नागरिकांना मदतीचा हात देत पिण्याचे पाणी, अन्नपाकिटे आणि अत्यावश्यक मदत साहित्याचे वितरण करण्यात आले. जवळपास ८ हजार पॅकेजबंद पाण्याच्या बाटल्या आणि मोठ्या प्रमाणात अन्नपाकिटांचे वाटप करण्यात आले. मदतकार्य प्रभावीपणे राबविण्यासाठी चार स्वतंत्र वाहनांची नियुक्ती करण्यात आली होती. १०० हून अधिक कर्मचारी, स्वयंसेवक, क्षेत्रीय कार्यकर्ते आणि विविध विभागांतील प्रतिनिधींनी कार्य करून मदतकार्यात सहभाग नोंदविला.

## निवडक




### राहुल चव्हाण यांची बिनविरोध निवड

**खापोली :** रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी खालापूर नगरपंचायतीचे माजी नगरसेवक राहुल चव्हाण यांची नुकतीच बिनविरोध निवड झाली आहे. त्यांच्या निवडीमुळे खालापूर तालुक्यात तसेच शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून समर्थकांनी जल्लोष करत त्यांचे अभिनंदन केले. शेतकरी कामगार पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते असलेले राहुल चव्हाण यांची भटक्या व विमुक्त जाती प्रवर्गातून बेलदार समाजाचे प्रतिनिधी म्हणून प्रथमच रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर संचालक म्हणून निवड झाली आहे. त्यांच्या निवडीमुळे बेलदार समाजालाही जिल्हा पातळीवरील सहकार क्षेत्रात प्रतिनिधित्व मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे. निवडीनंतर राहुल चव्हाण यांनी आपल्या यशाचे श्रेय शेतकरी कामगार पक्षाचे नेते संतोष जंगम यांना देत, त्यांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल व संधी दिल्याबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त केले. तसेच, सहकार क्षेत्रातील शेतकरी, सभासद आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी प्रामाणिकपणे काम करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

### खड्डे बुजविण्याच्या कामाला सुरुवात



**चिरनेर :** उरण तालुक्यातील चिरनेर ते कोप्रोली या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या मार्गावर काही ठिकाणी खडी उखडून जीवघेणे खड्डे पडले होते. या खड्ड्यांमुळे वाहन चालकांचा प्रवास धोकादायक झाला होता. त्यामुळे या मार्गावरील खड्ड्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी चिरनेरचे माजी उपसरपंच सचिन घबाडी यांच्यासह येथील नागरिकांनी उरणच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे दामोदर पाटील यांच्याकडे केली होती. या बाबतचे वृत्त कृषीवलने मंगळवारी (दि.१४) प्रसिद्ध केले होते. त्याची दखल घेत उरणमधील सार्वजनिक बांधकाम खात्याने बुधवारी (दि.१५) या रस्त्याच्या खड्डे बुजविण्याच्या कामाला जोरदार सुरुवात केली आहे. त्यामुळे येथील प्रवासी नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, दैनिक कृषीवलचे माजी उपसरपंच सचिन घबाडी यांनी आभार व्यक्त केले आहेत. तसेच, या कामाची सार्वजनिक बांधकाम खात्याने तातडीने दखल घेतल्याबद्दल त्यांचेही घबाडी व येथील नागरिकांनी त्यांना धन्यवाद दिले.




## अत्याधुनिक फ्रँकिंग मशीनचे उद्घाटन



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग येथील कमळ नागरी सहकारी पतसंस्थेत ग्राहकांसह इतर वित्तीय संस्थांनाही आधुनिक, जलद व विश्वासार्ह गैर न्यायिक दस्तऐवज फ्रँकिंग सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने अत्याधुनिक दस्तऐवज फ्रँकिंग मशीनचे उद्घाटन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गिरीश तुळपुळे यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार चाळके, उपाध्यक्षा स्नेहा गांधी, सचिव लक्ष्मण जुंधारे, संस्थेचे सर्व संचालक मंडळ तसेच संस्थेचे उपमहाव्यवस्थापक रंजन पाटील यांच्यासह संस्थेचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी फ्रँकिंग मशीनच्या वापरामुळे संस्थेच्या व्यवहारात अधिक वेग, अचूकता व पारदर्शकता येणार असून, कार्यालयीन कामकाज अधिक कार्यक्षम होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला. आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून ग्राहकांना अधिक दर्जेदार व जलद सेवा देण्याच्या संस्थेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा हा एक महत्त्वपूर्ण टप्पा असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. या सुविधेचा लाभ केवळ कमळ नागरी सहकारी पतसंस्थेच्या ग्राहकांनाच नव्हे, तर रायगड जिल्ह्यातील इतर सहकारी पतसंस्था, सहकारी बँका, राष्ट्रीयीकृत बँका, खासगी बँका, विविध वित्तीय संस्था तसेच सर्वसामान्य नागरिकांनाही घेता येणार आहे. त्यामुळे परिसरातुलि सर्व वित्तीय संस्थांसाठी व नागरिकांसाठी ही सेवा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

## कार्मेल कॉन्व्हेंट स्कूलचे नेत्रदीपक यश

### रायगड जिल्हा गुणवत्ता यादीत मानाचे स्थान



**। खोपोली । प्रतिनिधी ।**

पुणे येथील महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्यावतीने इयत्ता पाचवी व आठवीसाठी शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात आली होती. या परिक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, खोपोलीतील कार्मेल कॉन्व्हेंट स्कूलच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन करत शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. तसेच, विद्यार्थ्यांनी खालापूर तालुक्यासह रायगड जिल्हा गुणवत्ता यादीत उल्लेखनीय स्थान मिळवत शाळेचा नावलौकिक उंचावला आहे.

यावेळी खोपोलीतील कार्मेल कॉन्व्हेंट स्कूलच्या इयत्ता पाचवीमधील पार्थ मोरे याने ७३.१ टक्के गुणांसह खालापूर तालुक्यात आणि रायगड जिल्ह्यात सहावा द्वितीय व रायगड जिल्ह्यात १८ वा क्रमांक पटकावला आहे. तर, अब्दुल्लाह किरकिरे (७२.४ टक्के) याने तालुक्यात तृतीय, गरिष्मा गाडगीळ (६७.७ टक्के) हिने चतुर्थ, शुभ्रा पाटील (६६.४ टक्के) हिने पाचवा, ऋषिता राठोड (६५.१ टक्के) हिने सहावा, शिवम शेठ (६३.० टक्के) याने सातवा आणि तानिष्का गावडे (५८.३ टक्के) हिने नववा क्रमांक मिळवला आहे. तसेच, इयत्ता आठवीमधील संस्कृती सकरे हिने ७५.८ टक्के गुणांसह खालापूर तालुक्यात प्रथम आणि रायगड जिल्ह्यात सहावा क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश मिळवले आहे. तर, आयू सोनपरोते (५५ टक्के) याने तालुक्यात द्वितीय, अभीरा बांद (५४.३ टक्के) हिने तृतीय आणि अदिती वानखडे (५३.६ टक्के) हिने चतुर्थ क्रमांक मिळवत शाळेच्या यशात मोलाची भर घातली आहे.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद आणि पालकांनी अभिनंदन केले. विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे प्रभावी मार्गदर्शन आणि पालकांचे सातत्यपूर्ण सहकार्य यामुळेच हे यश शक्य झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या निकालामुळे कार्मेल कॉन्व्हेंट स्कूलने शैक्षणिक क्षेत्रातील आपली उत्कृष्ट परंपरा पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे.

## सरस्वती एज्युकेशनला जप्तीची नोटीस




**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील चांदई येथे असलेल्या सरस्वती एज्युकेशन सोसायटीचे यादवराव तासगावकर शैक्षणिक संकुलावर बँक ऑफ इंडियाकडून जप्तीची नोटीस बजावण्यात आली आहे. ७८ कोटींच्या कर्जाचा बोजा तेथील जमिनीवर टाकण्यात आला असून, त्या नोटिसा या शैक्षणिक संकुलाच्या गेटवर चिकटवण्यात आल्या आहेत.

कर्जत तालुक्यातील चांधई येथील सरस्वती एज्युकेशन सोसायटीचे यादवराव तासगावकर शैक्षणिक संकुलावर घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी बँक ऑफ इंडियाच्या स्पेशलाइज्ड ॲसेट रिकव्हरी मॅनेजमेंट ब्रँचने जप्तीची नोटीस दिली. सरस्वती एज्युकेशन सोसायटीने घेतलेल्या सर्व कर्जाची परतफेड केली नसल्याने त्याविरुद्ध बँक ऑफ महाराष्ट्र कडून कारवाई सुरू करण्यात आली आहे. तब्बल ७८ कोटी २१ लाख २ हजार ५०४ रुपयांच्या प्रचंड थकबाकीमुळे थेट कॉलेजच्या मुख्य गेटवर कायदेशीर जप्तीची म्हणजेच पझेशन नोटीस चिटकवून संपूर्ण रायगड जिल्ह्यात एकच खळबळ उडवून दिली आहे. दि.१४ जुलै रोजी बँकेचे वरिष्ठ अधिकारी आणि वसुली करणारे एक मोठे पथक अचानक कॉलेजच्या आवारात दाखल झाले. त्यांनी आत येताच संपूर्ण कॉलेज प्रशासनाला आपल्या ताब्यात घेतले, तसेच या कारवाईची माहिती बाहेर जाऊ नये आणि कोणताही अडथळा येऊ नये म्हणून बँकेच्या पथकाने कॉलेजच्या सर्व कर्मचाऱ्यांचे मोबाईल फोन देखील काढून घेतले.त्यानंतर अनेक तास आतमध्ये कागदपत्रांची कसून चौकशी आणि छाननी सुरू ठेवली. बँकेने लावलेल्या अधिकृत कायदेशीर नोटीसमध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे.

## उद्यानांवर महापालिकेचा तिसरा डोळा



**। खांदा वसाहत । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिकेने सिडको प्रशासनाकडून हस्तांतरित झालेल्या ६३ उद्यानांच्या सुरक्षिततेसाठी मोठे पाऊल उचलले असून, सर्व उद्यानांमध्ये अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. तिसरा डोळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या यंत्रणेमुळे उद्यानांतील प्रत्येक हालचालीवर चोवीस तास नजर ठेवली जाणार आहे.

सकाळी आणि सायंकाळी ही उद्याने नागरिकांसाठी खुली असतात. दररोज हजारो नागरिक मॉर्निंग वॉक, व्यायाम, योगा, खेळ आणि विरंगुळ्यासाठी येथे येत असतात. लहान मुलांसाठी खेळण्याची साधने, ज्येष्ठ नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था आणि महिलांसाठी सुरक्षित वातावरण उपलब्ध असल्याने उद्यानांमध्ये नेहमीच गर्दी असते. मात्र, गेल्या काही वर्षांत काही उद्यानांमध्ये अश्लील चाळे, धूम्रपान, मद्यपान, विद्यार्थ्यांची वर्दळ, प्रेमीयुगुलांचा गैरवापर, मुलांमधील भांडणे, मारामाऱ्या, चोरी तसेच संशयास्पद व्यक्तींचा वावर अशा अनेक तक्रारी महापालिका आणि पोलिसांकडे प्राप्त झाल्या होत्या. विशेषतः शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी उद्यानांमध्ये मोठी गर्दी होत असल्याने सुरक्षा रक्षकांवर अतिरिक्त ताण निर्माण होत होता. एकट्या सुरक्षा रक्षकाला संपूर्ण उद्यानावर लक्ष ठेवणे कठीण जात होते. ही बाब लक्षात घेऊन प्रत्येक उद्यानात सुमारे १३ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येत असून, प्रवेशद्वार, मुलांचे खेळण्याचे विभाग, चालण्याचे मार्ग, बसण्याची ठिकाणे आणि इतर महत्त्वाच्या भागांवर बारकाईने नजर ठेवली जाणार आहे.

## आरोग्य शिबिराचे यशस्वी आयोजन



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाचे रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य विलास फडके यांच्या जन्मदिनानिमित्त बुधवारी (दि.१५) आरोग्य शिबीर आणि मोफत औषध वाटप करण्यात आले. या आरोग्य शिबिरासाठी न्यू इरा हॉस्पिटल वाशी, डी.वाय. पाटील आयुर्वेदिक हॉस्पिटल, १२ ब्रिक हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड व व्हाईट लोटस हॉस्पिटल कलंबोली यांच्यावतीने रुग्णांची मोफत तपासणी आणि औषध वाटप करण्यात आले. या आरोग्य शिबिराचा लाभ पनवेल पंचायत समिती गट नेरे विहिघर कोप्रोली आधी भागातील नागरिकांनी घेतला. यावेळी पनवेल महानगरपालिकेचे चिटणीस तथा स्वीकृत नगरसेवक प्रकाश म्हात्रे, तालुका चिटणीस राजेश केणी, एकनाथ म्हात्रे, धनंजय पाटील, कृष्णकांत पाटील, माधुरी गोसावी आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच, या आरोग्य शिबिराचे यशस्वी आयोजन ग्रुप ग्रामपंचायत चिपळीच्या माजी सरपंच कांता फडके यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नामदेव फडके, विष्णू फडके, महेंद्र भगत, विष्णू पाटील, विश्वासात पाटील, राजेश फडके, मिथुन पाटील, सनी फडके व माजी सरपंच अनंता फडके यांनी विशेष मेहनत घेऊन केले.

## शाळेसमोर बायो कंपोस्टचा ढीग

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

रिलायन्स कंपनीमधून दुर्गंधीयुक्त बायो कंपोस्ट हा टाकाऊ माल घेऊन जाणाऱ्या डंपरमधून नागोठण्यातील होली एंजल्स स्कूलच्या प्रवेश द्वारासमोरच बायो कंपोस्ट पडून त्याचा मोठा ढीग तयार झाला आहे. ही घटना बुधवारी (दि.१५) सकाळी घडली. कोणतीही खबरदारी न घेतल्याने, रिलायन्स कंपनी प्रशासनाच्या कमालीच्या हलगर्जीपणामुळे ही घटना घडली आहे. त्यामुळे स्थानिक नागरिक आणि शाळकरी विद्यार्थ्यांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत असून त्यांना नाक मुठीत घेऊन रस्त्यावरून जावे लागत आहे.

## हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांनी संघर्षाची भूमिका | प्रशासनाला जबाबदार धरण्याचा इशारा

# ९१ वर्षीय वृद्धावर उपोषणाची वेळ

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण पंचायत समितीच्या कथित मनमानी, एकतर्फी आणि अन्यायकारक कारभाराविरोधात हनुमान कोळीवाडा येथील ग्रामस्थांनी संघर्षाची भूमिका घेतली आहे. यावेळी ९१ वर्षीय प्रकल्पग्रस्त अनंत परदेशी यांच्यासह रविंद्र कोळी हे गुरुवारी (दि.१६) सकाळी १० वाजल्यापासून उरण पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसणार आहेत. या आंदोलनामुळे उरण तालुक्यातील प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.



उपोषणकर्त्यांचा आरोप आहे की, शेवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटनेच्या दबावाखाली येऊन प्रशासनाने कोणतीही वस्तुस्थिती न पडताळता निर्णय घेतल्यामुळे अनेक प्रकल्पग्रस्त कुटुंबांवर अन्याय झाला आहे. प्रशासनाने कायद्याचा आधार न घेता एकतर्फी कारवाई करून नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवर गदा आणल्याचा आरोपही करण्यात आला आहे. तसेच, जवाहरलाल नेहरू बंदर प्रकल्पांतर्गत पुनर्वसित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या घरांच्या व भूखंडांच्या हनुमान कोळीवाडा ग्रामपंचायतीतील तब्बल ३६ वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या नमुना क्रमांक ८ नोंदी कोणतीही कायदेशीर प्रक्रिया न राबविता अचानक रद्द करण्यात आल्या. या नोंदी तातडीने पूर्ववत करण्यात याव्यात, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे. त्याशिवाय न्यायप्रविष्ट असलेल्या प्रकरणातही काही घरांचे नळ कनेक्शन तोडून पाणीपुरवठा बंद करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच, ग्रामपंचायतीतील २०१२-१३ आणि २०२१-२३ मधील कथित गैरव्यवहारांची चौकशी, त्यासंदर्भातील अहवाल जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तातडीने सादर करावा, दोषींवर कारवाई करावी, तसेच मालमत्ता कर न भरता नागरी सुविधा घेणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी, अशाही मागण्या उपोषणकर्त्यांनी केल्या आहेत.

या आंदोलनाला महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आरोग्य सेवा कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य आरोग्य सहाय्यक/निरीक्षक कर्मचारी संघटना, तसेच राजकिय पक्षांच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. दरम्यान, एका ९१ वर्षीय वृद्ध प्रकल्पग्रस्ताला न्यायासाठी आमरण उपोषणावर बसण्याची वेळ येणे ही प्रशासनासाठी अत्यंत लाजिरवाणी बाब असल्याची प्रतिक्रिया या संघटनांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे आंदोलकांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, उपोषणादरम्यान आंदोलकांच्या प्रकृतीला काही अपाय झाला तर त्याची संपूर्ण जबाबदारी उरण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आणि संबंधित ग्रामपंचायत प्रशासनाची राहील. त्यामुळे आतात प्रशासन आंदोलकांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# शिते गेली, भुतेही चालली

असतील शिते तर जमतील भुते ही म्हण राष्ट्रवादी काँग्रेसवाल्यांसाठीच बहुदा जन्माला आली असावी. शरद पवार सत्तेची शिते देऊ शकत होते तोवर अनेक भुते त्यांच्याभोवती गोंडा घोळत उभी होती. पण काळाच्या ओघात पवारांचे वय झाले, त्यांची राजकीय ताकद कमी झाली. एरवी त्यांच्यासमोर उभे राहायला घाबरतील असे लोक राजकीय शहाणपणा कशात आहे ते सांगू लागले. त्याचाच एक भाग म्हणजे सध्या भाजपला पाठिंबा देण्याची निघालेली टूम. राष्ट्रवादीचे खासदार लोकसभेत महिला आरक्षण विधेयकावर भाजपच्या बाजूने मतदान करतील किंवा निदान अनुपस्थित राहून मदत करतील अशी चर्चा चालू आहे. भाजपसोबत गेल्याखेरीज कामे होणार नाहीत असे या खासदारांना वाटते. अनेक आमदारही फडणवीसांशी जुळवून घेण्याच्या मताचे आहेत असे म्हणतात. ऐन लढाईत सैनिकपदाचा राजीनामा देण्याची ही सर्व लक्षणे आहेत. शरद पवारांनी काँग्रेसपासून वेगळे होऊन स्वतःच्या हिमतीवर हा पक्ष उभा केला. राज्यातच नव्हे तर देशात त्याची ओळख निर्माण केली. पण भाजपचे सत्तेच्या गुंडगिरीचे राजकारण सुरु झाले आणि सर्व चित्र बदलले. रस्त्यावरचा गुंड आपल्या मवाली साथीदारांच्या मदतीने लोकांना भीती घालतो आणि लुटतो. भाजपवाले इडी, सीबीआय यांच्या केसेसची भीती घालून विरोधकांचे राजकारण संपवतात. शरद पवार याला पुरे पडू शकले नाहीत. खुद्द त्यांचाच पुतण्या त्यांच्या विरोधात गेला. पवारांनी त्यांच्या अगदी तरुणपणात इंदिरा गांधी, काही काळ राजीव गांधी व नंतर सोनिया गांधी यांच्या विरोधात जाऊन स्वतःचा पक्ष बांधला व उभा केला. पण भाजपच्या दंडेलशाहीने समीकरणे बदलली. काही भुते पलिकडे गेली. तरीही पवारांचे सामर्थ्य असे होते की २०२४ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये त्यांच्या पक्षाला मोठे यश मिळाले. तेव्हा अजित पवारांच्या गटाचा दारुण पराभव झाला आणि खुद्द सुनेत्रा पवारही बारामतीतून हरल्या. पण विधानसभा निवडणुकीनंतर चित्र बदलले. शरद पवारांकडे आणि ते ज्या बाजूला उभे आहेत त्या महाविकास आघाडीकडे फारशी शिते गोळा होण्याची शक्यता नाही असे अनेकांना वाटू लागले. सबब तेही आता भाजप आघाडीच्या मांडीवर जाऊन बसायला तयार झाले.

### अस्वस्थ आत्मे

भाजपच्या विरोधकांना सध्या प्रतिकूल काळ आहे हे खरेच आहे. पण शेवटी, तत्व म्हणून काही एक गोष्ट असते. एरवी छत्रपती आणि शाहू, फुले, आंबेडकरांचे नाव घ्यायचे आणि दुसरीकडे भाजपचे धर्मांध, मुस्लिमद्वेष्टे, समाजात आग लावणारे राजकारण जवळ करायचे यासाठी भयंकर ढोंगीपणा हवा. तो करायला पवारांचे शिलेदार तयार आहेत, नव्हे उतावीळ आहेत. याच दरम्यान, खुद्द अजितदादांच्या पक्षातली भुतेही वेगळ्या शितांच्या शोधात आहेत. दादा गेल्यानंतर पक्ष विस्कळीत झाला आहे. सुनेत्रा पवार यांच्यातले नेतृत्वाचे गुण अजून तरी दिसलेले नाहीत. त्यांचे चिरंजीव पार्थ यांची समज कितपत आहे याविषयीच शंका आहे. अशा स्थितीत तिथे प्रफुल्ल पटेल यांनी बगावतीचे संकेत दिले आहेत. पटेल यांना पार्थ यांनी निर्णय प्रक्रियेतून बाजूला केले आहे. दिल्लीच्या दरबारी राजकारणात केंद्र सरकार, उद्योगपती इत्यादींमध्ये काम करणारे अनेक दलाल राजकारणी म्हणून वावरतात व प्रबळ होतात. पटेल हे त्यापैकीच एक. त्यामुळे अजितदादा हयात असतानाही प्रफुल्ल पटेल व दादांचे फार सख्य नव्हते. पण दिल्लीतल्या हिशेबांपायी त्यांना सहन केले जात होते. आता पार्थ यांनी सूत्रे हाती घेतल्यावर पटेलांनी फणा काढून भीती दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. अजितदादा गेल्यापासून राष्ट्रवादीतील अनेक नेते सैरभैर आहेत हे खरे आहे. दादांनंतर पक्ष टिकेल का ही भीती त्यांना वाटते. एकनाथ शिंदे यांच्या गटाच्या तुलनेत आपला टिकाव लागणार नाही व ताकद आणखी कमी होईल अशी भीती त्यांना वाटते. अगदी दादा हयात असतानाही हा गट पुणे, सोलापूर, सातारा इतपतच मर्यादित राहिला होता. आता तर तो आणखी संकुचित होत आहे. थोडक्यात दादांनी मिळवलेली शिते संपत आली आहेत. त्यामुळे त्यांच्या भोवती जमा झालेली भुते अस्वस्थ आहेत. त्यात रायगडचे काही नेतेही आहेत. आपण बाजूबाजूने राजकारण करण्यापेक्षा थेट भाजपमध्येच का जाऊ नये असे या अस्वस्थ आत्म्यांना वाटू लागले आहे. धर्मनिरपेक्षता व किमान काही एका न्यायाचे राजकारण करणे हे शरद पवारांची ओळख होती. ती पुसून टाकण्यात काही वावगे आहे असे या आत्म्यांना बिलकुलच वाटत नाही. भाजपवाले यांना घेणार का व कोणत्या स्थितीत घेणार हाच यातला कळीचा मुद्दा आहे.

### बिनकामाची भुतावळ

प्रफुल्ल पटेल यांनी अलिकडेच मुंबईतले काही पत्रकार गोळा केले. त्यांना मुद्दाम काही गोष्टी सांगितल्या. अजितदादांच्या जाण्याने पक्षात निर्माण झालेली पोकळी भरून काढणे कठीण आहे. पक्षात अस्वस्थता असून सुधारणांची गरज आहे असे ते म्हणाले. याच दिवशी सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षपदाची निवड बेकायदेशीर आहे अशी याचिका कोण्या एका इसमाने केली. या योगायोग असू शकत नाही. आता पटेल किंवा सुनील तटकरे वगैरे मंडळी त्याच्यापासून आपला पदर झाडायचा प्रयत्न करीत आहेत. पण पटेलांचे वक्तव्य आणि ही याचिका एकाच दिवशी कशी येते हा प्रश्न बाकी उरतोच. पटेल किंवा त्यांचे जे कोणी छुपे दोस्त आहेत त्यांना पार्टीत सुधारणा करायच्या असतील तर आत राहून शांतपणेही करता येतील. त्यासाठी जाहीर भांडणे किंवा खरे तर लावालाव्या करायची गरज नाही. पटेलांना स्वतःचा असा काही पाया नाही. शरद पवारांच्या आडोशाने आयुष्यभर ते वावरले. तरीही ते पार्टीतल्या एका गटाच्या वतीने बोलल्यासारखे करीत आहेत. यामागे त्यांचा बोलविता धनी भाजपमध्ये तर बसलेला नाही अशी शंका येणे रास्त आहे. किंबहुना, सुनेत्रा पवार यांच्यावर दबाव ठेवायचा, राष्ट्रवादी जिवंत ठेवायचा पण ताकद मात्र क्षीण करायची असे हे डावपेच असू शकतात. शरद पवार गटाप्रमाणे अजितदादांच्या गटातही आता काही जणांना थेट भाजपमध्ये जाण्याचे डोहाळे लागलेले आहेत. दुसरीकडे शरद पवार गटातले लोक तर इतके उतावीळ आहेत की, अजितदादा गटात विलीन होऊ असे म्हणत आहेत. आपण इतकी वर्षे कोणती तत्वे घेऊन उभे राहिलो, मतदारांनी आपल्याला काय म्हणून निवडून दिले याची यत्किंचितही लाज न बाळगता हे सर्व चालले आहे. अशा सत्वहीन राजकारणामुळेच महाराष्ट्र हा देशातील मागास राज्यांपैकी एक होत जाणार आहे. आज मिसिंग लिंकवर दरड कोसळली तरी टीका करायची नाही, केली तर तो महाराष्ट्राचा अपमान ठरेल असे मुख्यमंत्री बजावून सांगत आहेत. मी म्हणजेच महाराष्ट्र असा उद्दामपणा निर्माण झाला आहे. असल्या उद्दामांच्या व बेमुर्वत लोकांच्या वळचणीला जाऊन बसावे आणि काय मिळेल ते पदरात पाडून घ्यावे असे राष्ट्रवादीवाल्यांचे राजकारण चालू आहे. यांनी टिळा कोणताही लावला किंवा बदलला तरी ही भुतावळ मराठी लोकांच्या कामाची नाही.

## विचार

# भारताच्या निर्यातीला युरोपचा आधार

***रशिया-युक्रेन युद्ध, पश्चिम आशियातील संघर्ष, पुरवठा साखळीतील अडथळे, आणि चीनमधील आर्थिक मंदीमुळे जगभरातील व्यापाराचे समीकरण बदलले आहे. अशा परिस्थितीत भारताच्या निर्यात क्षेत्राने युरोपीय बाजारपेठेत आपले स्थान अधिक मजबूत केले आहे. मात्र युरोपमधून भारतात होणाऱ्या आयातीतही लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे व्यापार वाढत असला तरी व्यापार संतुलनाचा प्रश्न गंभीर बनत आहे.***



**हेमंत देसाई**

युरोपकडे वाढणाऱ्या निर्यातीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला अनेक स्तरांवर लाभ होत आहेत. उत्पादन क्षेत्र मजबूत झाल्यास भारताचा आर्थिक विकास अधिक शाश्वत होऊ शकतो. सेवाक्षेत्रानंतर उत्पादन क्षेत्र निर्यातीचा प्रमुख आधार बनू लागल्याची चिन्हे दिसत आहेत; मात्र या यशाच्या चित्रात काही गंभीर प्रश्नही दडलेले आहेत. युरोपमधून भारतात होणाऱ्या आयातीतही सातत्याने वाढ होत आहे. यंत्रसामग्री, औद्योगिक उपकरणे, वैद्यकीय तंत्रज्ञान, संरक्षण साहित्य, विमान उद्योगासाठी आवश्यक घटक, उच्च तंत्रज्ञानाची उत्पादने आणि विशेष रसायने यांची आयात मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. भारताचा औद्योगिक विकास वेगाने होत असला, तरी अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये आपण अजूनही परदेशी तंत्रज्ञानावर अवलंबून आहोत. त्यामुळे निर्यात वाढत असली तरी आयातीचे बिलही त्याच वेगाने वाढत आहे. औषध उद्योगाने युरोपमध्ये विश्वासार्ह पुरवठादार म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. कोविडनंतर जगाने भारताच्या औषधनिर्मिती क्षमतेचा अनुभव घेतला आणि त्यानंतर भारतीय औषधांना युरोपमध्ये अधिक मागणी निर्माण झाली. त्याचबरोबर इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनातील वाढ, मेक इन इंडिया उपक्रम, उत्पादनाशी निगडित प्रोत्साहन योजना आणि जागतिक कंपन्यांची चीनवरील अवलंबित्व कमी करण्याची रणनीती याचा थेट फायदा भारतीय निर्यातीला होत आहे. युरोपमधील ग्राहकांमध्ये पर्यावरणपूरक आणि गुणवत्तापूर्ण उत्पादनांची मागणी सातत्याने वाढत आहे. भारतीय कंपन्यांनीही हरित उत्पादन, कार्बन उत्सर्जन कमी करणे, गुणवत्ता मानके आणि डिजिटल ट्रेसिबिलिटी यावर भर दिल्यामुळे त्यांना युरोपमध्ये अधिक संधी उपलब्ध होत आहेत.

भारताची उत्पादनक्षमता आणि तुलनेने स्पर्धात्मक किंमत हे देखील महत्त्वाचे बलस्थान ठरत आहे. विशेषतः उच्च मूल्याच्या यंत्रसामग्री आणि प्रगत तंत्रज्ञानासाठी युरोपवरील अवलंबित्व कायम आहे. भारतीय उद्योगांच्या आधुनिकीकरणासाठी ही आयात आवश्यक असली तरी दीर्घकालीन दृष्टीने देशांतर्गत संशोधन, तंत्रज्ञान विकास आणि उत्पादन क्षमता वाढवणे तितकेच गरजेचे आहे. अन्यथा, व्यापारातील तूट कायम राहण्याचा धोका आहे. भारत आणि युरोपीय महासंघ यांच्यात सुरू असलेल्या मुक्त व्यापार कराराच्या (एफटीए) वाटाघाटी या पार्श्वभूमीवर अधिक महत्त्वाच्या ठरतात. हा करार झाल्यास भारतीय उत्पादनांना युरोपमध्ये अधिक सुलभ प्रवेश मिळेल. अनेक उत्पादनांवरील आयात शुल्क कमी होईल आणि भारतीय उद्योगांची स्पर्धात्मकता वाढेल. त्याचवेळी युरोपियन कंपन्यांनाही भारतात मोठी बाजारपेठ उपलब्ध होईल. त्यामुळे व्यापाराचा विस्तार निश्चित होईल; मात्र भारतीय उद्योगांचे हित जपणाऱ्या अटींसह हा करार होणे अत्यावश्यक आहे. युरोप आता केवळ व्यापार भागीदार राहिलेला नाही. हवामानबदल, हरित ऊर्जा, डिजिटल अर्थव्यवस्था, कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर, स्वच्छ तंत्रज्ञान आणि शाश्वत विकास या क्षेत्रांमध्येही भारत आणि युरोपमधील सहकार्य वाढत आहे. त्यामुळे व्यापाराला नव्या स्वरूपाची जोड मिळत आहे. मात्र युरोपने लागू केलेला 'कार्बन बॉर्डर ॲडजस्टमेंट मेकॅनिझम' (सीबीएएम) भारतीय निर्यातदारांसाठी भविष्यात मोठे आव्हान ठरू शकते. स्टील, ॲल्युमिनियम, सिमेंट यांसारख्या उत्पादनांच्या निर्यातीवर अतिरिक्त कार्बन खर्च लागू होऊ शकतो. त्यामुळे भारतीय उद्योगांना हरित उत्पादन प्रक्रियेकडे वेगाने वळावे लागेल.

युरोपकडे निर्यात वाढत असताना भारताने काही बाबींवर विशेष भर देणे आवश्यक आहे. उत्पादनखर्च कमी करणे, लॉजिस्टिक्स अधिक कार्यक्षम करणे, बंदरांची क्षमता वाढवणे, गुणवत्ता प्रमाणपत्रांची प्रक्रिया सुलभ करणे आणि सूक्ष्म, लघु तसेच मध्यम उद्योगांना (एमएसएमई) युरोपियन बाजारपेठेतील नियम समजावून देणे ही काळाची गरज आहे. निर्यात वाढवायची असेल तर केवळ मोठ्या उद्योगांवर अवलंबून राहून चालणार नाही. लघुउद्योगांना जागतिक मूल्यसाखळीत सामील करणे आवश्यक आहे. त्याच वेळी आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी देशांतर्गत उत्पादनाला अधिक चालना देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. संशोधन आणि विकासासाठी अधिक गुंतवणूक, उच्च तंत्रज्ञानाचे स्थानिकीकरण, कौशल्य विकास आणि नवोन्मेष यांना प्राधान्य दिल्याशिवाय भारत दीर्घकालीन व्यापार संतुलन साधू शकणार नाही. भारताची निर्यात वाढत असणे ही नक्कीच समाधानाची बाब आहे. युरोपसारख्या विकसित बाजारपेठेत भारतीय उत्पादनांना मिळणारा प्रतिसाद हा भारतीय उद्योगांच्या क्षमतेचा पुरावा आहे; परंतु निर्यातीत वाढ झाली म्हणून सर्व प्रश्न सुटले, असे समजणे चुकीचे ठरेल. वाढत्या आयातीमुळे व्यापार तूट वाढण्याचा धोका कायम आहे. त्यामुळे अधिक निर्यात आणि 'स्मार्ट आयात' या दोन्हींचा समतोल राखणारे धोरण आवश्यक आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचे पुढील दशक हे जागतिक व्यापारातील स्थान अधिक मजबूत करण्याचे दशक ठरू शकते. त्यासाठी युरोपसारख्या बाजारपेठांमध्ये दीर्घकालीन उपस्थिती निर्माण करणे, तंत्रज्ञानात स्वावलंबन वाढविणे आणि उच्च मूल्यवर्धित उत्पादनांवर भर देणे गरजेचे आहे.

निर्यात हे केवळ परकीय चलन मिळवण्याचे साधन नसून देशाच्या औद्योगिक सामर्थ्याचे प्रतिबिंब असते. त्यामुळे युरोपमधील वाढती निर्यात ही भारतासाठी निश्चितच आशादायी संधी आहे; मात्र तिचे रूपांतर दीर्घकालीन आर्थिक सामर्थ्यात करायचे असेल, तर वाढत्या आयातीचे व्यवस्थापन आणि स्पर्धात्मक उत्पादनक्षमता यांवर तितक्याच गांभीर्याने काम करावे लागेल. हाच भारताच्या पुढील आर्थिक प्रवासाचा खरा मार्ग ठरणार आहे. नीती आयोगाच्या ताज्या अहवालानुसार, भारताचा आयात-निर्यात व्यापार फोफावत आहे. जानेवारी ते मार्च २०२६ या तिमाहीमध्ये एकूण व्यापार ५.४ टक्क्यांनी वाढून, तो १.८४ ट्रिलियन डॉलर्सवर पोहोचला आहे. परंतु चिंतेची बाब म्हणजे, निर्यातीपेक्षा (४.२ टक्के) आयात (६.५ टक्के) अधिक वेगाने वाढत आहे. म्हणजेच भारताचे बाह्य अवलंबित्व जास्त आहे. वेगवेगळ्या वस्तूंची निर्यात २.८ टक्क्यांनी घटून, ११२ अब्ज डॉलर्सवर आली आहे. तर आयात जवळपास बारा टक्क्यांनी वाढून १९५ अब्ज डॉलर्सवर जाऊन पोहोचली आहे. उत्पादनक्षेत्र अजूनही दबावाखाली आहे आणि सेवाक्षेत्र, विशेषतः आयटी व डिजिटल सेवा यांनी भारताला आधार दिला आहे. त्याचप्रमाणे विद्युत यंत्रसामग्री, अणुभट्टी, खनिज इंधन, लोह व पोलाद आणि वाहने यांच्या निर्यातीत लक्षणीय वाढ झाली आहे. तर आयातीमध्ये सर्वाधिक वेगाने सोने आणि चांदी यांच्यात उल्लेखनीय वाढ झाली असून ही काळजी करण्यासारखीच बाब आहे.

आज चीन आणि रशियाकडून होणारी आयात वाढत असून भारत जगातील आठवा सर्वात मोठा सेवा निर्यातदार देश बनला आहे. या पार्श्वभूमीवर भारत आणि अमेरिका यांच्यातील बहुप्रतीक्षित द्विपक्षीय व्यापार कराराची चर्चा पूर्ण झाली आहे. परंतु भारताला चीन, व्हिएतनाम किंवा बांगालदेशसारख्या प्रतिस्पर्धी देशांच्या तुलनेत कमी आयात शुल्काचा लाभ मिळत नाही, तोपर्यंत हा करार लागू केला जाणार नाही, असे केंद्रीय वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांनी स्पष्ट केले आहे. जागतिक व्यवस्थेत सध्या मोठीच उलथापालथ सुरू आहे. अशा काळात भारत आणि युरोपीय महासंघ म्हणजेच ईयू यांच्यातील भागीदारी हा स्थिरतेचा आधारस्तंभ ठरेल. गेली १८ वर्ष रखडलेला भारत-ईयू एफटीए किंवा मुक्त व्यापार करार झाल्यामुळे मात्र जगाचे अर्थकारण बदलणार आहे. हा करार म्हणजे जगातील दोन अर्थव्यवस्थांमधील समन्वयाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. हा करार जागतिक देशांतर्गत उत्पादनाच्या २५ टक्के आणि जागतिक व्यापाराच्या एकतृतीयांश भागाचे प्रतिनिधित्व करतो. यामुळे युरोपीय निर्यातदारांसाठी दरवर्षी चार अब्ज युरो इतक्या आयात शुल्कात भारत कपात करणार आहे. परंतु त्याच वेळी ईयू हा वस्तूव्यापाराच्या बाबतीत भारताचा सर्वात मोठा भागीदार असून त्यामुळे भारतात आणि युरोपमध्ये लाखोंची रोजगारनिर्मिती होणार आहे.

## चर्चा आजची

# पाऊस शेतकऱ्याचा मित्र की शत्रू?



**संतोष राऊळ**

यंदा पावसाने तब्बल एक महिना उशीरा हजेरी लावली. त्यामुळे जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांची पेरणीची कामे खोळंबली होती. दरवर्षी पेक्षा यंदा पावसाने महिना उलटला तरी दमदार हजेरी न लावल्याने शेतकरी प्रचंड चिंतेत पडला होता. त्यानंतर जुन महिन्याच्या शेवटाला पावसाने दमदार सुरूवात केली. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. परंतु, हा पाऊस एवढा दमदार बरसला की त्याने रस्ते, घरं, झाडे यांच्यासह शेती देखील वाहून नेली. पावसाच्या सुरूवातील सुखावलेल्या शेतकऱ्यांनी लगेचच शेतात पेरणी केली. काही दिवसांत राबही डोलू लागला. मात्र, पुढील काही दिवस पडलेल्या दमदार पावसामुळे नदी किनारी असलेल्या गावांतील पेरणी केलेली शेती पुर्णपणे पाण्याखाली गेली. डोंगर आणि नद्या नाल्यांमधून वाहून आलेली माती त्या राबावर बसली. त्यामुळे त्याच्यांवर दुबार पेरणीची वेळ आली. मात्र, काही भागांतील शेती पाण्याखाली गेली नसली, तरी गेल्या काही दिवसांपासून पावसाने दांडी मारल्यामुळे तो राबही धोक्यात आला आहे. त्यामुळे पाऊस पडला तरी संकट आणि नाही पडला तरी संकट शेतकऱ्यांवर घोंगावत आहेत. त्यामुळे पाऊस शेतकऱ्याचा मित्र की शत्रू, असा प्रश्न सर्वांनाचा भेडसावत आहे.

दरवर्षी जुन महिन्याच्या सुरूवातीला पावसाची सुरूवात होते. त्यामुळे मे महिन्यात राब जाळून मग भाताचे बियाणे आणि खतांची खरेदी केली जाते. त्यानंतर पहिला पाऊस पडला की, शेतकरी पेरणीला सुरूवात करतो. त्यानंतर मुसळधार पावसाची सुरूवात झाली की, शेतकऱ्याला लावणीचे वेध लागतात. आणि दिवाळी झाली की कापणीला सुरूवात होते. गेल्या काही वर्षांपूर्वी सर्वकाही नियोजनपुर्वक होत असे. परंतु, हल्ली प्रत्येक शेतकऱ्याने केलेले योग्य नियोजन देखील चुकीचे ठरत आहे. कारण काही वर्षांपासून पावसाने स्वतःचेच वेळापत्रक पार बदलवून टाकले आहे. त्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे निसर्गात होणारे बदल. हल्ली विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात वृक्ष तोड होत आहे. त्यामुळे त्याचा मोठा परिणाम पावसावर होत आहे. जुन महिन्याच्या सुरूवातीला सुरू होणाऱ्या पावसाने गेल्या वर्षी एप्रिल महिन्यापासूनच सुरूवात केली होती. आणि यंदा त्याने जून महिन्याच्या शेवटी शेवटी मुसळधार कोसळायची सुरूवात केली. जे जुने जाणते शेतकरी आहेत ते जुन महिन्याच्या सुरूवातीला पडणाऱ्या पावसाच्या हिशोबाने तय्यारी करत असतात. गेल्या वर्षी शेतकऱ्याला राब जाळता आला नाही आणि यंदा वेळेत शेताची मशागत उरकूनही शेतकऱ्याच्या नशिबी चिंताच आली आहे.

एकेकाळी रायगड जिल्ह्याला भाताचे कोठार बोलले जायचे. परंतु, तेच कोठार आता हळूहळू रिकामे होत चालले आहे. त्याला मोठे कारण म्हणजे विकास. खरंतर एखाद्या परिसराचा विकास होणे काळाची गरज आहे. परंतु, त्याच विकासात निसर्गावर घाला घालत असू तर ते आपल्यासाठीच हानिकारक आहे. सध्या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात रस्ते बनविले जात आहेत. शेतजमिनींवर भराव टाकून बंगले, फार्महाऊस बांधले जात आहेत. मोठंमोठे प्रकल्प बांधले जात आहेत. त्यासाठी मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल केली जात आहे. डोंगरच्या डोंगर पोखरले जात आहेत. याचा परिणाम निसर्गावर होत आहे. त्यामुळेच पावसाच्या वेळापत्रकात दरवर्षी बदल होत आहे. त्याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. त्यामुळे बहुतांश शेतकरी शेतीकडे पाठ फिरवताना दिसत आहे. आपाल्या पाल्याला स्वतःच्या शेतात राबविण्याऐवजी नोकरीकरून परक्याच्या हाताखाली राबविण्यासाठी भाग पाडले जात आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेती देखील संकटात सापडत चालली आहे.

तसं जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांना दुबार शेतीचा पर्याय आहे. परंतु, पाऊसच वेळेत किंवा पुरेसा पडला नाहीतर धरणं वेळेआधिच रिकामी होतात. आणि अति पाऊस पडला की तिच धरणं वेळेआधी फुल्ल होऊन त्यातील पाणी शेतकऱ्यांच्या शेतात घुसते. त्यामुळे पाऊस पडला काय आणि नाही पडला काय, मरण मात्र शेतकऱ्यांचच होत आहे. त्यामुळे भविष्यात ही परिस्थिती अधिकच बिकट होण्याची भिती वर्तविली जात आहे. त्यामुळे नाहिलाजाने शेतकऱ्याला शेतीकडे पाठ फिरविण्याशिवाय पर्याय उरणार नाही. त्यामुळे शेती टिकविण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याची गरज आहे. परंतु, तसे होताना दिसत नसल्याने शेतकऱ्यांमधून नाराजी व्यक्त होत आहे.

## लोकसंसद


### मुंबईच्या 'बेस्ट' बससेवेची ऐतिहासिक शताब्दी!

१५ जुलै १९२६ रोजी दक्षिण मुंबईच्या कुलाबा येथील अफगाण चर्च आणि क्रॉफर्ड मार्केट यांना जोडणारी पहिली 'बेस्ट' बस सेवा सुरू झाली. त्या केवळ एका मार्गावर २४ बसेसच्या ताफ्यासह सुरू झालेल्या मुंबईच्या प्रतिष्ठित बेस्ट बस सेवेला १५ जुलै रोजी १०० वर्षे पूर्ण झाली. या बस सेवेला त्या काळात प्रवाशांचा उदंड प्रतिसाद मिळाला आणि पहिल्याच वर्षी सुमारे ६ लाख प्रवाशांनी यातून प्रवास केला. आज १०० वर्षानंतर 'बेस्ट' उपक्रमाकडे एकूण २८०४ बसेसचा ताफा असून त्याद्वारे मुंबई, ठाणे, मीरा-भाईंदर आणि नवी मुंबई परिसरामध्ये ४०० हून अधिक मार्गांवर दररोज सुमारे २५ लाख प्रवासी प्रवास करतात. या १०० वर्षांच्या काळात बेस्ट सेवेला अनेक प्रशासकीय, राजकीय, आर्थिक आणि तांत्रिक स्थित्यंतरातून जावे लागले. ८ डिसेंबर १९३७ रोजी बेस्टच्या ताफ्यात दुमजली (डबलडेकर) बसेस सामील झाल्या. स्वातंत्र्याच्या काही दिवस आधी म्हणजे ७ ऑगस्ट १९४७ रोजी 'बेस्ट' उपक्रम अधिकृतपणे मुंबई महानगरपालिकेच्या अधिपत्याखाली आला. अलिकडच्या काळात साध्या बसेस, वातानुकूलित बसेस आणि पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक बसेसनी बेस्टची सेवा अधिक वेगवान, आरामदायी आणि प्रदूषणमुक्त झाली आहे. 'मुव्हीट ॲप', 'चलो ॲप' सारख्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे प्रवाशांचा प्रवास अधिक सुकर झाला आहे. अतिवृष्टी असो, मुंबईवरील संकट असो की रोजची धावपळ, 'बेस्ट'च्या कर्मचाऱ्यांनी नेहमीच मुंबईकरांना अविरत सेवा दिली आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## दिनविशेष

# मराठी साहित्यिक वा. कृ. चोरघडे



वामन कृष्ण तथा बापूसाहेब चोरघडे हे मराठी लघुकथा लेखक होते. त्यांचा जन्म १६ जुलै १९१४ रोजी नागपूर जिल्ह्यातील नरखेड गावी झाला. कथासंग्रहांशिवाय त्यांनी सुमारे ९२ ललितलेख, चरित्रे, प्रबंध, पाठ्यपुस्तके, इ. लिहिले तसेच त्यात योगदान दिले. त्यांनी नागपूरला कला शाखेत बी. ए. केले तर अर्थशास्त्र या विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले.

पुढे काही काळ त्यांनी शिक्षा मंडळ, वर्धा येथील गोविंदराम सेक्सारिया वाणिज्य महाविद्यालयात अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. तसेच ते नागपूरच्या गोविंदराम सेक्सारिया अर्थवाणिज्य महाविद्यालयात उपप्राचार्य होते. ते दोन वर्षे महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळाचे अध्यक्ष होते. एम.ए. झाल्यावर वामन चोरघडे यांना वर्ध्याला शिक्षकाची नोकरी मिळाली. त्यावेळी त्यांनी गांधीजींच्या आवाहनाला साद देऊन स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेतली. त्यांना दोन वेळा कारावास घडला. कारावासामध्ये दादा धर्माधिकारी, विनोबा भावे, काका कालेलकर, महादेवभाई देसाई अशा व्यक्तींचा परिचय झाला. तुरुंगात त्यांनी खादीचे व्रत घेतले व मृत्यूपर्यंत पाळले. चोरघडे हे नेहमी खादीचा कुडता, पायजमा अशा स्वतः धुतलेल्या स्वच्छ पांढऱ्या वेषातच असत.या दरम्यान त्यांचा महात्मा गांधी, काका कालेलकर, दादा धर्माधिकारी, विनोबा भावे यांच्याशी जवळून संबंध आला. वामनरावांच्या मनावर गांधी-विनोबांच्या तत्त्वज्ञानाचा मोठा प्रभाव होता. वामनरावांचा पहिला कथासंग्रह 'सुषमा' त्यानंतर 'हवन', 'यौवन', 'प्रस्थान', 'पाथेय', 'संस्कार', 'नागवेल', 'मजल', 'बेला', 'ख्याल', 'ओला दिवस' असे कथासंग्रह त्यांच्या खाती जमा आहेत. वामनराव प्रतिभावंत कथाकार होते.

कॉलेजात असताना चोरघडे त्यांची पहिली लघुकथा कथा अम्मा १९३२ साली प्रसिद्ध केली. त्यानंतर पारिजात, प्रतिभा, सत्यकथा, ज्योत्स्ना, कला इ. विविध वृत्तींच्या वाङ्मयीन नियतकालिकांतून त्यांनी प्रामुख्याने कथालेखन केले.

'साने गुरुजींचे ओझरते जीवन दर्शन', 'अहिंसेची साधना', 'अहिंसा विवेचन', 'भारताचा आधुनिक आर्थिक इतिहास' या कथेतर लेखनातून-ग्रंथांतून वामनरावांनी आपल्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव टाकणाऱ्या व्यक्तींचे आणि तत्त्वज्ञानाचे मार्मिक विवेचन केलेले आहे. वामनराव पुढे गांधीवादी लेखक म्हणूनही ओळखले जायचे. १९७९ मध्ये विदर्भातील चंद्रपुरात संपन्न झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद वामनरावांनी भूषविले.

महाराष्ट्रातचे मंत्री रामकृष्ण पाटील यांनी चोरघड्यांना मानद अन्नपुरवठा अधिकारी हे पद दिले होते. पुढे काँगेसप्रणीत भारतसेवक समाजाच्या नागपूर शाखेची जबाबदारी त्यांनी सांभाळली. त्यावेळी विविध शिक्षणसंस्थांमधील विद्यार्थ्यांच्या सहकार्याने चोरघडे यांनी श्रमसंस्कार पथक स्थापन केले होते. या विद्यार्थ्यांनी श्रमदानाने नागपूर विद्यापीठाच्या परिसरात ओपन एर थिएटर बांधून घेतले. अशा या सुप्रसिद्ध लघुकथाकाराचे १ डिसेंबर १९९५ रोजी निधन झाले.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

१६ जुलै

१) श्रीम. अनघा अनिल मराठे वरसोली, अलिबाग, १६-७-१९६२

२) श्री. रमेश लक्ष्मण जुईकर अलिबाग, १६-७-१९५६

३) श्री. संदीप दशरथ नाईक अलिबाग, १६-७-१९६६

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# फेरफार उताऱ्यासाठी शेतकऱ्यांची फरफट

**■ कर्जत तहसीलदारांचा अजब कारभार ■ उतारा मिळेपर्यंत कार्यालयातच ठिय्या**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांचे फेरफार उतार तलाठी कार्यालयातून कर्जत तहसील कार्यालयात नेण्यात आले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या जमिनीच्या उतारांसाठी हेलपाटे मारावे लागत आहेत. तहसीलदारांच्या अजब कारभारामुळे शेतकरी हैराण झाले असून, सोमवारी (दि.१४) रात्री सव्वाआठ वाजेपर्यंत या विभागाच्या कर्मचाऱ्यांना शेतकऱ्यांनी अडवून ठेवले होते. त्यामुळे जोपर्यंत उतारे मिळाले नाहीत तोपर्यंत शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयातच ठिय्या मारला होता.



कर्जत तालुका हा बहुतांशी ग्रामीण आणि आदिवासी बहुल भाग म्हणून ओळखला जातो. येथील मुख्य व्यवसाय शेती असून, शेतकऱ्यांना आपल्या जमिनीचे फेरफार, सातबारा आणि इतर महत्त्वपूर्ण दस्तावेज आतापर्यंत गावातील जवळच्या तलाठी कार्यालयात सहज मिळत होते. मात्र, कर्जतचे तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांनी अचानक घेतलेल्या निर्णयामुळे शेतकऱ्यांना आता थेट तालुक्याच्या गावाला चकरा माराव्या लागत आहेत. तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांनी अचानक मंडळ अधिकारी व तलाठी यांना तोंडी आदेश देऊन फेरफार दप्तर कर्जत तहसील कार्यालयात जमा करण्याचे फर्मान सोडले. या आदेशानुसार सर्व फेरफार दप्तर तहसील कार्यालयात जमा करण्यात आले. या निर्णयामुळे नांदगाव, खांडस यांसारख्या दुर्गम आणि लांबच्या भागातून येणाऱ्या शेतकऱ्यांची मोठी तारांबळ उडत आहे. गावात दोन मिनिटांत मिळणाऱ्या फेरफारसाठी आता शेतकऱ्यांना पूर्ण दिवस खर्च करावा लागत आहे. तसेच, आर्थिक भुर्दंडही सहन करावा लागत आहे.

अनेकदा सकाळी ११.०० वाजल्यापासून सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत थांबूनही, ''साहेबांची सही झाली नाही, उद्या या'' असे सांगून नागरिकांची दिशाभूल केली जात असल्याचे चित्र दिसत आहे. काही शेतकऱ्यांना गाव नमुना १४ चा उतारा मिळवण्यासाठी १० ते १२ पेक्षा जास्त फेऱ्या माराव्या लागल्या आहेत, तर काहींचे अर्ज तब्बल ४ महिने उलटूनही प्रलंबित आहेत. दरम्यान, शेतकऱ्यांवर होणाऱ्या या अन्यायाविरोधात आता स्वतः शेतकऱ्यांनीच आक्रमक भूमिका घेतली आहे. ''जाणीवपूर्वक शेतकऱ्यांना त्रास देणारे उपक्रम शासनाकडून का राबवले जात आहेत? तलाठी कार्यालयातील जुने सातबारा व फेरफार तहसील कार्यालयात जमा करण्याचे लिखित आदेश आहेत का?'' असे सवाल करत, तहसीलदारांनी हा जाचक आदेश ताबडतोब रद्द करावा आणि जमा केलेले दप्तर पुन्हा संबंधित तलाठी कार्यालयात पाठवावे, अशी मागणी शेतकऱ्यांच्यावतीने कर्जत तहसीलदारांना करण्यात आली आहे.

> आमच्या शेतीचे फेरफार घेण्यासाठी आता तहसील कार्यालयात जावे लागत असल्याने मोठी धावपळ होत आहे. तलाठी कार्यालयात हे काम जलद गतीने व्हायचे. आता एक फेरफार काढण्यासाठी पूर्ण दिवस वाया जातो, पैसा खर्च होतो आणि तरीही काम होईल याची शाश्वती नसते.
> – काशिनाथ शिंदे, शेतकरी, हालिवली

> मी फेरफार मिळवण्यासाठी ७ तारखेला अर्ज केला होता, १३ तारीख उजाडली तरी फेऱ्याच मारत आहे. एखादा शेतकरी खांडसवरून २०० रूपये भाडे खर्च करून येतो, त्याचे पैसे आणि वेळ दोन्ही वाया जात आहेत. तलाठ्यांकडे अधिकार असताना काम २ दिवसांत व्हायचे, पण तहसीलदारांनी दप्तर येथे आणल्याने शेतकऱ्यांचे हाल होत आहेत.
> – विनायक देशमुख, शेतकरी, गौरकामत

# अलिबाग एसटी आगारात वृक्षारोपण

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

एसटीच्या ७८ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासन एसटी महामंडळ अलिबाग आगाराच्यावतीने वृक्षारोपणाचा स्तुत्य उपक्रम आयोजित करण्यात आला होता. हा उपक्रम मंगळवारी (दि.१४) सकाळी धर्मादाय आयुक्त राजेश इंगोले, पोलीस अधीक्षक कार्यालयातील जिल्हा विशेष शाखेतील पोलीस निरीक्षक किशोर साळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. तसेच, या उपक्रमात उज्वल भविष्य सामाजिक संस्था आणि माणुसकी प्रतिष्ठान यांनी सहभाग घेतला होता.



हरित महाराष्ट्राच्या संकल्पनेला बळ देण्यासाठी व पर्यावरण संवर्धनाचा संदेश जनमानसात पोहोचविण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ''एक झाड लावूया आणि पर्यावरण वाचवूया'' या संकल्पनेवर अधारित हा उपक्रम घेण्यात आला होता. अलिबाग एसटी बस आगाराच्या परिसरात वेगवेगळ्या फळांची, फुलांची तसेच औषधी रोपांची लागवड करण्यात आली. या रोपांचे संवर्धन व जतन करण्याचा संकल्पदेखील यावेळी उपस्थितांनी केला. यावेळी उपस्थितांनी पर्यावरणासह झाडांचे महत्व पटवून देत असताना मानवी जीवनात झाडांचे महत्व काय आहे, याची जाणीव आपल्या शैलीतून वक्त्यांनी करून दिली.

या उपक्रमात उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा उज्ज्वला चंदनशीवे-चव्हाण, माणुसकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान, अलिबाग आगाराचे व्यवस्थापक राकेश देवरे, स्थानक प्रमुख अभिजीत मांढरे, ॲड. निहा राऊत, ॲड. के.डी. पाटील, जागृती फाऊंडेशनच्या अध्यक्षा जागृती बेलेकर, श्रीजाई फ्युचर एलएलपीचे संचालक डॉ. नितीन गांधी, समन्वयक ममता म्हात्रे, खंडाळेच्या कृषी सखी सविता ओव्हाळ, मंजिरी पाटील, उत्कर्षा गुरव, अप्सना शाह, सुरेंद्र घरत, रंजिता दिवकर, श्वेता पाटील, साक्षी गायकवाड, विद्या पेढवी, वैभव पाटील, माधवी पिंगळे, नलीनी म्हात्रे, योगिनी काठे व मिना कांबळे आदींसह वेगवेगळ्या सामाजिक संस्थाचे पदाधिकारी, सदस्य, एसटी बस आगारातील अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येन उपस्थित होते.

## पनवेलजवळ आढळला पुरुषाचा मृतदेह

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेलजवळ एका अज्ञात पुरुषाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. मयताची ओळख अद्याप पटलेली नसून, त्याच्या नातेवाईकांचा शोध घेण्यासाठी पनवेल पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे. दि.२ जुलै रोजी एका रिसॉर्टच्या मागील डोंगराळ झाडीत हा मृतदेह आढळला होता. हा मृतदेह अत्यंत कुजलेल्या अवस्थेत असल्याने ओळख पटविणे कठीण झाले आहे. शवविच्छेदनासाठी मृतदेह उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. ही मृत व्यक्ती अंदाजे ४० ते ४५ वर्षे वयोगटातील पुरुष असून, केस काळे आहेत.

## खासगी शाळांवर कारवाईचे आदेश

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील शिक्षण विभागाच्या शासन निर्णयानुसार सर्व खासगी शाळांनी पालक-शिक्षक संघाची स्थापना करण्यासंदर्भात मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली आहेत. परंतु, सर्व प्राथमिक, माध्यमिक आणि उच्चमाध्यमिक खासगी शाळांमधील पालक-शिक्षक संघाची स्थापना केल्यानंतर पंधरा दिवसाच्या आत सभासद आणि कार्यकारी समिती सदस्यांची यादी शिक्षण विभागाकडे सादर करणे बंधनकारक असताना, त्याची माहिती पनवेल शिक्षण विभाग, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेकडे उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे हे कायद्याची पायमल्ली आणि उल्लंघन करणारे आहे. त्यामुळे सर्व खासगी शाळांनी पालक-शिक्षक संघाची स्थापना करावी आणि ज्या शाळा या संघाची स्थापन करणार नाहीत अशा शाळांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी जिल्हा शिक्षणाधीकारी यांच्याकडे प्रहार संघटनेने केली होती. त्या निवेदनाची दखल घेत जिल्हा शिक्षणाधीकारी यांनी पनवेलच्या गट शिक्षणाधीकारी यांना कारवाई करण्याचे आदेश दिले असल्याची माहिती प्रहार संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. सुनील शिरीषकर यांनी दिली आहे.

## मोकाट कुत्र्याची दहशत

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

कामोठे सेक्टर-१० येथील गणपती गोवारी सोसायटीमध्ये मोकाट कुत्र्याने हैदोस घातला आहे. त्याने केलेल्या हल्ल्यात एका ज्येष्ठ नागरिकाने अनेक लहान मुलांचे प्राण वाचवले आहेत. त्यामुळे या धाडसी कृतीबद्दल परिसरातून त्यांचे कौतुक होत आहे. कृष्ण बुधाजी म्हात्रे (६४) असे त्यांचे नाव असून, त्यांनी मोकाट कुत्रा लहान मुलांवर झेपावत असल्याचे पाहताच क्षणाचाही विलंब न करता मुलांना सुरक्षित ठिकाणी हलवण्याचा प्रयत्न केला. मुलांचे संरक्षण करताना त्यांनी स्वतः चा जीव धोक्यात घालून कुत्र्याचा सामना केला. या झटापटीदरम्यान कुत्र्याने म्हात्रे यांच्या हाताला चावा घेतला. त्यानंतर त्यांना तातडीने वैद्यकीय उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले. सुदैवाने त्यांच्या धाडसी हस्तक्षेपामुळे अनेक निष्पाप मुले संभाव्य गंभीर दुर्घटनेपासून बचावली. या घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी कृष्ण म्हात्रे यांच्या धैर्य, सामाजिक बांधिलकी आणि निः स्वार्थ वृत्तीचे मनापासून कौतुक केले. अशा संकटाच्या क्षणी स्वतः च्या जीवाची पर्वा न करता इतरांचे प्राण वाचविण्याची त्यांची कृती समाजासाठी प्रेरणादायी असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.



## आरक्षण उपवर्गीकरणच्या विरोधात मोर्चा

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

शासनाकडून आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याची जी चर्चा सुरू आहे त्याला कर्जतमधून कडाडून विरोध करण्यात आला आहे. त्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, भारतीय बौद्ध महासभा, अखिल भारतीय बौद्ध महसंघ, चर्मकार बहुजन महासंघ, आदिवासी कृती महासमिती, कर्जत तालुका वाल्मिकी समाज व स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष यांच्यावतीने मोर्चा आयोजित करण्यात आला होता. या मोर्चाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून होऊन नंतर बाजारपेठेतून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ येऊन हा मोर्चा तहसील कार्यालयावर पोहोचला. त्यांनतर तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात, आरक्षण हे सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणा दूर करण्यासाठी दिले आहे. उपवर्गीकरणामुळे समाजात फूट पडेल, बंधुभाव नष्ट होईल आणि घटनेने दिलेला समानतेचा अधिकार धोक्यात येईल. म्हणून आमची मागणी आहे की, उपवर्गीकरणाचा कोणताही निर्णय घेऊ नये. सध्याचे आरक्षण जसे आहे तसेच सर्व घटकांसाठी लागू राहावे. आम्ही या मागणीसाठी शांततामय मोर्चा आयोजित केला आहे. आमच्या भावनांचा आदर करून शासनाने त्वरित निर्णय घ्यावा, ही विनंती, असे नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, हे निवेदन तहसीलदारांसह कर्जतच्या पोलीस निरिक्षकांना देखील देण्यात आले आहे.



(छायाचित्रः संजय गायकवाड)

## शेतकऱ्यांची थट्टा

या वाणाची १० किलोची बॅग शेतकऱ्यांना केवळ १३५ रुपयांत उपलब्ध होणार आहे. ही बियाणे महाबीजमार्फत वितरित केली जाणार असून, त्यासाठी सातबारा उतारा आवश्यक आहे.

मात्र, ऑनलाइन सर्व्हर डाऊन असल्याने सातबारा उतारे काढतानाही शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. एकीकडे लावणीची वेळ हातातून निसटत असताना आणि दुसरीकडे कागदपत्रांसाठी हेलपाटे मारावे लागत असल्याने शेतकऱ्यांचा संताप वाढत आहे.

## डॉ. दाभोळकर रायगडचे मानद वन्यजीव रक्षक

उपचारांबाबतही सातत्याने कार्य करत आहेत. त्यांचे दोन संशोधन निबंध आंतरराष्ट्रीय नियतकालिकांत प्रसिद्ध झाले असून, वनस्य कथा रम्या या लोकप्रिय सदरातून त्यांनी वन्यजीव संवर्धन आणि मानव-वन्यजीव सहजीवनाविषयी प्रभावी लेखनही केले आहे. या नियुक्तीबद्दल वन्यजीवप्रेमी, सामाजिक संस्था आणि विविध स्तरांतून डॉ. प्रसाद दाभोळकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## २१ जुलैनंतर पावसाचा जोर वाढणार

होण्याची शक्यता कमी झाली आहे. पावसाने विश्रांती घेतल्याने अनेक ठिकाणी तापमानात वाढ होऊन उकाडाही जाणवत आहे. दरम्यान, रायगड, ठाणे, नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जालना तसेच पुणे घाटमाथा परिसरात वादळी पावसाची शक्यता असल्याने हवामान विभागाने येलो अलर्ट जारी केला आहे. मराठवाडा व विदर्भातील काही भाग अजूनही चांगल्या पावसाच्या प्रतीक्षेत आहेत.

## ऐन पावसाळ्यात पाण्यासाठी वणवण

काही महिन्यांपूर्वी एमआयडीसीने केलेल्या जलवाहिनी दुरुस्तीच्या कामानंतर ही समस्या अधिक तीव्र झाल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. दरम्यान, संबंधित अधिकाऱ्यांकडून समाधानकारक उत्तर मिळत नसल्याने नागरिकांमध्ये संताप वाढत आहे.

याबाबत एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, अतिवृष्टीमुळे पाण्याच्या पातळीवर परिणाम झाल्याने पुरवठा विस्कळीत झाला असल्याचे सांगण्यात आले. कर्मचारी युद्धपातळीवर काम करत असून आरसीएफलाही पुरेशा प्रमाणात पाणी मिळत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आठ दिवसांत पाणीपुरवठा पूर्ववत करण्याचा प्रयत्न सुरू असून, नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहनही एमआयडीसीकडून करण्यात आले आहे.

**पान १ वरुन**

## कामोठेतील पाणीटंचाईवर शेकापचा अल्टिमेटम

यासंदर्भात वाघमारे यांनी सिडकोचे कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांना लेखी निवेदन सादर केले आहे. निवेदनात स्टार हाइट-३, वरली टॉवर, शुभ अव्हेन्यू, गुरुदेव सोसायटी, ओम शिवशंकर सोसायटी, निर्झर, जय प्राची तसेच परिसरातील अनेक गृहनिर्माण संस्थांमध्ये अत्यल्प दाबाने पाणीपुरवठा होत असल्याची बाब निदर्शनास आणून देण्यात आली आहे.पाणी कमी दाबाने येत असल्याने सोसायट्यांच्या भूमीगत टाक्या भरत नसून वरच्या मजल्यांपर्यंत पाणी पोहोचत नाही. त्यामुळे नागरिकांना पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागत असून, घरगुती कामे, स्वच्छता आणि दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. उंच इमारतींतील रहिवाशांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे.

सिडको प्रशासनाने तातडीने तांत्रिक अडचणी दूर करून नियमित व पुरेशा दाबाने पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी शेकापने केली आहे. हा प्रश्न हजारो नागरिकांच्या मूलभूत गरजेशी संबंधित असल्याने त्याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे वाघमारे यांनी नमूद केले. चार दिवसांत प्रश्न निकाली न निघाल्यास सिडको कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आल्याने आता सिडकोच्या भूमिकेकडे कामोठेकरांचे लक्ष लागले आहे.

## कार-मोटारसायकलची धडक; दोघे जखमी

संबंधित राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाकडून पुन्हा या ठिकाणी डिव्हायडर बसवून सर्व्हिस रोडवरील वाहनांना महामार्गावर येण्यास मज्जाव न केल्याने याठिकाणी वाहनांची ये-जा सुरू होती. त्यामुळे हा दोन्ही वाहनांची टक्कर होऊन अपघात घडला आहे.या अपघातात मोटारसायकलस्वाराचा पाय मोडला असून, कार चालक यांच्या कारची एअर बॅग उघडल्याने त्यांच्या उजव्या कानाला जोरदार फटका बसून गंभीर दुखापत झाली आहे. या घटनेची माहिती मिळतात काळभैरव रेस्क्यू टीमचे दीपक उतेकर स्थानिक नागरिक व पोलीस प्रशासनाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत दोघे जखमींना पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे.

## वर्षासहलीसाठी आलेल्या पर्यटकाचा मृत्यू

येथील खारीक फार्म परिसरात फिरण्यासाठी आले होते. दुपारी बाराच्या सुमारास सर्वजण जवळील उल्हास नदीच्या किनारी गेले. नदीकाठी उभ्या असलेल्या आपल्या लेकीचा सुंदर फोटो काढण्यासाठी अभिजित जाधव दगडावर उभे राहिले. लेकीच्या आठवणी जपण्यासाठी कॅमेऱ्याचा क्षण टिपत असतानाच नियतीने क्रूर खेळी केली. दगडावरुन त्यांचा तोल गेला आणि ते थेट नदीच्या खोल पाण्यात कोसळले. त्यांना पोहता येत नसल्याने काही क्षणांतच ते पाण्यामध्ये दिसेनासे झाले. हा प्रकार पाहताच त्यांच्या मुलीसह उपस्थित नातेवाईकांनी आरडाओरडा केला. घटनेची माहिती मिळताच नेरळ पोलीस, स्थानिक ग्रामस्थ घटनास्थळी दाखल झाले.

सुरुवातीला ग्रामस्थ आणि पोलिसांनी शोधमोहीम राबविली; मात्र यश आले नाही. त्यानंतर खोपोली येथील हेल्प फाऊंडेशनच्या बचाव पथकाला पाचारण करण्यात आले. अनेक तासांच्या अथक प्रयत्नांनंतर बचाव पथक, पोलीस आणि ग्रामस्थांच्या मदतीने अभिजित जाधव यांचा मृतदेह नदीतून बाहेर काढण्यात आला.

## आठवडाभरानंतर खानाव पुलाची दुरुस्ती कूर्मगतीने!

असतानाही कामाला अपेक्षित वेग आलेला नाही. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उदासीन कारभाराबाबत स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता दिनेश पराते यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांचा दूरध्वनी बंद असल्याचे आढळले. पूल दुरुस्तीचे काम नेमके कधी पूर्ण होणार, वाहतूक पूर्ववत कधी सुरू होणार आणि नागरिकांची होणारी गैरसोय कधी थांबणार, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

## नवी मुंबई विमानतळाची ऐतिहासिक झेप!

या सेवेमुळे नवी मुंबई, पनवेल, रायगड, मुंबई आणि परिसरातील प्रवाशांना संयुक्त अरब अमिरातीची राजधानी अबू धाबीसाठी जलद, सोयीस्कर आणि थेट हवाई संपर्क उपलब्ध झाला आहे. व्यवसाय, पर्यटन, रोजगार आणि कौटुंबिक कारणांसाठी यूएईला जाणाऱ्या हजारो प्रवाशांसाठी ही सेवा मोठा दिलासा ठरणार आहे.

अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण बन्सल यांनी हा नवी मुंबई विमानतळाच्या वाटचालीतील अभिमानाचा क्षण असल्याचे सांगितले. केंद्र व राज्य शासन, विविध नियामक संस्था आणि सर्व भागधारकांच्या सहकार्यामुळे हा टप्पा गाठणे शक्य झाल्याचे त्यांनी नमूद केले. भविष्यात आणखी विमान कंपन्या आणि नवीन आंतरराष्ट्रीय गंतव्ये जोडून जागतिक दर्जाची सेवा देण्यावर भर राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

एअर इंडिया एक्स्प्रेसचे अध्यक्ष निपुण अग्रवाल यांनी नवी मुंबई-अबू धाबी मार्गामुळे मुंबई महानगर प्रदेशातील प्रवाशांना आणखी एक सक्षम आणि सोयीस्कर पर्याय उपलब्ध झाल्याचे सांगितले. कंपनीच्या दुहेरी विमानतळ धोरणात नवी मुंबई विमानतळाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले.

# निवडक

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**खोपोली :** समाजसेवक आनंदराव कचरे यांच्या वाढदिवसानिमित्त राजिप शाळा गाढेश्वर वाजे पनवेल येथील शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून सामाजिक बांधिलकी जपली. कचरे हे ऑल इंडिया धनगर समाज महासंघाचे काम करत त्यांच्या माध्यमातून समाजासाठी अहोरात्र मेहनत घेऊन काम करत आहेत. जिल्हात त्यांचे समाजासाठी महत्वाचे काम असून समाजातील गोर गरीब जनतेच्या अडीअडचणी जाणून घेऊन ते नेहमी मदतीला धावून जात असतात. त्यांनी आतापर्यंत हजारो विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून समाजात शिक्षणाची क्रांती घडविण्यासाठी ते प्रयत्न केला आहे. महाड येथील अनेक पूरग्रस्तांना जीवनावश्यक साहित्य वाटप केले. त्यांनी पन्नासावा वाढदिवसाच्या साजरा करून त्यांना विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. तर राजमाता अहिल्यादेवी होळकर उत्सव समिती शेलू रायगडचे संस्थापक माजी अध्यक्ष तथा ऑल इंडिया धनगर समाज महासंघाचे कोकण संपर्क प्रमुख रामचंद्र आप्पा पुकळे यांनी त्यांची भेट घेत सन्मानचिन्ह भेट देऊन त्यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी बाळासाहेब पुकळे कुर्ला नागरीक सहकारी बँक मुंबईचे संचालक, रामचंद्र पुकळे, ज्योतिर्लिंग सामाजिक बहुउदेशीय संस्थेचे संस्थापक आदित्य वाघमोडे, ऑल इंडिया धनगर समाज मुंबई प्रदेश अध्यक्ष निवृत्त पोलीस, प्रल्हाद पुकळे, धनाजी, जानकर, विजय जानकर आदिसह अनेक मान्यवर उपस्थित होते.



## न्यू इंग्लिश स्कूलमध्ये वह्यांचे वाटप

**म्हसळा :** खा. सुनील तटकरे यांच्या वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला न्यू इंग्लिश स्कूल, म्हसळा येथे विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. तसेच भास्कर दाजी विचारे फाऊंडेशनच्या वतीने जिल्हा परिषद सदस्य अभिषेक विचारे यांच्या हस्ते ज्येष्ठ नागरिकांना छत्र्यांचे वितरण करण्यात आले. यावेळी अभिषेक विचारे, अनिल बसवत, बबन मनवे आणि प्राचार्य धर्मराज पाटील यांनी खा. सुनील तटकरे यांच्या विकासकामांचा गौरव करून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास उपसभापती लहू म्हात्रे, पंचायत समिती सदस्या प्रियंका निंबरे व समृद्धी चाचले, माजी सभापती संदीप चाचले, सतीश शिगवण, मोरेश्वर पाटील, नाना सावंत, महेश घोले, किरण पालांडे, नगरसेविका जयश्री कापरे, सरपंच कविता पेरवी, गजानन पाखड, मधु पाटील तसेच शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हनुमंत मोरे यांनी केले.




## जागतिक लोकसंख्या दिन साजरा

**माणगाव :** प्राथमिक आरोग्य केंद्र इंदापूर व आयुष्यमान आरोग्य मंदिर रातवड यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक लोकसंख्या दिन शनिवारी (दि.११) जुलै रोजी इंदापूर परिसरातील गावातून व शाळांतून विविध जनजागृतीपर उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आरोग्य सेवक सुधीर गणपत खैरे, आरोग्य सेविका सी. एन. मोरे व कोटकर आरोग्य सेविका यांनी विद्यार्थ्यांना लोकसंख्या स्थिरीकरण, संतुलित कुटुंब, वैयक्तिक स्वच्छता, पोषण, संसर्गजन्य आजारांचे प्रतिबंध आणि निरोगी जीवनशैली याविषयी सविस्तर आरोग्य शिक्षण व मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांसाठी किरकोळ आजारांवरील औषधोपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. तसेच रातवड आदिवासीवाडी येथील अंगणवाडीला भेट देऊन ओआरटी कॉर्नरची पाहणी करण्यात आली. अंगणवाडी सेविका मानसी जाधव व मदतनीस कदम ताई यांनी ओआरटी कॉर्नरची माहिती दिली. डेंग्यू प्रतिबंधासाठी ठेवण्यात आलेल्या गप्पी माशांच्या टाकीचीही पाहणी करण्यात आली असून त्यातील मासे सुरक्षित व जिवंत असल्याचे आढळले. यावेळी शिक्षकवृंद, विद्यार्थी तसेच आरोग्य विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

## एकाच देठावर दोन जास्वंदीची फुले

**माणगाव :** निसर्ग एखाद्या छोट्याशा घटनेतूनही अशी अप्रतिम कलाकृती साकारतो की, क्षणभर विज्ञानालाही आश्चर्य वाटावे आणि श्रद्धेलाही नवा अर्थ मिळावा. माणगाव शहरा-जवळील मोरबा रोड, रिळे परिसरात मंगळवारी (दि. १४) जुलै रोजी सकाळी असेच एक दुर्मिळ आणि मनाला स्पर्शून जाणारे दृश्य पाहायला मिळाले. सिद्धी नगर येथील रहिवासी निशांत अनंत साठे यांना या परीसरात जास्वंदीच्या झाडावर एकाच देठावर दोन जुळी लालभडक जास्वंदीची फुले उमललेली दिसली आणि परिसरात आश्चर्य, आनंद व कुतूहलाचे वाता-वरण निर्माण झाले. ही अनोखी फुले पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांनी एकच गर्दी केली. अनेकांनी मोबाईलमध्ये या दुर्मिळ क्षणाचे छायाचित्र टिपले, तर काहींनी याला निसर्गाचा आशीर्वाद मानत भावनिक प्रतिक्रिया व्यक्त केल्या. निसर्गप्रेमी, वनस्पती अभ्यासक आणि छायाचित्रकार यांच्यासाठीही हा क्षण विशेष ठरला. सामान्यतः जास्वंदी (Hibiscus rosa-sinensis) या वनस्पतीमध्ये प्रत्येक फुलाला स्वतंत्र देठ असतो. मात्र या झाडावर एकाच देठातून दोन पूर्ण विकसित, समांतर फुले उमलल्याने हा प्रकार अत्यंत दुर्मिळ जैविक वैशिष्ट्य म्हणून ओळखला जात आहे. मोर्बा रोड,रिळे येथील हे दुर्मिळ जुळ्या जास्वंदीचे फूल आता केवळ परिसरातील चर्चेचा विषय नसून, निसर्गाच्या अमर्याद सर्जनशीलतेचे, वैज्ञानिक कुतूहलाचे आणि मानवी संवेदनांना स्पर्श करणाऱ्या सौंदर्याचे जिवंत प्रतीक ठरले आहे.



# हॉटेल व्यावसायिकांवर पोलिसांची करडी नजर

**१५ दिवसांत सीसीटीव्ही बसवा**

**नियम मोडणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा**

**किल्ले रायगड हॉटेल व्यावसायिकांसोबत बैठक**

| महाड | प्रतिनिधी |

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजधानी रायगडाला वर्षभर देश-विदेशातून हजारो पर्यटक, इतिहासप्रेमी आणि शिवभक्त भेट देत असतात. या ऐतिहासिक आणि राष्ट्रीय अस्मितेच्या पवित्र भूमीची सुरक्षितता, पर्यटकांचा विश्वास आणि कायदा-सुव्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने पाचाड येथे रायगड परिसरातील सर्व हॉटेल व लॉजिंग व्यावसायिकांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

महाड पोलीस ठाण्याचे नवनियुक्त पोलीस निरीक्षक अभिजित नवसे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस रायगड व्यावसायिक संघटनेचे सुमारे ४० हॉटेल व लॉजिंग व्यावसायिक उपस्थित होते. बैठकीत कायद्याचे पालन, पर्यटकांची सुरक्षा, गुन्हेगारीला



प्रतिबंध आणि जबाबदार पर्यटन संस्कृती निर्माण करण्यावर विशेष भर देण्यात आला.

पोलीस निरीक्षक नवसे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, रायगड ही केवळ पर्यटनस्थळ नाही, तर महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचे आणि इतिहासाचे प्रतीक आहे. त्यामुळे येथे कोणत्याही प्रकारच्या बेकायदेशीर किंवा संशयास्पद हालचालींना अजिबात थारा दिला जाणार नाही. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. प्रत्येक हॉटेल व लॉजमध्ये येत्या १५ दिवसांत उच्च प्रतीचे व कार्यरत सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. प्रवेशद्वार, रिसेप्शन, पार्किंग व इतर महत्त्वाच्या ठिकाणांवर देखरेख असणे आवश्यक असून, आदेशाचे पालन न करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. एफएसएसएआय परवान्यासह शासनाने आवश्यक केलेले सर्व वैध परवाने अद्ययावत ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या.

तपासणीदरम्यान त्रुटी आढळल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल. हॉटेलमध्ये मुक्काम करणाऱ्या प्रत्येक पाहुण्याची संपूर्ण माहिती रजिस्टरमध्ये नियमित नोंदविणे आणि ती आवश्यकतेनुसार पोलिसांना उपलब्ध करून देणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट करण्यात आले. प्रत्येक पाहुण्याकडून वैध ओळखपत्र घेणे सक्तीचे करण्यात आले असून, ओळख न पडताळता कोणालाही रूम देऊ नये, असे निर्देश देण्यात आले.

हॉटेल किंवा लॉजचा वापर देहविक्री, वेश्याव्यवसाय, अमली पदार्थांचा व्यवहार किंवा इतर कोणत्याही गुन्हेगारी कृत्यासाठी होत असल्याचे आढळल्यास संबंधित मालक, व्यवस्थापक व जबाबदार व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला.

यावेळी किल्ले रायगड हॉटेल व्यवसाय संघटनेचे अध्यक्ष रघुवीर देशमुख यांनी संघटनेमार्फत गेल्या वर्षभरात राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. पर्यटकांच्या हॉटेलमध्ये राहिलेल्या मौल्यवान वस्तू प्रामाणिकपणे परत करणे, अन्न व औषध प्रशासनाच्या सहकार्याने मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन करणे, आपत्कालीन प्रसंगी पोलीस घटनास्थळी पोहोचण्यापूर्वी जखमींना तातडीने रुग्णालयात पोहोचविण्यासाठी मदत करणे, अशा जबाबदाऱ्या संघटनेतील सर्व सदस्य सातत्याने पार पाडत असल्याचे त्यांनी सांगितले. या बैठकीस राजेंद्र खातू, तानाजी अवकीरकर, अनंत देशमुख, लहू अवकीरकर, जयेश लामजे, पोलीस पाटील गणेश डावले आदी उपस्थित होते.

## खैराट ग्रामस्थांतर्फे वृक्षारोपण

| खोपोली | प्रतिनिधी |

खैराट धनगरवाडा येथील ग्रामस्थांनी स्वखर्चाने वृक्षारोपण करून झाडे लावून सामाजिक बांधिलकी जपून पर्यावरण संवर्धन जपण्याचा संदेश दिला आहे. सद्या सगळीकडे मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असून ठिकठिकाणी जीवितहानी झाली आहे मात्र खैराट धनगरवाडा येथील ग्रामस्थांनी एकत्र येत सामाजिक बांधिलकी जपत पन्नास झाडे स्वखर्चाने लावून झाडे लावा, पर्यावरण वाचवा असा संदेश दिला, या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे, येथील ग्रामस्थ गेल्या अनेक वर्षपासून वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवत असतात. यावेळी हर हर चांगभले धनगर समाज संस्थेचे खालापूर तालुका अध्यक्ष तथा वावर्ले ग्रामपंचायतचे माजी ठकुराम झोरे, जिजाबाई गोरे, जनार्धन झोरे, मोहन झोरे, लक्ष्मण आखाडे यांच्यासह अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लाडवली-मांडले रस्त्याची दुरवस्था

| महाड| प्रतिनिधी |

लाडवली ते मांडला या सुमारे आठ किलोमीटरच्या रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असून, गेल्या अनेक वर्षांपासून या रस्त्याची कोणतीही ठोस दुरुस्ती करण्यात आलेली नाही. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून पावसामुळे साईड पट्ट्याही वाहून गेल्या आहेत. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणे धोकादायक बनले आहे.

या रस्त्याचा वापर करणारे शाळकरी विद्यार्थी, वयोवृद्ध नागरिक, कामगार वर्ग तसेच सर्वसामान्य नागरिकांना दररोज मोठ्या त्रासाला सामोरे जावे



लागत आहे. वाहनचालकांना खड्डे चुकवत अक्षरशः तारेवरची कसरत करत वाहने चालवावी लागत आहेत. त्यामुळे या मार्गावर अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात असून, अपघात झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

विशेष म्हणजे, छत्रपती शिवाजी महाराजांचे पराक्रमी सरदार मुरारबाजी देशपांडे यांची जन्मभूमी किंजळोली याच मार्गावर आहे. तसेच मांडले येथील प्रसिद्ध धबधबा पाहण्यासाठी दरवर्षी मोठ्या संख्येने पर्यटक येत असतात. मात्र रस्त्याच्या दुरवस्थेमुळे पर्यटकांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

लाडवली मांडला रस्त्यावरील खड्डे तातडीने भरून रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली असून, या गंभीर प्रश्नाकडे संबंधित प्रशासन व लोकप्रतिनिधी लक्ष देणार का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## श्रीवर्धनमध्ये प्राथमिक शिक्षणाची परवड

**श्रीवर्धन शहर :** श्रीवर्धन तालुक्यात जिल्हा परिषदेच्या एकूण ८६ प्राथमिक शाळा असून त्यातील २० शाळा सातवी पर्यंतच्या असून विद्यार्थी संख्या २३०० इतकी आहे. नियमित गट शिक्षणाधिकारी पद रिक्त असून प्रभारी गट शिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार सोपविलेला असतो. तालुक्यासाठी मंजूर शिक्षक संख्या २३२ असतानादेखील सध्या १६३ शिक्षकच कार्यरत आहेत. केंद्र प्रमुखाची १० पदे तालुक्यात रिक्त असून विस्तार अधिकाऱ्यांचीही ०२ पदे रिक्त आहेत.

## कर्जत आगारात वृक्षारोपण



| कर्जत | प्रतिनिधी |

एसटी आगारांमध्ये वृक्षारोपण करण्याचा संकल्प केला आहे. त्यानुसार कर्जत एस टी आगारात वृक्षारोपण समारंभ करण्यात आला. याप्रसंगी आगार परिसरात शंभर वृक्ष लावण्याचा व संवर्धन करण्याचा संकल्प कर्मचाऱ्यांनी केला आहे.

यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून नगराध्यक्ष पुष्पा दगडे, नगरसेविका मानसी कानिटकर उपस्थित होत्या. आगार व्यवस्थापक देवानंद मोरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. स्थानक प्रमुख महादेव पालवे यांनी आगाराच्या परिसरात शंभर वृक्ष लावण्याचा आम्ही संकल्प केला असून प्रत्येक एसटी कामगार त्याच्या संवर्धनाची जबाबदारी स्वीकारणार आहे, असे स्पष्ट केले.

नगराध्यक्ष दगडे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून वृक्षारोपणाचा शुभारंभ करण्यात आला.

## आरक्षणात विभाजन नको

**कर्जतमध्ये मोर्चा काढून केली मागणी**

| नेरळ | प्रतिनिधी |

सध्या सुरू असलेल्या मतदार नोंदणी पुनर्निरिक्षण कार्यक्रमांत बौद्ध समाजाला एकच आरक्षणासाठी देण्यात यावे या मागणीसाठी कर्जत मध्ये मोर्चा काढण्यात आला.यावेळी आम्हाला विभाजन नको तर एकीकरण हवे ही मागणी पुढे करण्यात आली.

एकच आरक्षण पाहिजे या मागणीसाठी कर्जत शहरात भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले होतें. बौद्ध धर्मीय विविध सामाजिक संघटनांनी एकत्र येत या आंदोलनाची हाक दिली होती. सामाजिक न्याय, समान हक्क आणि आरक्षणातील विभाजन थांबवण्याच्या प्रमुख मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात येणार आहे. कर्जत शहरात निघालेला मोर्चा हा तहसील कार्यालय आणि कर्जत पोलीस ठाणे येथे काढण्यात आला. या आंदोलनात बहुजन संघटनांचा सहभाग होता.

कर्जत शहरातून काढण्यात येणार असून, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक आणि प्रशासकीय भवन या प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करीत प्रशासकीय भवन येथे पोहचला.

# जिल्हा परिषदेची पडीक जागा गोशाळेसाठी द्या

**निराधार गोवंशाच्या संरक्षणासाठी कै.लक्ष्मीबाई भिकू काटे चॅरिटेबल ट्रस्टची जोरदार मागणी**

| माणगाव | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा परिषदेच्या मालकीची सर्व्हे क्रमांक १२९ मधील ११ गुंठे जागा अनेक वर्षांपासून वापराविना पडून आहे. समाजहिताच्या कोणत्याही कामासाठी उपयोगात न आलेली ही जागा आता निराधार गोवंशाच्या संरक्षणासाठी गोशाळेसाठी उपलब्ध करून द्यावी, अशी ठाम आणि लोकहिताची मागणी श्रीमती के. लक्ष्मीबाई भिकू काटे चॅरिटेबल ट्रस्टने केली आहे.

ट्रस्टचे अध्यक्ष बिरबल भिकू काटे यांनी या संदर्भात रायगडचे खासदार सुनील तटकरे, राज्याचे मंत्री भरत गोगावले आणि मंत्री आदिती तटकरे यांच्याकडे सविस्तर निवेदन सादर करून या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देण्याची विनंती केली आहे. या मागणीची गांभीर्याने दखल घेत मंत्री भरत गोगावले यांनी जिल्हाधिकारी आणि रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष यांच्याकडे अधिकृत शिफारस करून सदर जागा गोशाळेसाठी उपलब्ध करून देण्याची सूचना केली आहे.

पूर्वी या जागेवर जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा होती. शासनाच्या धोरणानुसार शाळेचे स्थलांतर झाल्यानंतर ही जागा अनेक वर्षांपासून ओस पडली आहे. लाखो रुपयांच्या सार्वजनिक मालमत्तेचा कोणताही उपयोग होत नसताना दुसरीकडे रस्त्यावर भटकणाऱ्या गायी, वाढते अपघात, शेतकऱ्यांचे होणारे नुकसान आणि गोसंवर्धनाचा गंभीर प्रश्न तीव्र होत आहे.

शासकीय मालमत्ता वर्षानुवर्षे पडून राहण्यापेक्षा तिचा सम ाजाच्या कल्याणासाठी उपयोग झाला पाहिजे. निराधार गोवंशाला संरक्षण, शेतकऱ्यांना दिलासा, युवकांना रोजगार आणि पर्यावरणाचे संवर्धनया चारही उद्दिष्टांची पूर्तता या एका निर्णयातून होऊ शकते, असे मत ट्रस्टचे अध्यक्ष बिरबल भिकू काटे यांनी व्यक्त केले. मंत्री भरत गोगावले यांनी केलेल्या शिफारशीमुळे या मागणीला नवी ताकद मिळाली आहे. आता रायगड जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषद प्रशासन समाजहिताला प्राधान्य देत हा प्रस्ताव तातडीने मंजूर करणार का? याकडे संपूर्ण रायगड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## अतिवृष्टीमुळे साकव गेला वाहून

**महाड :** गेल्या तीन ते चार दिवसांपूर्वी सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शिवथर विभागातील अनेक गावांमध्ये शेती, पायाभूत सुविधा आणि पाणीपुरवठा व्यवस्थेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे प्राथमिक चित्र समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर वरंध पंचायत समितीच्या सदस्या नूतन मोरे यांनी शिवथर विभागाचा पाहणी दौरा करून नुकसानग्रस्त भागाची प्रत्यक्ष पाहणी केली. नदीच्या प्रवाहात झालेल्या बदलामुळे नदीकाठावरील शेतीचे मोठे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले.

# मुठवली खु.येथे शैक्षणिक साहित्याचे वाटप

| खांब | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील मुठवली खु.येथे शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.

रोहा तालुक्यातील प्रमोद अंनत म्हसकर ह्या प्रतिष्ठानचे माध्यमातून व युवा सामाजिक कार्यकर्ते महेश तुपकर यांच्या प्रयत्नातून संपन्न झालेल्या या कार्यक्रमप्रसंगी विद्यार्थी वर्गाला शैक्षणिक साहित्य वाटप, ज्येष्ठ नागरिक व ज्येष्ठ महिलांचा विशेष सन्मान आदी कार्यक्रम संपन्न करण्यात आले.



यावेळी ग्रामसेविका वेटकोळी, कविता शेळके, मारुती तुपकर, पो.पाटील राम सावंत, महेश तुपकर, गाव अध्यक्ष तानाजी ठमके, मुख्याध्यापिका वेळे, अनिल सुटे, विठोबा तुपकर, येणाजी शिंदे, चंद्रकांत शिंदे, लिंबाजी शेळके, संजय मालुसरे, धनराज शिंदे, परेश ठमके, नागेश खंडागळे, गौतम सावंत, संतोष शेळके, रजनी शेळके, शशिकला शिंदे, पुष्पलता शिंदे यांच्या सम वेत मोठ्या संख्येने अन्य ग्रामस्थ व महिला उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार सामाजिक कार्यकर्ते महेश तुपकर यांनी व्यक्त केले. संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी तरूण मंडळाच्या सभासदांनी मोलाचे सहकार्य केले.

## नेरेपाड्यात विद्यार्थ्यांना साहित्य वाटप



**केंद्रप्रमुख रंजना केणी यांच्या प्रयत्नांना यश**

| चिरनेर | प्रतिनिधी |

नेरेपाडा येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना केंद्रप्रमुख रंजना केणी यांच्या प्रयत्नातून, वह्या व लेखन साहित्याचे वाटप करण्यात आले. शाळेसाठी दोन टेबल देखील देण्यात आले आहेत.

नेरूळ येथील लीनेस क्लब ऑफ हंसिनी यांच्या सौजन्यातून या महत्त्वपूर्ण साहित्याचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. यावेळी उषा तलवार, रंजना केणी, स्मिता वाजेकर, सुमन सिंगला, चंदना दास, शोभा रावत, सरस्वती शर्मा, वंदना जाधव, प्रेरणा देशमुख, दत्तात्रेय दुसमन, सुजाता जोगल आदी उपस्थित होते.

**शनिवार, रविवार सुट्टीत अफाट गर्दी** | **सुविधांसह सुरक्षिततेचाही अभाव**

# वर्षासहलीसाठी तरुणाईची फणसाड डॅमला पसंती

| रेवदंडा | प्रतिनिधी |

पावसाळा सुरू झाला की तरूणाईला वेध लागतात ते वर्षासहलींचे, डोंगर कपाऱ्यातील वाहणाऱ्या धबधब्यातील धरणातील घावणारे पाणी अंगावर घेण्यासाठी आतुरलेली युवा मंडळी वर्षा सहलीचे प्लनिंग करतात, मुरूड तालुक्यात्तील फणसाड अरण्यातील फणसाड डॅमला तरूणाईच्या उत्साहाचा बहर वर्षा सहलीच्या निमित्ताने पहावयास मिळतो.

मुरूड तालुक्यातील बोर्लीयेथून अंदाजे ६ ते ७ किमी अंतरावरील वळणा वळणाच्या रस्त्याने जाऊन भोईघर गावावरून पुढे काजुवाडी, बेलवाडी गावाच्या पुढे डोंगरात



फणसाड अरण्यातील फणसाड डॅमवर जाता मेते. पावसाळी पाण्याने तुंडूब भरलेले धरण तसेच आजुबाजूच्या डोंगर कपारीतील मनमोहक दृष्य, धरणावरून काजुवाडी तसेच बेलवाडी गावासह धरणामुळे परिसरातील हिरवीगार शेतीतील नागरीचे दृश्य डोळ्यांना विलोभनिय निसर्गसोदर्यांनी भुरळ पाडते.

फणसाड धरणातून बोर्ली पंचक्रोशीतील २२ गावांना पाणीपुरवठा करते. शासनाच्या पाटबंधारे विभाग कोलाडच्या अखत्यारीत हे धरण असल्याचे सांगितले जाते.

परंतु नजीकच्या भोईवर ग्रामपंचायतीच्या हद्दीत असलेल्या फणसाड धरणाचा सोयरेसुतक नसल्याचे यथील ग्रामस्थांनी सांगितले. त्यामुळे ग्रामपंचायतीमार्फत येथे वर्षासहली प्रेमी मंडळीसाठी सुविधा पुरविल्या जात नाही असे म्हटले जाते.

फक्त पावसाळी फणसाड डॅम ला वर्षा सहलीच्या निमित्ताने मोठी गर्दी होते. मात्र अनेक सुविधाचा अभाव येथे आढळतो, बाहेरून वर्षा सहलीसाठी येणाऱ्या मंडळींना रस्त्यावर कुठेही मार्गफलक नसल्याने चुकीच्या मागनि जात नाही ना, अशी शंका मनात घेऊनच पुढे सरकावे लागते. रस्त्यावरून जाणाऱ्या ग्रामस्थांना फणसाड डॅम कुठे हा प्रश्न पावसाळी नित्याचा विचारणारे पर्यटक येत असतात.

फणसाड डॅमला वर्षासहलीच्या निमित्ताने तरूणाईची मोठी पंसती आहे. पावसाळ्यात दर शनिवार तसेच रविवारी मोठी गर्दी पहावयास मिळते. डोंगर कपारीत वसलेल्या निसर्ग सौंदर्याची मुक्त हस्ते उधळण असलेल्या परिसर यवा वर्गाला भावतो, मनमोकळेपणांनी एक वेगळा आनंद मिळविता मेतो.

धरणातून वाहून जाणाऱ्या पाण्यात ओलेचिंब भिजत बसण्याची मज्जा काही औरच असते. नेहमीच दगदगीच्या जीवनातून वनडे पिकनिक म्हणून फणसाड डॅमचे महत्व पावसाळ्यात दिवसेंदिवस वाढत आहे.

## निवडक

### बाळूमामा मंदिरात भाविकांची गर्दी

**खोपोली :** पुणे आणि रायगड जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी लोणावळा पांगोळी (धनगरवस्ती) येथे असलेल्या श्रीसंत बाळूमामा मंदिरात आज दर्श अमावश्या असल्याने सकाळ पासून हजारो भाविक भक्तांनी उपस्थित राहून मामांचे दर्शन घेतले. लोणावळा पांगोळी येथे श्रीसंत बाळू मामा देवाचे भव्य मंदिर आहे येथे गेल्या अनेक वर्षांपासून मंदिर असून या मंदिरात श्रीसंत बाळू मामांचे दर्शन घेण्यासाठी भाविक भक्त दररोज मोठ्या संख्येने येत असतात, तर येथे दर अमावश्येला या मंदिरात मोठ्या प्रमाणात भंडाऱ्याचा महाप्रसाद असतो, त्यातच आज दर्श अमावश्या असल्याने या मंदिरात सकाळ पासून हजारो भाविक भक्त उपस्थित राहून श्रीसंत बाळू मामांचे दर्शन घेऊन महाप्रसादाचा लाभ घेतला. या सर्व भाविक भक्तांची यथोचित सोय श्रीसंत बाळू मामा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष तथा माजी आदर्श सरपंच बबन खरात यांच्यासह ग्रामस्थांनी करीत असतात.

### आदिवासी कुटुंबाना ब्लँकेट वाटप

**खोपोली :** पेण तालुका धनगर समाजाचे नेते दानशूर व्यक्तिमत्व असलेले लक्ष्मण कोंडू मरगळा यांच्या वाढदिवसाचे औचित्य स्थलांतरित कोटवी आदिवासीवाडीतील आदिवासी बांधवाना ब्लँकेट वाटप करून सामाजिक बांधिलकी जपत अगदी साधेपणाने वाढदिवस साजरा केला. समाजसेवक लक्ष्मण मरगळा हे नेहमी आदिवासी धनगर समाजाला मदत करत असून त्यांचे या भागात मोठे नाव आहे, त्यांनी आपला वाढदिवस अगदी साधेपणाने आदिवासी बांधवासोबत साजरा करून आदिवासी बांधवांना ब्लँकेट वाटप करून समाजापुढे एक आगळा वेगळा आदर्श घालून दिला आहे त्यांच्या या उपक्रमाचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित लक्ष्मण मरगळा यांना शुभेच्छा दिल्या आहेत यावेळी बोरगांव ग्रामपंचायतचे प्रभारी सरपंच सोमा पारधी, माजी सरपंच नामदेव महाडिक, सामाजिक कार्यकर्ते जनार्धन पाटील, आदिवासी नेते कृष्णा खाकर, किसन खाकर, रवींद्र खाकर, अशोक मोरे, आकाश मरगळा, नरेश मरगळा, हर्षद मरगळा, बोरगाव ग्रामपंचायतच्या माजी सदस्या भाग्यश्री मरगळा, विठ्ठल मरगळा, विलास कोकळे, यांच्यासह अनेक आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### श्रीवर्धन आगारात वृक्षारोपण



**श्रीवर्धन शहर :** श्रीवर्धन एस.टी आगारात (दि.१४) जुलै रोजी वृक्षारोपण करण्यात आले. त्यात चिंच,आवळा वअन्य रोपांची लागवड नगरसेविका प्रविता माने, पत्रकार आनंद जोशी, आगार व्यवस्थापक मेहबूब मणेर, स्थानक प्रमुख लांजेकर व आगाराचे, कार्यशाळेचे कर्मचारी यांचे हस्ते स्थानक परिसरांत सुमारे १५० रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले.



### सेवानिवृत्त शिक्षकांचा सत्कार

**नेरळ :** कर्जत तालुका पंचायती समितीच्या शिक्षण विभागात कार्यरत असलेले २२ शिक्षक, मुख्याध्यपक हे सेवानिवृत्त झाले आहेत. त्यासर्व सेवा निवृत्त शिक्षणाचा सत्कार कर्जत पंचायत समितीमध्ये करण्यात आला. सभापती नमिता घारे यांच्या संकल्पनेतून हा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता आणि त्यावेळी नव्याने केंद्रप्रमुख झालेले शिक्षक यांचा देखील सत्कार करण्यात आला. तालुक्यात अनेक वर्षे सेवा बजावून निवृत्त झालेल्या शिक्षणाचा सन्मान करण्याचा उपक्रम कर्जत पंचायत समितीमध्ये पार पडला.पंचायत समिती मधील सभागृहात आयोजित कार्यक्रमाची संकल्पना सभापती घारे यांची होती. यावेळी उपसभापती चित्रा ठाकरे, सदस्य कविता शिंगवा, सहायक गट विकास अधिकारी नंदाळे, गटशिक्षण अधिकारी अनंत खैरे, तसेच केंद्रप्रमुख उपस्थित होते. यावेळी तालुक्यातून सेवा निवृत्त जाहले २२ शिक्षण यांचा सत्कार करण्यात आला. त्यात नितीन थळे, मोहंमद हुसेन नासिर पटेल, दादा गवळी, संतोष कोळी, भास्कर थोरवे, चंद्रशेखर जुईकर, संजय पानपाटील, लक्ष्मण लोहकरे, अजय डाळिंबकर, कांचन पाटील, कैलास निकामी, प्रियांका हरवंडे, रेवाजी कुवर, कागदा राऊत, मोहन दळवी, स्मिता म्हात्रे, नीलिमा पाटील, सानंदा पाटील, विक्रम गावित, बाळू ईष्टे, विमल कारोटे, व्यंकटेश केंद्रे आदी २२ शिक्षकांचा स्नमन करण्यात आला.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- Vacancy for Furniture store Manager, location- Zirad, Qualification Graduation, MBA Experience- 2-4 years in Retail Contact- 9823585321
- EDII द्वारा उदया प्रकल्प अंतर्गत उदया महिला उद्योजिका असोशिएनद्वारा अलिबाग येथे 'उदया बाजार' स्टोअर्स करीता अनुभवी रिटेल स्टोअर्स मॅनेजर (महिला) तसेच सेल्स गर्ल पाहिजेत संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक संपर्क - ७७७५८०२४९७ ईमेल- pasb-c@ediindia.org
- गिरीष एंटरप्रायजेस, अलिबाग आवश्यक पदे : ऑफिस कामासाठी १ मुलगी (किमान १२ वी उत्तीर्ण) साईटवरील कामासाठी २ हेल्पर मुले (शिक्षणाची अट नाही) टू-व्हिलर चालवता येणे आवश्यक स्थानिक उमेदवारांना प्राधान्य ऑफिस वेळ : सकाळी ९:०० ते सायंकाळी ६:०० इच्छुक उमेदवारांनी ८२३७३१६२१८ ह्या नंबर वर आपला रिझ्युम व्हाट्सअप करावा.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. शिलार, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती जमीन मिळकत तिचे मालक १) श्री. उत्तम दादु कडुकर व २) सौ. यूगा उत्तम कडुकर यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | एकूण क्षेत्र (चौ.मी ) |
|---|---|---|
| १०७ | १ ते ४९ | ११४६१ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक: १६/०७/२०२६

**ॲड संजय हरिश्चंद्र म्हसे**
ऑफीस-रा.बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरल-पश्चिम, ता.कर्जत,
जि. रायगड. मो. ९२६०२०९०९६

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस हया नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी माजे चिंचोटी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील बिनशेती नमूद वर्णनाची मिळकत, सदर मिळकतीचे विद्यमान मालक सौ. सुनिता सिताराम फुंडे, श्री. गणेश सिमाराम फुंडे, सौ. प्रिती सिताराम फुंडे, सौ. वैशाली विप्रास ठाकूर, सौ. वर्षा सुनिल पाटील, यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहोत.

संदर्भित जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानीशी देवून माझी खात्री पटवून दयावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन नं. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| चिंचोटी ता. अलिबाग, जि. रायगड | ३१/३/ड | जिरायत ०-१६-७०<br>पो.ख. ०-००-५०<br>एकूण क्षेत्र ०-१७-२० | ३.९४ |

अलिबाग,
दि. १५/०७/२०२६

**ॲड. महेश सुहास म्हात्रे**
ऑफिस : रुतूराज प्लाझा,
शिवाजी चौकासमोर, अलिबाग
तळमजला, फ्लॅट नं. १
मो. ०९८५००४२२३४
ईमेल- maheshsmhatre7@gmail.com

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
### विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड
**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पोयनाड चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक १५.०९.२०२० रोजी निर्गमित केली. व त्या नंतर दिनांक ०४.०६.२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. महेश अनंत पाटील यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक १२.०७.२०१७ पर्यंतची रक्कम रुपये २,३७,२३७/- व दिनांक ०१.०४.२०१७ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज १२ टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती मिळकत जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११ (डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून ग्रुप ग्रामपंचायत शहापूर ता. अलिबाग मधील श्री. महेश अनंत पाटील यांच्या नावे असलेली मिळकत ११ अनु क्र.२० येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबागच्या दिनांक १२-०७-२०१७ पर्यंतची रक्कम रुपये २,३७,२३७/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री. महेश अनंत पाटील**
ग्रुप ग्रामपंचायत शहापूर ता. अलिबाग मधील श्री. महेश अनंत पाटील यांच्या नावे असलेली मिळकत ११ अनु क्र. २० क्षेत्र १६८२ चौ.फु.हे घर.

स्थळ : अलिबाग
दिनांक : १५.०७.२०२६

**श्री के. के. राऊत**
विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
### विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड
**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पोयनाड चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक ०८.०६.२०२६ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक ०२.०७.२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. सुभाष गंगाराम केणी यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक १२.१२.२०२२ पर्यंतची रक्कम रुपये ४,२०,२८७/- व दिनांक ३१.०३.२०२२ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज १२.५० टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती मिळकत जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११ (डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून ग्रुप ग्रामपंचायत कुर्डुस ता. अलिबाग मधील श्री. सुभाष गंगाराम केणी यांच्या नावे असलेली मिळकत क्र.१०५ येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबागच्या दिनांक १२-१२-२०२२ पर्यंतची रक्कम रुपये ४,२०,२८७/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री. सुभाष गंगाराम केणी**
ग्रुप ग्रामपंचायत कुर्डुस ता. अलिबाग मधील श्री. सुभाष गंगाराम केणी यांच्या नावे असलेली मिळकत क्र. १०५ क्षेत्र ५१३ चौ.फु.हे घर.

स्थळ : अलिबाग
दिनांक : १५.०७.२०२६

**श्री के. के. राऊत**
विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
### विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड
**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा अलिबाग चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक ३०.०५.२०२६ रोजी निर्गमित केली. व त्या नंतर दिनांक २०.०६.२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार सौ. सविता घनःशाम पुरस्वाणी व राजु घनःशाम पुरस्वाणी यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सुचनेत नमूद केलेली दिनांक ०७.११.२०२५ पर्यंतची रक्कम रुपये ११,६४,५७०/- व दिनांक ०१.०६.२०२५ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज १३ टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती मिळकत जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११ (डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून ग्रामपंचायत चेंढरे ता. अलिबाग मधील सौ. सविता घनःशाम पुरस्वाणी यांच्या नावे असलेली मिळकत क्र. १९३४/११ येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग च्या दिनांक ०७.११.२०२५ पर्यंतची रक्कम रुपये ११,६४,५७०/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- सौ सविता घनःशाम पुरस्वाणी व राजु घनःशाम पुरस्वाणी**
**ग्रामपंचायत चेंढरे ता. अलिबाग येथील सौ. सविता घनःशाम पुरस्वाणी यांच्या नावे असलेली सोनीराम रेसिडन्सी मधील मिळकत क्र. १९३४/११ क्षेत्र ४६३ चौ. फु. सदनिका**

स्थळ : अलिबाग
दिनांक : १५.०७.२०२६

**श्री के. के. राऊत**
विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. आनंद गणपत परब व सौ. मुग्धा आनंद परब यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे वडवली, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ४/१/ग एकुण ०.१०.०० जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण खात, दान, भाडेपटटा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हित संबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक १६/०७/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
### (तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)

ज.म.र. अर्ज ४४७/२०२६

**जाहीर नोटीस**

प्रति,
श्रीम. सुनिता मंगेश जंगम
रा. मु. पो. साळाव, ता. मुरुड-जंजिरा, — अर्जदार
जि. रायगड

विरुध्द

ग्रामसेवक
ग्रुप ग्राम पंचायत साळाव, — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

जाहिर नोटीस

सदर या जाहिर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार श्रीम. सुनिता मंगेश जंगम यांची मुलगी कु.योगिता मंगेश जंगम जन्म दि. ०९/०४/२०१८ रोजी मोजे साळाव ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्राम पंचायत साळाव यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार श्रीम. सुनिता मंगेश जंगम यांची मुलगी कु. योगिता मंगेश जंगम दि. ०९/०४/२०१८ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वत: किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक ३० जुलै २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १५/७/२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
तहसिलदार मुरुड-जंजिरा

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशीलांनी मौजे गोंडाळे ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे-गोंडाळे ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | गट न./स.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| श्रीमती रुक्मिणी विठ्ठल | १२७ | २-३१-०० | ०-७३ |
| खरोसे व २ | १३० | ०-८८-०० | ०-२३ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहीवाट, पोटगी बक्षिसपत्र मृत्युपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहीवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहीवाट असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत १५ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- पाली-सुधागड
दिनांक : १५/०७/२०२६

सही/-
**श्री. प्रभाकर कृष्णकांत भोईर**
ॲडव्होकेट
मु.पो.नविन पनवेल ता.पनवेल जि. रायगड
मो.बा.नं.८१४९६५१५०८

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
### विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड
**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा हाशिवरे चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक ०४.०६.२०२६ रोजी निर्गमित केली. व त्यापाठोपाठ दिनांक २४.०६.२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. गणेश देविदास कोळी यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक २५.०२.२०२६ पर्यंतची रक्कम रुपये ३,७७,५६९/- व दिनांक ०१.०४.२०२५ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज ११.५० टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती मिळकत जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११ (डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून ग्रामपंचायत रेवस ता. अलिबाग मधील श्री. गणेश देविदास कोळी यांच्या नावे असलेली मिळकत क्र १२४ येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबागच्या दिनांक २५-०२-२०२६ पर्यंतची रक्कम रुपये ३,७७,५६९/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री. गणेश देविदास कोळी**
ग्रामपंचायत रेवस ता. अलिबाग मधील श्री. गणेश देविदास कोळी यांच्या नावे असलेली मिळकत क्र. १२४ क्षेत्र ११३.५१ चौ.फु. हे घर.

स्थळ : अलिबाग
दिनांक : १५.०७.२०२६

**श्री के. के. राऊत**
विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
### विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड
**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा अलिबाग चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक ३१.०५.२०२१ रोजी निर्गमित केली. व त्या नंतर दिनांक २७.०५.२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार चिंतामणी प्रोजेक्ट प्रा.लि. मॅनेजिंग डायरेक्टर श्री राजीव मनोज वर्तक व डायरेक्टर प्रिया राजीव वर्तक यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक १५.०१.२०१५ पर्यंतची रक्कम रुपये २०,०३,१४१/- व दिनांक ३०.०५.२०१४ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज १४ टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती मिळकत जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११ (डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून महसुली गाव टेंबुरणीचा माळ, तोंडली, तालुका- खालापूर, जिल्हा-रायगड हद्दीतील मिळकत क्र. ११/२ येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग च्या दिनांक १५.०१.२०१५ पर्यंतची रक्कम रुपये २०,०३,१४१/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- चिंतामणी प्रोजेक्ट प्रा.लि. मॅनेजिंग डायरेक्टर श्री राजीव मनोज वर्तक व डायरेक्टर प्रिया राजीव वर्तक**
महसुली गाव टेंबुरणीचा माळ, तोंडली, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड येथील प्रिया राजीव वर्तक यांचे नावे असलेली मिळकत क्र. ११/२ क्षेत्रफळ ०.२३.०० आर

स्थळ : अलिबाग
दिनांक : १५.०७.२०२६

**श्री के. के. राऊत**
विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

### महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
विभाग नियंत्रक यांचे कार्यालय, रा.प. रायगड विभाग, रामवाडी, पेण,
e-mail-dest_raigad@rediffmail.com
दूरध्वनी क्र. ८२७५०६६४००

क्र.राप/रायगड/वाह/वाणिज्य/६३७ — दिनांक : १५/०७/२०२६६

**स्वारस्य अभिव्यक्ती सुचना क्र. ०१/२०२६**

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, रायगड विभाग, पेण-रामवाडी हे या विभागामार्फत मुंबई-गोवा व गोवा-मुंबई या राष्ट्रीय/राज्य महामार्गावरील खारपाडा ते कशेडी व कशेडी ते खारपाडा या हद्दीतील हॉटेल-मोटेलच्या ठिकाणी ई-शिवाई बसेसना अधिकृत थांबा देण्याबाबत विचाराधीन आहे. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मार्गाचे नाव | ई शिवाई फेरीकरिता किमान अपेक्षित थांबा आकार रक्कम (प्रतिबस प्रतिदिन प्रमाणे | थांबा आकार रक्कमेवर वस्तु व सेवाकर | प्रस्ताव सादर करताना भरणा करावयाची बयाणा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | मुंबई-गोवा | रू.३१०/- | प्रत्येकी १८ टक्के | रू.१,००,०००/- |
| २. | गोवा-मुंबई | रू.३१०/- | प्रत्येकी १८ टक्के | रू.१,००,०००/- |

अधिकृत हॉटेल थांब्यासाठी उपरोक्त प्रमाणे प्रतिदिन प्रतिबस/प्रतिफेरी किमा अपेक्षित देकार रक्कम निश्चित करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने अपेक्षित किंवा त्यापेक्षा थांबा देकार रक्कम देऊ करणाऱ्या हॉटेल चालक मालक यांनी सदरची रक्कम स्वारस्य अभिव्यक्ती सुचना निविदा प्रपत्रात नमुद करून सदरचे निविदा प्रपत्र हॉटेल प्रस्तावासोबत सादर करण्यात यावेत.

निविदा प्रपत्राचे फॉर्म, अटी व शर्ती फॉर्म तसेस प्रस्तावाच्या सोबत आवश्यक असलेल्या कागदपत्रांची यादी इत्यादी तपशिल विभाग नियंत्रक यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, रायगड, पेण-रामवाडी येथे दि.१६.०७.२०२६ ते दि.२२.०७.२०२६ या कालावधीत दररोज शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीचे दिवस सोडून इतर दिवशी १०.३० ते १५.०० या वेळेत हॉटेल थांबा प्रस्ताव सादर करणेकरीता रू. २०००/- + १८% वस्तु व सेवाकर असे एकूण रू.२,३६०/-(परतावा केला जाणार नाही.) व बयाणा रक्कम रू.१,००,०००/- या कार्यालयाकडे भरणा केले नंतर आपणांस निविदा प्रपत्र फॉर्म मिळतील. दि.२२.०७.२०२६ रोजी १३.०० वाजेपर्यंत बयाणा रक्कम स्विकारणेत येईल. दि.२२.०७.२०२६ रोजी १३.०० वाजल्या नंतर निविदा फॉर्म दिले जाणार नाहीत, तसेच बयाणा रक्कम स्विकारली जाणार नाही.

हॉटेल प्रस्ताव स्विकारण्याची शेवटची दिनांक २२.०७.२०२६ रोजी १५.०० वाजेपर्यंत राहील व निविदा प्रपत्र पेटी सिल केल्यानंतर उशिरा प्राप्त झालेले प्रस्ताव निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येतील. अपूर्ण नोंदी असलेल्या, स्वाक्षरी नसलेल्या व आवश्यक मुळ कागदपत्रे निविदा सोबत न जोडल्यास निविदा अपात्र समजण्यात येईल. निविदा शक्यतो दि. २२.०७,२०२६ रोजी १५.३० वाजे पर्यंत उघडण्यात येतील.

सही/-
**विभाग नियंत्रक,**
**रा.प.रायगड विभाग, पेण**

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
### विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड
**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पोयनाड चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक ०८.०६.२०२६ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक ०७.०७.२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. भूषण विठोबा मोकल यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक १२.१२.२०२२ पर्यंतची रक्कम रुपये ७५००७/- व दिनांक ३१.०३.२०२२ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज १२.५० टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती मिळकत जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११ (डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून ग्रुप ग्रामपंचायत शहापूर ता. अलिबाग मधील श्री. भूषण विठोबा मोकल व प्रिती भूषण मोकल यांच्या नावे असलेली मिळकत क्र १०० ब २ येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबागच्या दिनांक १२-१२-२०२२ पर्यंतची रक्कम रुपये ७५००७/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री. भूषण विठोबा मोकल**
ग्रुप ग्रामपंचायत शहापूर ता. अलिबाग मधील श्री. भूषण विठोबा मोकल व प्रिती भूषण मोकल यांच्या नावे असलेली मिळकत क्र. १०० ब २ क्षेत्र ४३.०० चौ.मी.हे घर.

स्थळ : अलिबाग
दिनांक : १५.०७.२०२६

**श्री के. के. राऊत**
विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
### विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड
**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा अलिबाग चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक २७.०२.२०१९ रोजी निर्गमित केली. व त्या नंतर दिनांक ०२.०६.२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार सौ प्रमीला धिरज जोशी यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक ११.०२.२०१९ पर्यंतची रक्कम रुपये १४,४४,०६२/- व दिनांक ३१.१२.२०१८ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज १३ टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती मिळकत जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११ (डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून ग्रामपंचायत चेंढरे ता. अलिबाग मधील सौ प्रमीला धिरज जोशी यांच्या नावे असलेली मिळकत क्र १०२ येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग च्या दिनांक ११.०२.२०१९ पर्यंतची रक्कम रुपये १४,४४,०६२/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- सौ प्रमीला धिरज जोशी**
ग्रामपंचायत चेंढरे ता. अलिबाग मधील सौ प्रमीला धिरज जोशी यांच्या नावे असलेली उत्कर्ष वास्तु इमारती मधील पहिला मजल्यावरील ए विंग मधील मिळकत क्र १०२ क्षेत्र ४१.८० चौ मी सदनिका

स्थळ : अलिबाग
दिनांक : १५.०७.२०२६

**श्री के. के. राऊत**
विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
### विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड
**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा अलिबाग चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको यांना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक ०३.०६.२०२६ रोजी निर्गमित केली. व त्यापाठोपाठ दिनांक २०.०६.२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार मो नफिसा मुक्तार पठाण व मो मुक्तार अब्दुल पठाण यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक १५.०७.२०२२ पर्यंतची रक्कम रूपये १५,७४,८४७/- व दिनांक ३१.०३.२०२१ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज १४ टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती मिळकत जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११ (डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून ग्रामपंचायत चरी, ता. अलिबाग, जिल्हा-रायगड हद्दीतील मिळकत क्र. २९१ व ग्रुप ग्रामपंचायत श्रीगाव, ता. अलिबाग, जिल्हा-रायगड हद्दीतील मिळकत क्र. ८९८ येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग च्या दिनांक १५.०७.२०२२ पर्यंतची रक्कम रुपये १५,७४,८४७/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- मो नफिसा मुक्तार पठाण व मो मुक्तार अब्दुल पठाण मो नफिसा मुक्तार पठाण यांचे नावे असलेली ग्रामपंचायत चरी, ता. अलिबाग, जिल्हा रायगड हद्दीतील मिळकत क्र. २९१ क्षेत्रफळ १८१.२२ चौ मी व ग्रुप ग्रामपंचायत श्रीगाव, ता. अलिबाग, जिल्हा रायगड हद्दीतील मिळकत क्र ८९८ क्षेत्रफळ ४०.१४ चौ.मी.**

स्थळ : अलिबाग
दिनांक : १५.०७.२०२६

**श्री के. के. राऊत**
विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
### विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड
**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पोयनाड चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक ०५.०३.२०२६ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक ०८.०६.२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. संजीव जगन्नाथ जुईकर यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक ०६.०२.२०२६ पर्यंतची रक्कम रुपये ६७,७५,८८५/- व दिनांक ०१.०८.२०२५ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज ९.५० टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती मिळकत जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११ (डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून ग्रुप ग्रामपंचायत शहाबाज ता. अलिबाग मधील श्री. संजीव जगन्नाथ जुईकर यांच्या नावे असलेली मिळकत क्र ७७ व २४५ आणि मौजे शहाबाज हद्दीतील भूमापन व उपविभाग क्र.२९०/२ येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग च्या दिनांक ०६-०२-२०२६ पर्यंतची रक्कम रुपये ६७,७५,८८५/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री. संजीव जगन्नाथ जुईकर**
ग्रुप ग्रामपंचायत शहाबाज ता. अलिबाग मधील श्री. संजीव जगन्नाथ जुईकर यांच्या नावे असलेली मिळकत क्र. ७७ क्षेत्र ४४.०१ चौ.मी. व मिळकत क्र.२४५ क्षेत्र ४४.२३ चौ.मी. आणि मौजे शहाबाज हद्दीतील भूमापन व उपविभाग क्र.२९०/२ क्षेत्र ०.३३.०० हे.आर.

स्थळ : अलिबाग
दिनांक : १५.०७.२०२६

**श्री के. के. राऊत**
विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
### विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड
**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा हाशिवरे चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक १५.१२.२०१६ रोजी निर्गमित केली. व त्या नंतर दिनांक २७.०५.२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. उपेंद्र चंद्रकांत नारकर यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक १३.१२.२०१६ पर्यंतची रक्कम रुपये १७,०८,२२५/- व दिनांक ०१.०४.२०१६ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज १२ टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती भूमापन व उपविभाग जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११ (डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून मौजे गाव कुशीवडे, अरावली, तालुका-चिपळूण, जिल्हा-रत्नागिरी हद्दीतील भुमापन व उपविभाग क्र.५६१, ३८९, ७९७, ३५९ व १७९ येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबागच्या दिनांक १३-१२-२०१६ पर्यंतची रक्कम रुपये १७,०८,२२५/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री. उपेंद्र चंद्रकांत नारकर**
मौजे गाव कुशीवडे, अरावली, तालुका-चिपळूण, जिल्हा- रत्नागिरी येथील श्री. सुभाष शंकर नारकर व उपेंद्र चंद्रकांत नारकर यांचे नावे असलेली भुमापन व उपविभाग क्र. ५६१ क्षेत्रफळ ०-३४-६० आर, भुमापन व उपविभाग क्र. ३८९ क्षेत्रफळ ०-१२-०० आर, भुमापन व उपविभाग क्र. ७९७ क्षेत्रफळ ०.५५.०० आर, भुमापन व उपविभाग क्र. ३५९ क्षेत्रफळ ०.२६.०० आर व भुमापन व उपविभाग क्र.१७९ क्षेत्रफळ ०.१६.०० आर.

स्थळ : अलिबाग
दिनांक : १५.०७.२०२६

**श्री के. के. राऊत**
विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
### विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड
**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना**

ज्याअथी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा चोंढी चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको यांना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक २४.०३.२०२६ रोजी निर्गमित केली. व त्या नंतर दिनांक ११.०६.२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री परशुराम भास्कर पाटील यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक २२.१२.२०२५ पर्यंतची रक्कम रुपये ४०,१६,०३६/- व दिनांक ०१.०८.२०२५ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज ९.५ टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती मिळकत जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११ (डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून मौजे नांदईपाडा ता. अलिबाग मधील श्री परशुराम भास्कर पाटील यांच्या नावे असलेली भूमापन व उपविभाग क्र. १२९ येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग च्या दिनांक २२.१२.२०२५ पर्यंतची रक्कम रुपये ४०,१६,०३६/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री परशुराम भास्कर पाटील**
मौजे नांदईपाडा ता. अलिबाग मधील श्री परशुराम भास्कर पाटील यांच्या नावे असलेली भूमापन व उपविभाग क्र. १२९ क्षेत्र १९.५० हे आर

स्थळ : अलिबाग
दिनांक : १५.०७.२०२६

**श्री के. के. राऊत**
विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
### विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड
**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना**

ज्याअथी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा अलिबाग चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको यांना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक २८.०२.२०२७ रोजी निर्गमित केली. व त्या नंतर दिनांक २७.०५.२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार वरद विनायक ज्वेलर्स प्रो पा. श्री उपेंद्र चंद्रकांत नारकर व गिरीजा उपेंद्र नारकर यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक १३.१२.२०१६ पर्यंतची रक्कम रूपये ३०,४५,८७०/- व दिनांक ०१.०४.२०१६ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज १२ टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती भूमापन व उपविभाग जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११ (डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून मौजे गाव कुशीवडे, अरावली, तालुका- चिपळूण, जिल्हा-रत्नागिरी हद्दीतील भूमापन व उपविभाग क्र. ५६१,३८९,७९७,३५९ व १७९ येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग च्या दिनांक १३.१२.२०२६ पर्यंतची रक्कम रुपये ३०,४५,८७०/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- वरद विनायक ज्वेलर्स प्रो पा श्री उपेंद्र चंद्रकांत नारकर व गिरीजा उपेंद्र नारकर मौजे गाव कुशीवडे, अरावली, तालुका-चिपळूण, जिल्हा-रत्नागिरी येथील श्री. सुभाष शंकर नारकर व उपेंद्र चंद्रकांत नारकर यांचे नावे असलेली भूमापन व उपविभाग क्र. ५६१ क्षेत्रफळ ०.३४.६० आर. भूमापन व उपविभाग क्र. ३८९ क्षेत्रफळ ०.१२.०० आर. भूमापन व उपविभाग क्र. ७९७ क्षेत्रफळ ०.५५.०० आर. भूमापन व उपविभाग क्र. ३५९ क्षेत्रफळ ०.२६.०० आर व भूमापन व उपविभाग क्र. १७९ क्षेत्रफळ ०.१६.०० आर**

स्थळ : अलिबाग
दिनांक : १५.०७.२०२६

**श्री के. के. राऊत**
विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

## नि|व|ड|क

### पी. व्ही. सिंधूची विजयी सलामी

**टोकियो :** भारताची फुलराणी पी. व्ही. सिंधू हिने जपान ओपन या बॅडमिंटन स्पर्धेची सुरुवात दमदार केली. तिने मलेशियाच्या वोंग लिंग चिंग हिला सरळ दोन गेममध्ये पराभूत करीत विजयी सलामी दिली, मात्र सात्त्विक साईराज रंकीरेड्डी याच्या खांद्याला दुखापत झाल्यामुळे दुहेरीतून सात्त्विकसह चिराग शेट्टीला माघार घ्यावी लागली. जागतिक क्रमवारीत दहाव्या स्थानावर असलेल्या पी. व्ही. सिंधू हिने वोंग लिंग चिंग हिला २१-१४, २१-११ असे सहज पराभूत केले. ३७व्या क्रमांकावर असलेल्या मलेशियन खेळाडूचा ३५ मिनिटांमध्ये पराभव झाला. ध्रुव कपिला-तनीषा क्रॅस्टो या जोडीने मिश्र दुहेरीमध्ये ॲलेक्झँडर डुन-ज्युली मॅकफेरसन या स्कॉटलंडच्या जोडीवर मात केली.भारतीय जोडीने ३८ मिनिटांमध्ये विजयाला गवसणी घातली. दुहेरीत निराशा भारतीय बॅडमिंटनपटूंना दुहेरी विभागात निराशेला सामोरे जावे लागले. रोहन कपूर व ऋत्विका शिवानी गद्दे या जोडीला फेंग झी-हुआंग पिंग या चीनच्या जोडीकडून २१-११, २१-१० अशी हार पत्करावी लागली. सात्त्विक साईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी या जोडीसमोर सलामीच्या लढतीत डॅनियल लुंडगार्ड- मॅड्स वेस्टरगार्ड या डेन्मार्कच्या जोडीचे आव्हान होते.



### सायली वाणीची मनिका बत्रावर मात

**पणजी :** अल्टिमेट टेबल टेनिसमध्ये भारतीय युवा खेळाडू सायली वाणीने एका अत्यंत नाट्यमय सामन्यात अविश्वसनीय कामगिरी केली. तिने सलग तीन टाय पॉइंट्स वाचवले आणि त्यानंतर गोल्डन पॉइंटवर भारताची दिग्गज खेळाडू मनिका बत्राचा पराभव करून यूपी प्रोमिथियन्ससाठी सीझन ७ मधील पहिला विजय निश्चित केला. डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी इनडोअर स्टेडियमवर मंगळवारी झालेल्या या अटीतटीच्या लढतीत यूपीने अहमदाबाद एपीएल पायपर्सवर ८-७ ने विजय मिळवला. शेवटच्या सामन्यापर्यंत आलेल्या निर्णायक लढतीत सायलीने अविश्वसनीय पुनरागमन केले. पहिला गेम ११-५ असा गमावल्यानंतर, या युवा खेळाडूने ३-७ अशा पिछाडीवरून सावरत दुसरा गेम ११-८ असा जिंकला; मात्र निर्णायक गेममध्ये ती ७-१० अशी पिछाडीवर पडली आणि यूपी संघावर पराभवाचे सावट निर्माण झाले. तरीही न डगमगता, तिने तिन्ही मॅच पॉइंट्स वाचवून सामना गोल्डन पॉइंटपर्यंत नेला आणि अत्यंत संयमाने विजय मिळवत भारतीय टेबल टेनिसमधील एका दिग्गज खेळाडूविरुद्ध नेत्रदीपक विजय साकारला. दुसऱ्या गेममधील पिछाडी भरून काढत त्याने हा विजय मिळवला आणि निकालाचा निर्णय महिला एकेरीच्या सामन्यावर अवलंबून राहील, हे निश्चित केले.






### मुंबईचा सुपर बॉय श्रेष्ठ सुरैयाची भरारी

**मुंबई :** मुंबईतील विद्यार्थी श्रेष्ठ सुरैया याने ५६ व्या आंतरराष्ट्रीय भौतिकशास्त्र ऑलिम्पियाड २०२६ मध्ये सुवर्णपदक जिंकून भारताला जागतिक स्तरावर मोठा सन्मान मिळवून दिला आहे. कोलंबियातील बुकारामांगा येथे झालेल्या या स्पर्धेत ८७ देशांतील ३८१ विद्यार्थी सहभागी झाले होते. भारताने उत्कृष्ट कामगिरी करत रशिया, दक्षिण कोरिया, चीन, कझाकस्तान आणि तैवान यांच्यासोबत संयुक्तपणे प्रथम स्थान पटकावले. श्रेष्ठसोबत कनिष्क जैन, ऋद्धेश अनंत बेंडाळे, ऋषित गर्ग आणि स्वरित जोशी या भारतीय विद्यार्थ्यांनाही पदके मिळाली. भारतीय संघाच्या या कामगिरीमुळे देशाच्या विज्ञान शिक्षणाची ताकद पुन्हा एकदा जगासमोर आली आहे. श्रेष्ठचा अभ्यासाकडे पाहण्याचा दृष्टिकोन लहानपणापासूनच वेगळा होता. शालेय अभ्यासक्रमापुरते समाधान न मानता त्याने गणित आणि विज्ञान ऑलिम्पियाडमध्ये सातत्याने सहभाग घेतला. पालकांनीही त्याला विविध शैक्षणिक शिबिरांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यातून त्याच्या वैज्ञानिक विचारसरणीला योग्य दिशा मिळाली.अभ्यास, छंद आणि शिस्त यांचा समतोल राखत जागतिक यश मिळवणारा श्रेष्ठ आज अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरला आहे.




## फिफा फुटबॉल वर्ल्डकप

# स्पेन फायनलमध्ये

**। डलास । वृत्तसंस्था ।**

स्पेन १६ वर्षांनंतर फुटबॉल विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहोचला आहे. संघाने पहिल्या उपांत्य फेरीत फ्रान्सला २-० ने हरवून दुसऱ्यांदा अंतिम फेरीत स्थान मिळवले. डलास स्टेडियममध्ये मिकेल ओयारजाबालने २२व्या मिनिटाला पेनल्टीवर पहिला गोल केला. त्यानंतर ५८ व्या मिनिटाला पेड्रो पोरोने गोल करून स्पेनचा विजय निश्चित केला.स्पेन २०१० नंतर अंतिम सामना खेळेल.

तेव्हा संघाने अंतिम फेरीत नेदरलँड्सला १-० ने हरवून आपला एकमेव विश्वचषक जिंकला होता. तर, फ्रान्स २०१८ आणि २०२२ नंतर सलग तिसऱ्यांदा विश्वचषक अंतिम फेरीत पोहोचण्यापासून वंचित राहिला.

यामालवर फाऊल, ओयारजाबालची पेनल्टीवर आघाडी स्पेनला २२व्या मिनिटाला पेनल्टी मिळाली. फ्रान्सचा डिफेंडर लुकास डिग्नेने बॉक्समध्ये लामिन यमालवर फाऊल केले. त्यानंतर रेफरीने पेनल्टी दिली. मिकेल ओयारजाबालने चेंडू गोलपोस्टच्या उजव्या कोपऱ्यात पाठवला. यासोबतच स्पेनने १-० अशी आघाडी घेतली. हे ओयारजाबालचे स्पर्धेतील पाचवे गोल होते.पोरोने दुसरा गोल करून फ्रान्सच्या पुनरागमनाची आशा संपवली. दुसऱ्या हाफमध्ये फ्रान्स बरोबरी साधण्याचा प्रयत्न करत राहिला, पण ५८व्या मिनिटाला पेड्रो पोरोने दानी ओल्मोच्या उत्कृष्ट पासवर गोल करून स्पेनची आघाडी २-० अशी केली. यानंतर स्पेनने चेंडूवर नियंत्रण ठेवले आणि फ्रान्सला कोणतीही मोठी संधी दिली नाही.

संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट फॉर्ममध्ये असलेला किलियन एम्बाप्पे या सामन्यात स्पेनच्या मजबूत बचावापुढे निष्प्रभ ठरला. त्याला अनेकदा ऑफसाइड मिळाला आणि दुसऱ्या हाफमध्ये त्याला पिवळे कार्डही मिळाले. फ्रान्सने २०१८ आणि २०२२ नंतर सलग तिसऱ्यांदा विश्वचषक अंतिम सामना खेळण्याची संधी गमावली.

या स्पर्धेत स्पेनने आणखी एका विशेष विक्रमाची नोंद केली आहे. त्यांनी सात सामन्यांमध्ये केवळ एकच गोल स्वीकारला आहे. त्यांनी आपल्या मोहिमेची सुरूवात केप वर्देविरुद्धच्या गोलशून्य बरोबरीने केली. त्यानंतर त्यांनी सौदी अरेबियाविरुद्ध ४-०, उरुग्वेविरुद्ध १-०, ऑस्ट्रियाविरुद्ध ३-०, पोर्तुगलविरुद्ध १-०, बेल्जियमविरुद्ध २-१ आणि आता फ्रान्सविरुद्ध २-० अशी विजयी कामगिरी केली आहे.स्पेनविरुद्धच्या तो एकमेव गोल बेल्जियमचा फॉरवर्ड डी केटेलेअरने केला आहे. त्याने उपांत्यपूर्व फेरीच्या त्या सामन्यात ४१ व्या मिनिटाला गोल केला होता.

## राष्ट्रीय लाठी व दांडपट्टा स्पर्धा

# रायगडचा झेंडा दिल्लीत फडकला

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

११ व १२ जुलै रोजी मार्शल गेम फेडरेशन ऑफ इंडिया सिरीज ४ आणि द्वितीय लाठी फेडरेशन कप यांच्यावतीने आयोजित केलेल्या लाठी व दांडपट्टा स्पर्धेत ४६ सुवर्णपदक ४ रौप्य पदक २ कास्यपदक मिळवून अलिबाग रायगडचा झेंडा अटकेपार दिल्लीत फडकवला आहे .



रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यामध्ये खेळाडूंनी मिळवलेले उल्लेखनीय यश आहे. शिवांश निखिल पाटील २ दोन सुवर्णपदक द्विलाठी, पंचम लाठी, श्रीयश संजीत म्हात्रे ३ सुवर्णपदक एकम लाठी, द्विअनिका, दांडपट्टा रुद्र पाटील १ सुवर्णपदक पंचमलाठी, १ कांस्य पदक एकमलाठी, विहान नाईक १ सुवर्णपदक पंचमलाठी १ रोप्य पदक एकमलाठी, मंथन वैभव कदम ३ सुवर्णपदक एकमलाठी, द्विलाठी, द्विअनिका, श्रीअंश स्वप्निल वार्डे २ सुवर्णपदक पंचम लाठी, एकमलाठी वेद वैभव कदम ३ सुवर्णपदक एकमलाठी, द्विलाठी, महरून पवित्रा, हिमांशू मंगेश म्हात्रे २ सुवर्णपदक एकमलाठी, पंचमलाठी, ऋग्वेद विकास नाईक २ सुवर्णपदक एकमलाठी, द्विअनिका, देवदत्त मनीष पडवळ १ सुवर्णपदक द्विअनिका,१रौप्य पदक एकमलाठी, आर्य पाटील २ सुवर्णपदक अष्टम पवित्रा, दांडपट्ट , १ रौप्य पदक एकमलाठी रुद्रा विनय पिंळणकर ३ सुवर्णपदक एकमलाठी, द्विअनिका, दांडपट्टा पर्णवी स्वप्नील नाईक ३ सुवर्णपदक एकमलाठी, द्विअनिका, पंचम लाठी, सृष्टी अभय म्हामुनकर १ सुवर्णपदक द्विअनिका, १रौप्य पदक एकमलाठी, ओवी पाटील १ सुवर्णपदक द्विअनिका,१ कांस्य पदक आभा आठवले २ सुवर्णपदक पंचम लाठी, अष्टम पवित्रा, सई उदय ठाकूर ३ सुवर्णपदक द्विलाठी द्विअनिका अवनी पाटील ५ सुवर्णपदक एकमलाठी, द्विलाठी, द्विअनिका पंचमलाठी, दांडपट्टा आराध्या पंडित नखाते २ सुवर्णपदक, अष्टम पवित्रा नम्रता चव्हाण २ सुवर्णपदक द्विअनिका, अष्टम पवित्रा सर्व विद्यार्थ्यांचे लाठी असोसिएशन अलिबाग रायगडचे अध्यक्ष प्रमोद बाळकृष्ण मसाल यांनी हार्दिक अभिनंदन केले.

# शुभमन गिल, गुरनूर ब्रार दुसऱ्या सामन्याला मुकणार?



**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघाने पहिल्या वन डे सामन्यात विजय मिळवला खरा पण, दुखापतीचे सावट तयार झाले आहे. इंग्लंडविरुद्ध पहिल्या वन डेत ६ विकेट्स राखून विजय मिळवताना मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. दुसरा वन डे सामना उद्या होणार आहे, परंतु कर्णधार शुभमन गिल व जलदगती गोलंदाज गुरनूर ब्रार यांच्या खेळण्यावर संभ्रमाचे वातावरण आहे. कारण, या दोघांना कालच्या सामन्यात दुखापत झाली होती आणि जर ते दुसऱ्या सामन्याला मुकल्यास प्लेइंग इलेव्हनमध्ये कोणाला संधी मिळेल?.

शुभमन ८० धावांची खेळी केल्यानंतर क्रॅम्पमुळे रिटायर्ड हर्ट होऊन मैदानाबाहेर गेला. भारताच्या विकेट पडत असताना तो पुन्हा येईल असे वाटलेले, परंतु तो आलाच नाही. त्यात ब्रार यालाही दुखापत झाली आणि त्यामुळे त्याने त्याचे शेवटचे षटक फेकले नव्हते. ब्रार ४८ वे षटक फेकेल अशी अपेक्षा होती, परंतु रन अप घेताना त्याला त्रास झाला आणि त्याला माघार घ्यावी लागली. त्याच्यावर तातडीने वैद्यकीय उपचार केले गेले, परंतु त्याला षटक पूर्ण करता आले नाही. चालताना त्याच्या उजव्या पोटरीला वेदना जाणवत होत्या आणि त्याने मैदान सोडले. अक्षर पटेलने षटक टाकताना दोन विकेट्स घेऊन इंग्लंडचा डाव गुंडाळला.

शुभमन गिलने तिसऱ्या विकेटसाठी श्रेयस अय्यरसह शतकी भागीदारी करताना भारताच्या डावाला आकार दिला. ८० धावांची खेळी करताना त्याच्या पायाला क्रॅम्प आला. वैद्यकीय उपचार घेऊन तो काही काळ मैदानावर उभा राहिला, पण वेदना असह्य झाल्याने त्याने रिटायर्ड हर्ट होण्याचा निर्णय घेतला. सामन्यानंतर जेव्हा वॉशिंग्टन सुंदरला पत्रकार परिषदेत गिलच्या दुखापतीबाबत विचारले गेले, तेव्हा त्याने मला कोणतीच कल्पना नाही, असे सांगितले.

जर हे दोन्ही खेळाडू उद्यापर्यंत तंदुरुस्त न झाल्यास भारताला प्लेइंग इलेव्हनमध्ये बदल करावे लागतील. अशा परिस्थितीत गिलच्या जागी इशान किशनला संधी मिळू शकते. तो रोहित शर्मासह सलामीला येऊ शकतो. अफगाणिस्तानविरुद्धच्या मागील वन डे सामन्यात त्याने मधल्या फळीत १२५ धावांची खेळी केली होती. वन डेत सलामीवीर म्हणून त्याने ६१.८७ च्या सरासरीने ४९५ धावा केल्या आणि त्यात बांगलादेशविरुद्धच्या द्विशतकाचा समावेश आहे. ब्रारच्या जागी संघात कुलदीप यादव, अर्शदीप सिंग किंवा प्रिंस यादव यांच्यापैकी एकाला संधी मिळू शकते.

## अर्जेंटिना-इंग्लंड दुसरा उपांत्य सामना अटलांटात

**। अटलांटा । वृत्तसंस्था ।**

फुटबॉल वर्ल्ड कपमध्ये अर्जेंटिना आणि इंग्लंड २४ वर्षांनंतर आमनेसामने येतील. दोघांमधील दुसरी सेमीफायनल गुरुवारी रात्री उशिरा अटलांटा स्टेडियममध्ये भारतीय वेळेनुसार रात्री १२:३० वाजता खेळली जाईल. वर्ल्ड कपमध्ये त्यांचा शेवटचा सामना २००२ मध्ये झाला होता. त्यात इंग्लंडने १-० ने विजय मिळवला होता.या सामन्यात सर्वांच्या नजरा लिओनेल मेस्सी आणि हॅरी केनवर असतील. मेस्सीने या वर्ल्ड कपमध्ये ८ गोल करून गोल्डन बूटच्या शर्यतीत दुसरे स्थान पटकावले आहे. तर इंग्लंडचा कर्णधार हॅरी केनने आतापर्यंत ६ गोल केले आहेत.

# पाकिस्तानी क्रिकेट बोर्ड खंडणीखोर!

**। लाहोर । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तान क्रिकेट बोर्ड खंडणीखोर निघाले, असे बोलावे लागणार आहे. अमेरिकेतील मेजर लीग क्रिकेट फ्रँचायझीने पाकिस्तान क्रिकेट बोर्डवर गंभीर आरोप केले आहेत आणि त्यामुळेच त्या पाकिस्तानी क्रिकेटपटूंना करारबद्ध करण्यापासून दूर जात आहेत.



पाकपॅशन डॉट नेटने दिलेल्या वृत्तानुसार, पाकिस्तान क्रिकेट बोर्ड ऐनवेळी खेळाडूला ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी प्रत्येक खेळाडूमागे २५,००० डॉलर्सची ऐनवेळी मागणी करत आहे. या प्रकारामुळे अनेक एमएलसी फ्रँचायझींनी पुन्हा कधीही पाकिस्तान क्रिकेट बोर्डच्या करारबद्ध खेळाडूला आपल्या संघात न घेण्याची शपथ घेतली आहे, ज्यामुळे पाकिस्तानी खेळाडूंसाठी आणखी एका लीगची दारं बंद होण्याची शक्यता निर्माण झाली आहेत.

बोर्ड वर्षभर काहीच बोलत नाहीत आणि मग स्पर्धेच्या अगदी सुरुवातीला, जेव्हा मागण्यात येते तेव्हा ते एक ईमेल पाठवतात की प्रत्येक खेळाडूमागे २५,००० डॉलर्स द्यावे लागतील. आयत्यावेळी दुसरे खेळाडू उपलब्ध होऊ शकत नाही, अशा परिस्थितीत पीसीबी खंडणी मागते. याबाबत त्यांना जाब विचारल्यास, ते उत्तर देत नाहीत, असा दावा या वृत्तात सूत्रांच्या हवाल्याने केला गेला आहे.

एका संघात चार पाकिस्तानी खेळाडू होते, पण पीसीबी चौथ्या खेळाडूला विसरून गेले आणि त्यांनी प्रत्येकी २५,००० डॉलर्सचे तीन हप्ते मागितले. त्यानंतर, सामना सुरू होण्याच्या काही तास आधी, त्यांनी चौथ्या खेळाडूसाठी करिता आणखी २५,००० डॉलर्सची खंडणी उकळली, असा गंभीर दावा या वृत्तातून केला गेला आहे.

## अक्षरच्या ५७ धावा ,४ विकेट | गिल-वॉशिंग्टनचे अर्धशतक

# भारताचा इंग्लंडवर विजय



**। बर्मिंगहॅम । वृत्तसंस्था ।**

अक्षर पटेलच्या अष्टपैलू कामगिरीमुळे भारताने पहिला एकदिवसीय सामना ६ गडी राखून जिंकला. बर्मिंगहॅममधील एडजबॅस्टन येथे २५९ धावांचा पाठलाग करताना भारताने ४५.२ षटकांत ४ गडी गमावून २६२ धावा केल्या. अक्षरने नाबाद ५७ धावा केल्या. कर्णधार शुभमन गिलने ८० धावा केल्या, पण पेटके आल्याने तो रिटायर्ड हर्ट झाला. वॉशिंग्टन सुंदरनेही नाबाद ५२ धावा केल्या.

भारताची सुरुवात खराब झाली. रोहित शर्मा आणि विराट कोहली लवकर बाद झाले. त्यानंतर गिल आणि श्रेयस अय्यर यांनी तिसऱ्या विकेटसाठी १०१ धावा जोडल्या. श्रेयस धावबाद झाला आणि केएल राहुल त्रिफळाचीत झाला. त्यानंतर अक्षर आणि वॉशिंग्टनने पाचव्या विकेटसाठी १०२ धावा जोडून संघाला विजय मिळवून दिला.तत्पूर्वी, इंग्लंडने जो रूट आणि लियाम डॉसन यांच्या खेळीच्या जोरावर ४७.५ षटकांत २५८ धावा केल्या. इंग्लंड ६१ धावांपर्यंत एकही गडी न गमावता राहिला, पण त्यानंतर १९ धावांत पाच गडी गमावले. रूट आणि डॉसन यांनी सहाव्या विकेटसाठी १२१ धावा जोडून संघाला २५८ धावांपर्यंत पोहोचवले. भारताकडून, अक्षर पटेलने चार बळी घेतले. प्रसिद्ध कृष्णा आणि गुरनूर ब्रार यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. जसप्रीत बुमराह आणि शिवम दुबे यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

सामनावीर ठरलेल्या अक्षरने सांगितले की, टी २० मालिकेदरम्यान तो चेंडूला गरजेपेक्षा जास्त जोर लावून मारण्याचा प्रयत्न करत होता, तर एकदिवसीय सामन्यात त्याने परिस्थितीनुसार फलंदाजी केली. अक्षर म्हणाला, एजबेस्टनची खेळपट्टी सुरुवातीला फलंदाजांसाठी कठीण होती.

## मैदान कर्मचाऱ्यांना २५ लाखांचा बोनस

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

मुंबई क्रिकेट असोसिएशनने आपल्या क्रिकेट परिवारासाठी मोठा आणि अभिमानास्पद निर्णय घेतला आहे. मैदानाची जबाबदारी सांभाळणाऱ्या मैदान कर्मचाऱ्यांच्या मेहनतीची दखल घेत एमसीएने त्यांना २५ लाख रुपयांचा विशेष बोनस जाहीर केला आहे. त्याचबरोबर मुंबईसाठी प्रथम श्रेणी क्रिकेट खेळलेल्या दिवंगत क्रिकेटपटूंच्या पत्नींना आर्थिक आधार मिळावा, यासाठी निवृत्तीवेतन सहाय्य योजना सुरू करण्यालाही मंजुरी देण्यात आली आहे. उत्कृष्ट दर्जाच्या खेळपट्ट्या तयार करण्यासाठी मैदान कर्मचाऱ्यांनी घेतलेली मेहनत लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचे एमसीएने सांगितले आहे.

# भारत-पाक सामन्यांसाठी आयसीसीचा जुगाड

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद लवकरच काही महत्त्वाच्या स्पर्धांमध्ये बदल करण्याचा विचार करत आहे. जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचा फॉरमॅट हा नेहमीच चर्चेत राहणारा मुद्दा आहे आणि एडिनबर्ग येथे झालेल्या आयसीसीच्या वार्षिक परिषदेत जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेची रंजकता वाढवण्यासाठी काही बदल करता येतील का, यावर विचार झाला.

सध्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धा दोन वर्ष सुरू राहते आणि सर्वाधिक टक्के मिळवणारे दोन संघ फायनलमध्ये भिडतात. पण, बीबीसीने दिलेल्या वृत्तानुसार आता जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेमध्येही उपांत्य फेरीचे सामने खेळवण्याचा विचार आहे.



दरम्यान, आयसीसीचा एक कार्यकारी गट अफगाणिस्तान, आयर्लंड आणि झिम्बाब्वे यांचा समावेश करून स्पर्धेचा विस्तार १२ संघांपर्यंत करण्याच्या शक्यतेची तपासणी करत आहे. त्याशिवाय या परिषदेत आयसीसीच्या व्हाईट-बॉल वर्ल्ड कप स्पर्धांमधील महत्त्वपूर्ण बदलांवरही चर्चा झाली.

त्यानुसार, पुरुष वन डे वर्ल्ड कप स्पर्धेतील संघांची संख्या १४ वरून १२ पर्यंत कमी करण्याचा आणि सुपर सेव्हन नावाचा नवीन टप्पा सुरू करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे.

हे सुधारित स्वरूप दक्षिण आफ्रिका, नामिबिया आणि झिम्बाब्वे येथे होणाऱ्या २०२७ च्या वर्ल्ड कपपासून लागू होऊ शकते. त्यामुळे जागतिक पात्रता स्पर्धेतून चार ऐवजी केवळ दोनच संघ पात्र ठरतील.

ट्वेंटी-२० वर्ल्ड कपच्या रचनेतही बदल होऊ शकतो, ज्यामध्ये सध्याच्या सुपर एट टप्प्याचा विस्तार करून सुपर-१० टप्पा समाविष्ट केला जाऊ शकतो.

या दोन्ही प्रस्तावांमुळे भारत-पाकिस्तान सामन्यांची शक्यता वाढण्याची अपेक्षा आहे. स्पर्धेचा दुसरा टप्पा १० संघांमध्ये खेळवला गेल्यास, भारत आणि पाकिस्तान यांच्यात अधिक सामने होण्याची शक्यता आहे.त्याचप्रमाणे, वन डे वर्ल्ड कप स्पर्धा राऊंड-रॉबिन पद्धतीने खेळली जाते आणि अव्वल चार संघ उपांत्य फेरीत पात्र ठरतात.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)